**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २६**

**सभावृत्तांत**

दिनांक – २०.२.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.०२.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३.मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४.मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२६.मा.भारती फरांदे

२७. मा.आर.एस.कुमार

२८.मा.जावेद रमजान शेख

२९.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०.मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१.मा.नंदा विकास ताकवणे

३२.मा.नेटके सुमन राजेंद्र

३३.मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४.मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.लोंढे गणेश नारायण

३८.मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९.मा. †›. संदीप गुलाब चिंचवडे

४०.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१.मा.अपर्णा निलेश डोके

४२.मा.अनंत सुभाष को-हाळे

४३.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.पवार मनीषा काळूराम

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४८.मा.काळभोर वैशाली जालिंदर

४९.मा.शेख अस्लम शैकत

५०.मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१.मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९.मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६१. मा.महेशदादा किसन लांडगे

६२. मा.श्रद्धा बाजीराव लांडे

६३. मा. †›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६४.मा.लोंढे शुभांगी संतोष

६५.मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६६. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६७.मा.सावळे सिमा रविंद्र

६८. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६९. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७०.मा.पालांडे सुजाता सुनिल

७१. मा.बहल योगेश मंगलसेन

७२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७३. मा.कदम सदगुरु महादेव

७४. मा.गिता सुशिल मंचरकर

७५. मा.कैलास महादेव कदम

७६.मा.छाया जगन्नाथ साबळे

७७. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७८. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

७९.मा.आसवानी सविता धनराज

८०. मा.वाघेरे सुनिता राजेश

८१. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८२.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

८३.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६.मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०.मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२.मा.बारणे निलेश हिरामण

९३.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४.मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

९५.मा.बारणे माया संतोष

९६.मा.ओव्हाळ शेखर अशोक

९७.मा.यमुनाताई रमणनाना पवार

९८.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९९.मा.कलाटे स्वाती मयुर

१००.मा.नांदगुडे विलास एकनाथ

१०१. मा.चौंधे आरती सुरेश

१०२.मा.बापू उर्फ शत्रुध्न सिताराम काटे

१०३.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०४.मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०५.मा.जवळकर वैशाली राहुल

१०६.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

१०७.मा.जगताप राजेंद्र गणपत

१०८.मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०९.मा.जगताप नवनाथ दत्तु

११०. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१११.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११२. मा.जम सोनाली पोपट

११३. मा.प्रशांत शितोळे

११४.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११५.मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११६. मा.गायकवाड संध्या सुरदास

११७.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११८. मा.शेंडगे आशा सुखदेव

११९. मा.मोटे किरण बाळासाहेब

१२०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१२१. मा.संजय केशवराव काटे

१२२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२४. मा.पाटील सुजित वसंत

१२५. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.गावडे, मा.माने, मा.खांडकेकर, मा.गायकवाड, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे, मा.थोरवे - सहा.आयुक्त, मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.भोसले -मुख्यलेखापाल, मा.काची, मा.दुधेकर, मा.निकम, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.केदारी - कार्य.अभियंता, मा.उबाळे - प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.बोदडे - प्रशासन अधिकारी(जनतासंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ कार्यान्वित करणेकामी मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) पिंपरी चिंचवड शहरामध्ये (२४X७ प्रमाणे) पाणीपुरवठा करणे (Continuous 24X7 pressurised water supply project) या प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

## <u>नियुक्त्या</u>

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करणे.

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपूर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०१४ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे -

१) मा.जगताप नवनाथ दत्तू -राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २) मा.अविनाश (दादा) टेकावडे - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३) मा. चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ४) मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ५) मा. सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ६) मा.जगदीश शेट्टी – राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ७) मा. छाया जगन्नाथ साबळे - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व ८) मा.भालेकर अरुणा दिलीप – भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी)

यापमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष – ७ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी) – १ या पक्षियबलाबलप्रमाणे नियुक्त्या करणे करीता-

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या गटनेत्या मा.मंगलाताई अशोक कदम यांनी त्यांच्या पक्षाचे ७ मा.सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत - (बंद लखोटा देणेत आला.)

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी) गटनेते मा.विनोद जयवंत नढे यांनी त्यांच्या पक्षाच्या १ मा.सदस्याचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावे. (बंद लखोटा देणेत आला.)

त्यानंतर -

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वांसमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे मा.आण्णा बोदडे, प्रशासन अधिकारी, जनसंपर्क विभाग यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे -

१) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी– राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २) मा.गायकवाड संध्या सुरदास - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३) मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ४) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ५) मा.तरस बाळासाहेब जयवंत- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ६) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड – राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ८) मा.प्रसाद शेट्टी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी)

------------------

ठराव क्रमांक -४७१/१ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/२/२०१४ विभाग - नगरसचिव

<u>स्थायी समिती सदस्य</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २) मा.गायकवाड संध्या सुरदास - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३) मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ४) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ५) मा.तरस बाळासाहेब जयवंत - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ६) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व ८) मा.प्रसाद शेट्टी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी)

या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे मा.सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**------------------------**

(नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या सन्मा.सदस्यांचा मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभागृहनेते, मा.स्थायी समिती अध्यक्ष, सर्व पक्षीय गटनेते यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.)

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, आजच्या या सभेत शिक्षण मंडळ व वृक्ष प्राधिकरण समितीचे बजेट आहे. या विषयांवर सर्वांना चर्चा करता यावी म्हणून विषय क्र. ४ व ९ प्राधान्याने घेण्यात यावेत अशी विनंती करते.

**मा.अपर्णाताई डोके** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर -** विषय क्र. ४ व ९ प्राधान्याने घेण्यात येत आहेत.

**मा.अपर्णाताई डोके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/१९५१/२०१४,दि.७/१/२०१४
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६४० दि.१६/१/२०१४

शिक्षण मंडळाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१०६,१६,६२,०००/- चे व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१०१,८६,२२,०००/- मान्यतेकामी सादर केलेले असल्याने त्यास तसेच शिक्षण मंडळासाठी पुढीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेबाबत विनंती आहे.

| तपशील | तरतूद वाढ कोटीमध्ये |
|---|---|
| १) दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना रेनकोट देण्यात यावेत. | (र.रु.१.२० लाख) |
| २) दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात यावेत. | (र.रु.१.७५ लाख) |
| ३) मनपा शाळांच्या सर्व इमारतीवर वीज रोधक यंत्रणा बसविणे | (र.रु.२.०० लाख) |
| ४) ई-लर्नींग प्रकल्प मनपा शाळेत चालू करणे | (र.रु.१.५० लाख) |

(एकूण अपेक्षित वाढ रक्कम रुपये ६ कोटी ४५ लाख फक्त)

वरीलप्रमाणे १ ते ४ किमान संयुक्तीक मागण्यांबाबत आपण आपल्या अधिकारामध्ये तरतुदीमध्ये वाढ करणे अथवा नव्याने तरतूद करणे बाबत. मा.स्थायी समिती सभेमध्ये निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

तसेच उपरोक्त विषयानुसार सन २०१४-१५ च्या तरतुदीमध्ये सर्व प्राथमिक शाळांसाठी १) वीजरोधक यंत्रणा २) पिण्याचे पाणी फिल्टरेशन यंत्रणा ३) एलइडी स्क्रीनसाठी मा.शिक्षण मंडळ समितीने प्रस्तावित केलेले होते. ते मंजूर करणेत यावे. ४) सर्व विद्यार्थ्यांना रेनकोट/स्वेटर सालाबादाप्रमाणे याही वर्षी दिले जावेत यासाठी आवश्यक तरतूद व्हावी. ५) बालवाडी शिक्षकांची मानधन वाढीची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. सध्या देण्यात येत असलेले मानधन अपुरे आहे. ६) तसेच स्थायी आस्थापना खर्चामध्ये वाढ करणेत यावी. ७) ई-लर्नींग यंत्रणा व बायोमॅट्रीक हजेरी यंत्रणा प्रत्येक शाळेमध्ये बसविणेकामी

आवश्यक तरतुद करणे गरजेचे आहे. वरीलप्रमाणे १ ते ७ मागण्यांबाबत तरतुदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे–** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – तसेच बुट, रेनकोट, स्वेटर कंपनीकडून खरेदी करणेत यावेत. अल्पवयीन मुलींना दर महिना नॅपकिन देणेत यावेत. शालेय साहित्य / खेळणी ब्रँण्डेड कंपनीकडून खरेदी करणेत यावेत. सर्व शाळांमधून / वर्गांमधून कॅमेरे बसविणेत यावेत, अक्षर सुधार योजना राबविणेत यावी. सेमी इंग्लिश / इंग्लिश शाळा, इंग्रजी माध्यम शाळा सुरु करणेत याव्यात. नामांकित शाळांना शाळा दत्तक देणेत याव्यात. याप्रमाणे अंमलबजावणी करुन एकाच महिन्यात सर्व टेंडर पब्लिश करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे –** मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाचा विषय प्राधान्याने घेतला आहे. मूळ विषयाला उपसूचना देण्यात येत आहे – पिंपरी चिंचवड शिक्षण मंडळ अंतर्गत बालवाडी शिक्षिका कार्यरत आहेत. त्यांना सध्या मिळणारे मानधन अत्यंत कमी आहे. त्यामध्ये वाढ करणेबाबतची मागणी अनेक दिवसांपासुन प्रलंबित आहे. पुढीलप्रमाणे मानधन टप्प्यानुसार वाढविणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

| अ.क्र. | तपशिल/मानधन टप्पा | सध्याचे मानधन | मागणीनुसार वाढविणेचे मानधन |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५ वर्ष सेवा पुर्ण | ३५००/- | ७०००/- |
| २ | ५.१ ते १० वर्ष सेवा | ४०००/- | ८०००/- |
| ३ | १०.१ ते १५ वर्ष सेवा | ४५००/- | ९०००/- |
| ४ | १५.१ ते २० वर्ष सेवा | ५०००/- | १००००/- |
| ५ | २० वर्षांच्या पुढील सेवा झालेल्या सर्व बालवाडीताई शिक्षिका / सेविका | ५५००/- | ११०००/- |

वरीलप्रमाणे बालवाडीताई शिक्षिका व सेविका यांच्या मानधनामध्ये टप्प्यानुसार वाढ करण्यास मान्यता देण्यात यावी.

(१) सदरचा विषय वाढीव खर्चासह मान्य करण्यात यावा.

(२) शिक्षकांना प्रशिक्षण (Training) देणेबाबत वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी. ३० लाख वाढीव तरतूद करण्यास (मूळ अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदी व्यतिरिक्त) मान्यता देण्यात यावी.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाचे बजेट आल्यानंतर खरेतर मला वाटले होते, सर्वांचे हात बोलण्यासाठी वर जातील. खरेतर दरवर्षी शिक्षण मंडळाचे बजेट आल्यानंतर सभागृहात चर्चा होते. डॉ.श्रीकर परदेशी यांनी बजेट करत असताना प्रामुख्याने रेनकोट, स्वेटर इ. शालेय वस्तू देण्यासंदर्भात बजेटमध्ये काटछाट केली होती. आज काय परिस्थिती आहे? प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रमुख अतिरिक्त आयुक्त मा.तानाजी शिंदे व्यासपीठावर आहेत. अतिरिक्त आयुक्तांनी संपूर्ण शिक्षण मंडळाचा, संपूर्ण शाळांचा दौरा केला होता. त्यात पाहिले होते. मी देखील अनेक शाळांमध्ये जाऊन पाहिले होते. आज देखील शिक्षण मंडळाचे शिक्षण घेणा-या चवथी पाचवीच्या विद्यार्थ्यांना नीट वाचता सुद्धा येत नाही. या सभागृहात बजेट सादर करत असताना कोणत्याही सदस्याचा बजेट मंजूर करायला विरोध नसतो. महापालिकेकडून किती कोटी खर्च करण्यात येतात, याला विरोध नसतो. परंतू आज शिक्षणाचा दर्जा पाहिलातर तो खालवतोय. महापालिका क्षेत्रात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी कमी होते आहे. दर वर्षाला ४ ते ५,००० विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. तरतूदीत वाढ केली आहे. उपसूचनेद्वारे वाढ करण्यात आली आहे. त्यात शालेय विद्यार्थ्यांना रेनकोट देण्यासाठी रु.१,२०,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. सक्षमतेबाबत रु.१,७५,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. शालेय इमारतींवर वीजरोधक यंत्रणा बसविण्यासाठी जवळपास रु.२,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. ई-लर्निंग साठी रु.१,५०,००,०००/- तरतूद करण्यात आली आहे. खरेतर या सगळ्या तरतूदी होत असताना तरतूद करायला घेता तेव्हा प्रामुख्याने उपसूचनेद्वारे देत असताना स्वतःच्या स्वार्थापोटी, स्वतःला काही फायदा मिळावा म्हणून काही मंडळींनी जाणिवपूर्वक ही तरतूद केली आहे. माझे सदस्यांना सांगणे आहे, तुमच्या परिसरात प्राथमिक शिक्षण संस्थांच्या शाळा आहेत तिथे तुम्ही जाऊन पाहिले पाहीजे. महापालिकेच्या वतीने चालविल्या जाणा-या शाळांमध्ये मुलांना खरोखर शिक्षण मिळते का? आज त्याठिकाणी मनपा क्षेत्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालू आहेत तिथे जवळपास पालकांकडून ४०,०००, १५,००० रुपये घेतले जातात. तरीसुद्धा ते वेटींगला असतात. ज्या ज्या चांगल्या शाळा आहेत, तिथे पालक पैसे देऊन मुलांना त्या शाळांमध्ये टाकायचा प्रयत्न करतात. दुसरीकडे महापालिकेच्या शाळांमध्ये मुले यावीत, त्यांनी शिक्षण घ्यावे या दृष्टिकोणातून महापालिका कोट्यावधी रुपये खर्च करते. शिक्षणाबाबत महापालिकेचा आज तसा दर्जा राहिलेला नाही. आम्ही सभागृहात सातत्याने मागणी करतो. तरीदेखील बजेटमध्ये तरतूद करण्यापलिकडे शिक्षण मंडळाचा कारभार राहिलेला नाही. सन्मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षकांची बदली करण्यापर्यंत शिक्षण मंडळ लक्ष घालते. आज प्रामुख्याने मराठी माध्यमातून शिक्षण दिले जाते. त्यांचा दर्जा खालावत चालला आहे. सभागृहात सातत्याने सांगितले जाते. सदस्य ओरड करतात. त्यात सुधारणा होत नाही. बदल होत नाही. प्राथमिक शिक्षण देणा-या संस्था यांच्यात बदल होत नाही ही दूर्दैवाची बाब आहे. याठिकाणी फिल्ट्रेशन यंत्रणा बसविण्यासंदर्भात विषय आहे. हास्यास्पद विषय आहे. गेले ३/४ वर्षांपूर्वी मा.स्थायी समितीच्या माध्यमातून फिल्ट्रेशन यंत्रणा बसविण्यासाठी रु.५० लाख खर्च करुन ते शाळांमध्ये बसविण्यात आले होते. त्यावेळी मी सांगितले होते, ६ महिन्यांत हे बंद पडणार

आहेत. ६ महिन्यांनंतर एकही फिल्टर चालू नव्हता. फक्त ठेकेदारांना पोसण्यासाठी हे करतो का? कोणासाठी करतो? आज हे दूर्दैवाने सांगावे लागते आहे. शिक्षण मंडळाचे बजेट होत असताना केवळ कोणत्यातरी ठेकेदाराला पुढे ठेवून बजेट केले जाते. गरीब मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केला जात नाही. प्राथमिक शिक्षण मंडळाचे बजेट केवळ ठेकेदारासाठी केले जाते काय अशी परिस्थिती आहे हे दूर्दैवाने सांगावे लागते. शिक्षण मंडळात जाऊन पाहिलेतर शिक्षण मंडळाचा कारभार केवळ ठेकेदारांसाठी चालू आहे. ही संस्था मुलांसाठी चालू नाहीतर केवळ शिक्षकांना नोक-या देण्यासाठी, शासनाच्या वतीने पगार देण्यासाठी चालू आहे. हे गांभिर्याने घेतले पाहीजे. एकिकडे मराठी माध्यमांच्या शाळांमधून मुले कमी होत आहेत. आईवडील त्यांना या शाळांमध्ये ठेवत नाहीत. दुसरीकडे प्राथमिक शिक्षण व आरोग्य ही प्रामुख्याने महापालिकेची कर्तव्ये आहेत. त्यापासून आपण दूर चाललोय हे यातून दिसून येते आहे. हे गांभिर्याने घेतले पाहिजे. बजेटला मंजूरी देत असताना तरतूद करत असताना केवळ कोटीकोटींची तरतूद करतो. केवळ कशासाठी तरतूद करतो यापेक्षा जी मुले महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात, ती गरीबांची, झोपडपट्टीवासियांची मुले आहेत. त्यांचे आईवडील त्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिकवू शकत नाहीत. अशांची मुले महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात. त्यांचा दर्जा सुधारण्याचे काम झाले पाहीजे. केवळ बजेट आले म्हणून त्याला मान्यता देणे या पलिकडेही पाहीले पाहीजे. त्यांच्या शिक्षणाचा दर्जा सुधारावा एवढेच त्यानिमित्ताने सांगतो.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाचे बजेट वाढत चालले आहे. वॉर्डात काम करण्यासाठी बजेट कमी होत चालले आहे. मी नुकतेच बजेट पाहीले. गेल्या वर्षापेक्षा प्रभागासाठी दीड कोटी कमी दिले होते. प्रभागातली कामे म्हणजे मेंटेनन्सचे काम. तिथे २५% कमी केले जातात. इथे शिक्षण मंडळ सदस्यांचे बजेट वाढत चालले आहे. शाळांची परिस्थिती काय आहे. तुम्ही म्हणता शाळेत ॲडमिशन घेतात. आपल्याकडे १/३ सुद्धा मुले शाळेत नाहीत. निगडीमध्ये २ शाळा आहेत. या दोन्ही शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २४०० होती. आज लोकसंख्या ५० पट वाढली आहे. मुले मात्र फक्त २५% आहेत. ६०० मुले आहेत. इतर ठिकाणी ज्या-ज्या ठिकाणी महापालिकेच्या शाळा आहेत, तिथे विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. याचे कारण आपण शोधून काढले नाही. महापालिकेच्या शाळेत सगळ्या सुविधा देतात. लोक ५०,०००/- देऊन खाजगी शाळेत प्रवेश घेतात. याचे कारण शोधले पाहीजे. शिक्षणाची पद्धत चुकीची आहे. क्वालिटी खराब असेल तर याकडे लक्ष दिले पाहीजे. दुसरे म्हणजे शिक्षण साहित्य वाटप करताना थंडीनंतर स्वेटर, पावसाळ्यानंतर रेनकोट देतो अशी परिस्थिती आहे. आज या दोन्ही आयटममध्ये ५/१० कोटी खर्च करावेत हा विचार करायची वेळ आलेली आहे. सिझनमध्ये साहित्य मिळत नसेल तर त्याचा उपयोग काय. २/३ वर्षातून एकदा स्वेटर द्यायचा, रेनकोट द्यायचा असा विचार करावा. आपण २/३ वर्षे एक रेनकोट किंवा स्वेटर चालवतो. इंग्रजी मिडीयम शाळा प्रत्येक झोनमध्ये सुरु करा. मला वाटत नाही, आपल्या शाळेतील शिकवण्याला क्वालिटी आहे. टिचिंग एकदम खराब आहे. माझी आपल्याला विनंती आहे, हजेरीत मुले कमी होत चालली आहेत. त्याचे कारण शोधून काढा. शिक्षणाची क्वालिटी

सुधारायचा प्रयत्न करा. ३/४ वर्षांत एकदा स्वेटर/रेनकोट द्या. त्यासाठी जे बजेट खर्च करणार ते इतर ठिकाणी खर्च करु शकतो.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले ते योग्य आहे. महापालिकेच्या शाळांची संख्या का रोडावत चालली आहे? माझ्या प्रभागात २ शाळा आहेत. त्यात पुणे-मुंबई हायवे पलिकडून मुले शाळेत येतात. तिथे बसची व्यवस्था करावी. मी पत्र देऊन सुद्धा उत्तर येत नाही. त्या दृष्टीने विचार करा. म्हणजे शाळेतील विद्यार्थी संख्या वाढत जाईल.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाच्या बजेटसंदर्भात आत्ता मा.श्रीरंग बारणे यांनी काही विषय मांडले आहेत. निश्चितच त्या विषयाशी मी देखील सहमत आहे. स्लम भागातली मुले प्राथमिक शाळांमध्ये शिकत असतात. ज्यांना खाजगी शाळांमध्ये जाता येत नाही म्हणून पालिकेच्या शाळेत जातात. आम्हाला लाज वाटते, आज देखील चवथी, पाचवीच्या मुलांना वाचता येत नाही. मुलांना वाचता आले पाहीजे, लिहिता आले पाहीजे. त्यांचे चावडी वाचन घेण्यात आले तेव्हा ब-याच मुलांना वाचता आले नाही. ही मुले यायच्या आधीच त्यांनी धडा वाचलेला असतो. पुस्तकातले बरे वाचतात. आपण दुसरे एखादे पुस्तक वाचायला दिलेतर त्यांना वाचता येत नाही. विचारले तर म्हणतात, आम्हाला वाचता येत नाही. करोडो रुपये शिक्षण मंडळासाठी देतोय. शिक्षकांचा पगार निश्चित वाढवावा. पण शाळेचा दर्जा वाढला पाहीजे. आजदेखील महापालिकेच्या शाळेत पाहिलेतर आपण फक्त साहित्य देण्याचे काम करतोय. साहित्य देत असताना मागे २ वर्षांपूर्वी रेनकोटचा विषय गाजला होता. कमलेश नावाच्या ठेकेदाराचे पुढे काय झाले. त्याला तुम्ही ब्लॅकलिस्टमध्ये टाकले का नाही काही माहित नाही. तो आजदेखील महापालिकेत काम करतोय. रेनकोट दिलातर तो चीर पडून फाटून जातो. मग असे रेनकोट कशासाठी देतोय. असे रेनकोट मुलांनी पावसाळ्यात घातलेले कधीच पाहीले नाहीत. मी महापालिकेच्या शाळेच्या बाजूलाच रहायला आहे. ऊर्दू माध्यम, इंग्रजी माध्यम, मराठी माध्यम अशा एकूण ४ शाळा माझ्या वॉर्डात आहेत. रेनकोट फक्त खरेदी केला जातो, एवढे माहिती आहे. ते मुलांपर्यंत पोचतात का नाहीत. मुले हे रेनकोट घालतात का नाही हे आजदेखील पाहिलेले नाही. माझी नम्रतेची, आग्रहाची कळकळीची विनंती आहे, हा रेनकोट पुरवून टाका. रेनकोटऐवजी छत्र्या द्या, रेनकोट देऊ नका. रेनकोटचा विषय वगळून बजेट मंजूर करा. दुसरीकडे शाळेत शिक्षक कमी आहेत. मुलांची संख्या कमी होत चालली आहे. आमच्या भागात पहिली, दुसरीत ॲडमिशन घेताना पाहिलेतर कमीतकमी २०० मुलांची तफावत जाणवते आहे. दरवर्षी मुले वाढत असतात. यावर्षी मुले कमी झाली आहेत. शाळेत एखाद्या मुलाला खरचटले किंवा लागलेतर फस्ट-एड बॉक्स नसतो. नगरपालिकेच्या दवाखान्यातील डॉक्टर तो देत नाहीत. बुट, मोजे, स्वेटर यात जास्तीत जास्त लक्ष घालतो. यावर करोडो रुपये खर्च करतो. माझी आग्रहाची, नम्रतेची विनंती आहे की, छोट्या-छोट्या गोष्टींकडेही लक्ष द्या. खरेदीवर कपात करा अशी विनंती करतो.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज शिक्षण मंडळाच्या बजेटसंदर्भात चर्चा चालली आहे. जवळजवळ ६ कोटींचे बजेट देतो आहोत. आत्तापर्यंत शिक्षण मंडळाने लक्ष दिले असेल, प्रत्येक शाळेत जाऊन मुलांचा गणवेश पाहिला तर एकाही मुलाचा गणवेश व्यवस्थित दिसला नाही. मुलांना खालच्या दर्जाचे गणवेश दिले जातात. बूट-सॉक्स वेळेवर दिले जात नाहीत. स्वेटर वेळेवर मिळत नाहीत. खिचडी देतात, त्यात आळ्या निघतात. पेपरमध्ये येत असते. नवीन आयुक्तांनी सूचवले आहे, रत्नागिरीत खिचडीऐवजी शेंगदाण्याचे लाडू दिले तर हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढते. मी म्हणतो, आपणही इथे निश्चित तसे करावे. लाडूचा प्रस्ताव मांडावा. कपडे असतील त्यासाठी ८/९ महिने झाले पत्र दिले होते. पत्र दिले असताना कोणतीही वस्तू उपलब्ध झालेली नाही. शिक्षण मंडळाने सांगितले, आजपर्यंत कोणतीही वस्तू मिळत नाही याकडे लक्ष दिले पाहीजे. अशा पद्धतीने शाळेचा खर्च वाढण्यासाठी एका ठिकाणी ६० विद्यार्थी बसविलेले असतात. शिक्षक कमी आहेत. अशा पद्धतीने आपला कारभार चालू आहे. यात निश्चितपणे लक्ष द्यावे. आयुक्त साहेबांनी बरेच वेळा व्हिजिट दिली आहे. शाळांना शिस्त लावली आहे. त्याबद्दल धन्यवाद देतो.

**मा.गोरक्षनाथ लोखंडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दरवर्षी शिक्षण मंडळाच्या बजेटवर चर्चा होते. भारतीय संविधानाच्या कलम ४५ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्टपणे लिहिले आहे, Education should be free and compulsory. शिक्षण सर्वांना मोफत व सक्तीचे असावे. म्हणून भारतीय संविधानात ४५वे कलम समाविष्ट करण्यात आले. महापालिका एक स्वायत्त संस्था आहे. म्हणून दिवाबत्तीबरोबरच शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी सांस्कृतिक, शैक्षणिक चळवळ महत्वाची आहे. त्याच संदर्भात पुढे काय झाले. क्वान्टीटी मोजतो का क्वालिटी काय, हा तुमचा आमचा अनेक वर्षांच्या अनुभवावरुन पाहतोय. शहरात अनेक प्रायव्हेट स्कूलस्, इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. आपण प्रयत्न करायला पाहीजे होते. मराठी शाळा नीट चालवू शकलो नाहीत. विद्यार्थी पटसंख्या रोडावत चालली आहे. मुलांना नित्कृष्ट आहार देतो. खरेतर आपण लक्ष ठेवले पाहीजे. क्वालिटी कशा पद्धतीने दिली पाहीजे. ड्रेस असेल, बुटमोजे असतील, मुलांना मिळणारा आहार असेल, केवळ पैसे द्यायचे त्याकडे दूर्लक्ष करायचे व नित्कृष्ट साहित्य द्यायचे. यात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. हे नव्याने सांगावे यातला भाग नाही. काही लोकांचे लागेबांधे असल्यामुळे त्यांनाच डोळ्यासमोर ठेवून बजेट केले जाते. उद्याच्या भावी भारताचे भविष्य असणा-या या मुलांच्या दूधात भेसळ करताना यांचे हात थरथर कापत नसतील का, खिचडीत भ्रष्टाचार करताना यांचे हात थरथर कापत नसतील का याचा सुद्धा साकल्याने विचार केला पाहीजे. क्वालिटी द्या. क्वाण्टीटी नंतर बघा. ही महापालिका चांगली शिक्षण संस्था उभी करु शकते हे जगासमोर ठेवू या. ज्या अनावश्यक गोष्टी आहेत. रेनकोट ठिक आहे. आपणही २/३ वर्ष वापरतो, ते स्वेटर किंवा रेनकोट घेतले नाहीत तर टक्केवारी मिळणार नाही का. केवळ काही लोकांच्या हितसंबंधांसाठी बजेटींग होत असेल तर ते चुकीचे आहे. याचा साकल्याने विचार व्हावा.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आत्ता शिक्षण मंडळावर चर्चा चालू आहे. शिक्षण मंडळ म्हटले की, स्वेटर, आणि रेनकोट, हेच समिकरणच झाले आहे. मुलांना शालेय

साहित्य न देता शिक्षकांना चांगला पगार द्या. या मुलांना स्वेटर, रेनकोटची काही गरज नाही. शिक्षणाचा दर्जा द्या. या गरीब मुलांना देव नैसर्गिक शक्ती सुद्धा देतो. त्यामुळे यांना स्वेटर किंवा रेनकोटची काही गरज नाही. माझ्याकडे महिला कामाला येतात. त्या मुलांसाठी फक्त काम करतात. या महिलांनी त्यांच्या मुलांना खाजगी शाळेत घातले आहे. त्या म्हणतात, नगरपालिकेच्या शाळेत घातलेतर तिथे जाऊन फक्त गुंड तयार होतील. या मागचे कारण शोधा, तिथे शिक्षणाचा किती दर्जा देतात. आत्ताच नगरपालिकेच्या शाळेत हत्या झालेली होती. फक्त स्वेटर, रेनकोट, दप्तर, बूट हा विषय न होता शिक्षणाला जास्तीत जास्त महत्व देऊन शाळांचा दर्जा वाढवावा. महापालिकेच्या शाळांचा दर्जा खालावला आहे म्हणण्यापेक्षा आत्ता या शाळांना दर्जाच नाही आहे. भ्रष्टाचार या विषयावर मला जास्तीत जास्त बोलायचे नाही. आत्तापर्यंत शिक्षण मंडळ म्हटले की स्वेटर, रेनकोट शिवाय दुसरा विषयच नाही. उन्हाळा, पावसाळा याविषयी मी काही बोलणार नाही. फक्त शाळांचा दर्जा जास्तीत जास्त वाढवा हीच विनंती आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,खरेतर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय आला आहे. बजेटला आमचा विरोध नाही. परंतू ज्या काही त्रुटी वाटतात, त्या सांगणे अत्यंत गरजेचे आहे. गेले ४/५ वर्षापासून बघतेय, दरवर्षी महापालिका शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होते आहे. त्या मागचे महत्वाचे कारण पाहिले तर प्रत्येक आई वडीलांना वाटते, माझ्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले पाहीजे. तिथे ते जात असतात. आपण कोणत्याही पालकांना अडवू शकणार नाही. मराठी माध्यमातील शाळांमधील विद्यार्थीसंख्या कमी होत चालली आहे. काही दिवसांनी मराठी माध्यमाच्या शाळांत २ विद्यार्थी ५ विद्यार्थी अशी परिस्थिती आपल्या शाळांत येऊ शकते म्हणून आपले शिक्षण वाईट दर्जा नाही असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र शासनाचा ८वी पर्यंत मुलांना पास करावे असा नियम आला आहे. त्यामुळे आई वडीलांना वाटते, आपला मुलगा शाळेत गेला नाहीतरी तो पासच होणार आहे. तर पालकांना त्यांच्या मुलांनी शाळेत जावे असे वाटत नाही. ही मुले शाळेत येत नाहीत. आत्ता मा.लोखंडे यांनी सांगितले, १४ वर्षापर्यंत सगळ्यांना शिक्षण मोफत व सक्तीचे असले पाहीजे. पण जर आईवडील मुलांना शाळेत पाठवत नसतील तर त्या आई वडीलांवर कायदेशीर कारवाई करावी असा सुद्धा नियम आहे. महापालिका शाळेतील सातवी, आठवी, नववीतली मुले असतील जी १८ वर्षाच्या आत आहेत, ती शाळेत का येत नाहीत. यासाठी पालक सुद्धा तेवढेच जबाबदार आहेत. त्यांच्या पालकांना बोलवून घ्यावे. शाळा अर्ध्यावर सोडतात. ही बाब आपण पाहीली पाहीजे. शाळांमध्ये जून जुलैमध्ये ॲडमिशन चालू असतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये सुद्धा ॲडमिशन चालू असते. आपलीच नगरसेवकांचीसुद्धा हीच ओरड असते. प्रत्येक शाळेत पालकांचे मोर्चे असतात, आमच्या मुलांना ॲडमिशन मिळत नाही. महापालिकेच्या इंग्रजी माध्यमातून शाळा एलकेजी पासून का काढत नाहीत. शासनाची अशी मान्यता घेतली तर जेवढ्या शाळा आहेत. प्रत्येक गावात एक शाळा याप्रमाणे एक मुलांची व एक मुलींची अशा एलकेजीपासून शाळा सुरु केल्या तर आज जे गरीब विद्यार्थी त्यांना गरज आहे ते शिक्षण घेऊ शकतात. महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुद्धा आपण काढू शकतो. मराठी माध्यमांसाठी जे बजेट वापरतो तेच बजेट इंग्रजी माध्यमासाठी वापरले पाहीजे. महाराष्ट्रातील कोणत्यातरी पालिकेने इंग्रजी माध्यमाच्या शाळा

सुरु कराव्यात व आपण त्यांचा आदर्श घेऊन मग आपल्याकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु कराव्यात. त्यांचा आदर्श घेऊन आपण शाळा सुरु करणार का. आपण पहिले पाऊल टाकावे. पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर आहे. आपण शासनाकडे मागणी केली की इंग्रजी माध्यमाच्या शाळांना परवानगी द्या. त्यांनी परवानगी दिलीतर स्लम भागातील गरीब विद्यार्थी ऍडमिशन घेऊ शकतात. कोणत्याही प्रकारचे फीचे बंधन नाही, कोणीही अडवू शकत नाही. या शाळांना शासनाची मान्यता असल्यामुळे, सरकारकडून काही घेत नाहीत त्यामुळे ते आपल्या विद्यार्थ्यांना ऍडमिशन देत नाहीत. म्हणून आपण इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढल्यातर फार बरे होईल. दुसरी महत्वाची गोष्ट आहे, इथे बरेचसे महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. ज्या तरतूदी केल्या आहेत, त्यात बायोमेट्रीक हजेरीसाठी तरतूद केली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा बसविले पाहीजेत. पिंपरीतील मनपा शाळेत मुलाची हत्या झाली. नेमके काय होते, कशामुळे होते. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही बसवा. खाजगी शाळेत असे का होत नाही. शिस्तीचा भाग म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे शाळांमध्ये बसविणे गरजेचे आहे. पालकांना, विद्यार्थ्यांना जो खाऊ देतात तो नित्कृष्ट दर्जाचा आहे का. तो नित्कृष्ट असेलतर कोण ठेकेदार आहे. खाऊ हा दिलाच पाहीजे. त्यात देणे हा भाग आहे. यात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला पाहीजे. या महापालिकेतील काही ठेकेदारांना सवय लागली आहे की, खिचडी बंद झाली, मुलांना सकस आहार देण्याची योजना बंद झालीतर कदाचित त्यांचे पोट भरणे बंद होईल का काय एवढी त्यांची नाळ त्याच्याशी जोडली आहे. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यांनी खाऊ देत असताना बालवाड्यांना खाऊ देण्याचा विषय केला गेलेला आहे. या विद्यार्थ्यांना खाऊ देताना शाळांबाहेर जे स्टॉल असतात, त्यांना आरोग्य विभागाचे नियम आहेत. तिथे खाऊ दिला जातो, त्यात मुरमुरे असतील, वेगवेगळे प्रकार आहेत. त्यात नशा येणारे पदार्थ सुद्धा तिथे विकायला ठेवलेले असतात. बोरकुट एक प्रकार आहे. मुले ते घेत असतात. महानगरपालिकेच्या प्रत्येक वॉर्डातील किराणा मालाच्या दुकानात जे पदार्थ असतात, त्याच्या डेटस् गेलेल्या असतात, त्यात काय केमिकल टाकलेले आहे, त्यात काय पदार्थ टाकला आहे याची चौकशी होणे गरजेचे आहे. फक्त शाळेत सकस आहार दिलातरी बाहेर मिळणा-या पदार्थांत काही घातले असेल तर ते आरोग्यासाठी हानीकारक असणार आहे. इंग्रजी मिडीयमच्या शाळा काढल्यातर नवीन पाऊल टाकले जाईल. स्वेटर, रेनकोट दरवर्षी देण्यात यावेत ही माझी आग्रही मागणी आहे. ठेकेदारांसाठी बंद केलेतरी ठेकेदार कुठेही घुसतील. गोरगरीब विद्यार्थ्यांना या वस्तूंचे नाविण्य असते की, मला काहीतरी मिळणार आहे. स्वेटर मिळणार आहे, रेनकोट मिळणार आहे. म्हणून ते शाळेत येत असतात. माझे आणखी सांगणे आहे, फक्त खाऊ देता. स्वेटर इ. ला गुणवत्ता देत असताना अनेक प्रकारचे शैक्षणिक साहित्य बाजारात उपलब्ध आहे. पुण्यात मी पाहीले आहे. अनेक एनजीओ संस्था आहेत, ज्या खरोखरीच स्वखर्चाने काम करत असतात. किर्लोस्कर कंपनी आहे, जी शैक्षणिक साहित्य पुरविते. अत्यंत सुंदर साहित्य दिले जाते. गणित हा अभ्यासाचा विषय आहे. जी.के.चे पुस्तक देतात. या बजेटचा काही हिस्सा यासाठी वापरला तर नाविण्य बघायला मिळाले तर मुले शाळेत येतात. एखादा धडा शिकवला तर मुलांना समजत नाही पण तेच टि.व्ही.वर कार्टूनमधून शिकवले तर मुलांना लगेच कळते. मुले टि.व्ही.वरचे कार्टून दररोज किमान २ तास तरी बघत असतात. याचा अर्थ त्यांना त्या पद्धतीचे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन दिलेतर महापालिकेच्या शाळेत असे असेल तर विद्यार्थी ते शिकू शकतात, विद्यार्थी संख्या वाढू शकते.

विद्यार्थी संख्या वाढली पाहीजे हे फक्त बोलून चालणार नाही. त्यासाठी पर्याय शोधले पाहीजेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळा हा अत्यंत प्रभावी पर्याय ठरेल. शिक्षकांना इतर कामे सांगू नयेत. त्यांना निवडणूकीचे काम सांगितले जाते. नवीन आयुक्त साहेबांचे पत्र वाचले आहे की शालेय समितीचा अध्यक्ष पालक असला पाहीजे. शिक्षकांना अन्य कामे दिली गेली नाही पाहीजेत. तसे झालेतरच महापालिका शाळेचा दर्जा सुधारु शकतो. पुणे जिल्ह्यात कर्डिलेवाडीतील जिल्हापरिषदेच्या शाळेचा निकाल खाजगी शाळेपेक्षा चांगला, शंभर टक्के आहे. त्यांची स्वतःची शिस्त आहे. कोणीही हस्तक्षेप करु शकत नाही. पहिलीचा विद्यार्थी उलटे पाढे वाचू शकतो. तिथे ब्रिलियंट विद्यार्थी तयार होतात, असे शिक्षक आहेत, असे वातावरण आहे. टि.व्ही. असतो. आज असे नवीन चित्रपट येत आहेत जे मुलांच्या भवितव्यावर, वर्तणुकीवर अवलंबून असतात. यातून आजचा विद्यार्थी घडणार आहे. आम्ही सुद्धा महापालिकेच्या शाळेत शिकलो आहोत. परंतू आजच्या मुलांच्या अपेक्षा वेगळ्या आहेत. त्याची पूर्तता आपण केलीतर आजचा विद्यार्थी राहणार आहे, आपली शाळा राहणार आहे.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,याठिकाणी शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय चर्चेसाठी आला आहे. मला सभागृहात येऊन दोन वर्षे झाली. गेल्या वर्षी शिक्षण मंडळाच्या बजेटवर चर्चा होत असताना अनेक गोष्टी ऐकल्या. नेत्यांच्या तोंडातून शब्द येतो आहे रेनकोट, स्वेटर. परंतु मला याठिकाणी सभागृहाचे लक्ष वेगळ्या गोष्टींकडे वेधायचे आहे. नुसतेच स्वेटर, रेनकोटवर चर्चा करुन भागणार नाही. प्राथमिक शिक्षण मंडळाच्या १३६ शाळा आहेत. मा.क्रिडा समितीचा सभापती या नात्याने मी सांगू इच्छितो की, जी मुले पहिली पासून ७वी पर्यंत शिक्षण घेतात तिथे खेळ हा प्रकार शिल्लक राहिलेला नाही. याचे कारण शिक्षण मंडळाने शोधले नाही. याचे कारण एकच आहे, शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेत क्रिडा शिक्षक नाहीत. तिथे कोणताही खेळ मुलांना शिकविला जात नाही. ही बाब खरेतर शिक्षण मंडळाने गांभिर्याने घ्यायला पाहीजे. प्रत्येक शाळेत एक क्रिडा शिक्षक पाहीजे आहे. या बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करणे गरजेचे होते असे मला वाटते म्हणून हा विषय वाचून सांगतो. क्रिडा विभागाचे क्रिडा शिक्षक गेले ४/५ वर्षे बीएलओच्या कामाला लावले जातात. प्राथमिक शाळेला त्यांचा काही उपयोग नाही. परंतू मला वाटते याठिकाणी अनुदान पद्धतीने शिक्षण नेमण्याबाबत आपल्यात हा विषय होतो म्हणून विनंती करतो. प्राथमिक शाळेवर हे शिक्षक नेमलेतर शहरात अनेक खेळाडू तयार होतील. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शिकणारा खेळाडू राष्ट्रीय खेळाडू होऊ शकतो. यात गांभिर्याने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो. या विषयाबरोबर मला सांगायचे आहे, शिक्षण मंडळाचे बजेट मंजूर केल्यानंतर वर्षभरात शिक्षण मंडळाच्या माध्यमातून कोणताही विचार होत नाही. माझ्या वॉर्डात प्राथमिक शाळेचे आरक्षण क्र. ३५५ आहे. गेले १० वर्षे याकडे दूर्लक्ष झाले आहे. आत्ता माझ्याकडे मुलांना बसायला जागा नाही. खेळायला क्रिंडांगण नाही. गेले २ वर्षे क्रिडा समितीत मी यावर आवाज उठवला आहे. परंतू प्रश्न सुटला आहे का असा प्रश्न मनात येतो. यावर चर्चा झालेली नाही. या बजेटच्या निमित्ताने सांगतो, माझ्या विभागात स्लम एरिया आहे. गरीब विद्यार्थी विद्यार्थिनी आहेत. त्यांना शिकवण्यासाठी, बसण्यासाठी जागेचा अभाव आहे. खेळायला क्रिडांगण नाही. या बजेटबरोबर माझ्या सूचनांचा विचार करुन त्या आरक्षणांबाबत कार्यवाही करुन क्रिडांगण तयार करावे. तिथे

विद्यार्थ्यांसाठी एक शाळा निर्माण करावी. तरच स्लम एरियातील विद्यार्थ्यांना न्याय मिळेल. आपण ख-या अर्थाने बजेटला मान्यता दिली असे सभागृहाला वाटेल अशी विनंती करतो.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बजेटचा विषय आहे. त्याविषयाला माझा विरोध नाही. परंतू शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे. विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. विद्यार्थी कमी होत चालले आहेत मग बजेट का वाढत चालले आहे. या गोष्टीचा ताळमेळ कुठेतरी बसला पाहिजे. खरेतर महापालिकेच्या शाळांचा दर्जा चांगला असेल तर किती शिक्षकांची मुले, किती अधिका-यांची मुले व किती नगरसेवकांची मुले या शाळेत आहेत. एखाद्याची सुद्धा नसतील. गरीबांची मुलेच तिथे जातात. शिक्षकांचीसुद्धा मुले प्रायव्हेट शाळेत असतात. कारण काय हेचकी शाळांना दर्जा नाही. परवा मी केशवनगरमधील मनपाच्या शाळेत गेलो होतो तेव्हा चवथीतील मुलांना पाढा येत नाही, वाचता सुद्धा येत नव्हते. यात तिथल्या शिक्षकांचा दोष नाही. प्रशासकीय कामासाठी शिक्षकांना कामाला लावतोय. जनगणना असेल, मतदार नोंदणी असेल, इतर काही असेल तर. शिक्षकांना त्यांची बेसिक जबाबदारी सांगितली की शिक्षकांनी शिक्षणाव्यतिरिक्त कोणतेही काम करु नये. तरच ते चांगल्या पद्धतीने शिक्षण देतील. केशवनगर शाळेत १७० मुले आहेत. पहिली, चवथी व सातवीचे वर्ग एकत्र बसतात. दुसरी, तिसरी व सहावीचे वर्ग एकत्र बसतात. आत्ता शिक्षकांची संख्या कमीकमी होत ४ झालेली आहे. १७० विद्यार्थीना पहिली ते सातवीपर्यंत ४ शिक्षक शिक्षण देणार असतील तर विद्यार्थ्यांना शिक्षण कसे देतील. विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहेतर शासन मान्यता देणार नाही. हे किती योग्य किंवा अयोग्य आहे याचा आपण विचार करावा. चांगले निर्णय घेऊन जे गोरगरीब विद्यार्थी असतील, ज्यांना खरोखरीच शिक्षणाची जाण असेल त्यांना खरोखरीच शिक्षण मिळाले पाहीजे. जे गरीब आहेत त्यांना मोफत शिक्षण मिळाले पाहीजे. शिक्षणाबरोबर दर्जा सुद्धा पाहीजे. दर्जा नसेल तर शिक्षण कसे देणार. या सर्व गोष्टींचा आपण विचार करावा. शिक्षकांना इलेक्शन ड्युटी किंवा इतर कामे सांगू नयेत. फक्त शिक्षणाचा दर्जा सुधारत येईल तशी कामे द्यावीत. आठवी पर्यंत मुले पास होतच आहेत. शिक्षकही दूर्लक्ष करत असतील. आठवीनंतर बघू या, या गोष्टीचा आढावा घेतला गेला पाहीजे. मुलांना पाढा येतो का, वाचता येते का, लिहिता येते का, गणितातील, इतिहासातील ज्ञान कितपत आहे यात नक्की लक्ष देऊन चौकशी केली पाहीजे. बजेटविषयी तक्रार नाही. बजेट वाढत असताना दर्जा व मुलांची संख्या वाढावी हीच अपेक्षा आहे.

**मा.अपर्णाताई डोके** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर सालाबादप्रमाणे शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय मान्यतेसाठी सभागृहापुढे येत असताना नेहमीप्रमाणे जून महिना आला की शिक्षण मंडळ पेपरमध्ये गाजत असते. ज्या वस्तू आपण मुलांना पुरवतो त्या कधीच वेळेवर देऊ शकत नाही ही सगळ्यात मोठी खंत आहे. ज्या वस्तू देतो, त्या दर्जेदार दिल्या गेल्या पाहीजेत. त्या नामवंत कंपनीच्या असतील, ज्या संस्था या वस्तू पुरवतात त्या संस्था खात्रीने वेळेवर देतील अशा संस्थांनाच काम दिले गेले पाहीजे. शालेय वस्तूंबरोबर बजेटमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विषय असेल, विद्यार्थ्यांमधील वाचनाची आवड दिवसेंदिवस कमी होते आहे, त्यासाठी शाळांमध्ये लायब्ररी असावी. शाळेत वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा घेण्यात याव्यात

ज्या खाजगी शाळांत पाहायला मिळतात. त्याचे नियोजन, त्यासाठीची तरतूद सुद्धा या बजेटमध्ये पाहीजे आहे. इंग्रजी माध्यम स्पर्धेत टिकण्यासाठी अत्यावश्यक आहे. आज मराठीबरोबर  सेमीइंग्रजी-मराठी अशा माध्यमाच्या शाळांना सुरुवात करत असाल तर त्यासाठी निश्चित प्रयत्न असेल पाहीजेत. ऑलिम्पियाड असेल, ऍबॅकस असेल, शहरात खाजगी शाळांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी अनेक पालक नगरसेवकांकडे येतात. शहरात अशा बोटावर मोजण्याइतक्या शाळा आहेत तिथे प्रवेशासाठी पालक दोन/दोन दिवस शाळेच्या गेटवर उभे असतात. अशी परिस्थिती असताना महापालिकेच्या एवढ्या चांगल्या शाळा असताना, एवढे मोठे बजेट देत असताना दर्जा सुधारत नाही. आत्ता आत्मपरिक्षण, आत्मचिंतन करायची वेळ आली आहे. निश्चितपणे वस्तूंबरोबर मुलांना स्पर्धेत टिकण्यासाठी काय देतोय, आरोग्यविषयी जागरुकता असेल तर, मुलांना वेगवेगळ्या गोष्टी कशा देता येतील तसेच खेळांविषयी त्यांना आवड निर्माण करण्यासाठी वेगवेगळे खेळ जसे फूटबॉल असेल, क्रिकेट असेल, बेसबॉल असेल मुलांना अशा चांगल्या गोष्टी कशा उपलब्ध करुन देता येतील, यासाठी बजेटमध्ये थोड्याफार प्रमाणात तरी तरतूद असायला हवी होती. आत्तातरी सुरुवात करायला हवी आहे. या दिशेने वाटचाल असावी असे वाटते. निश्चितच दरवर्षी शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय आल्यावर सदस्य बोलतात पण जे व्हायचे ते होते. म्हणून मी याठिकाणी विनंती करेल की, आपल्या शिक्षणाचा दर्जा व शाळेची व्यवस्था व मुलांना खूप काही शैक्षणिक बाबतीत देण्याचा प्रयत्न करावा हे याठिकाणी मांडते.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर शिक्षण मंडळाचे बजेट मांडलेतर निश्चितपणे सगळ्यांना खूप बोलायचे असते. मोठ्या प्रमाणात चर्चा करायची असते. कारण वस्तुस्थिती तशीच घडते. म्हणून चर्चा करावीशी वाटते. खरेतर सदस्य पाहतोय. १० वर्षांचा आलेख, विद्यार्थी संख्या पाहिलीतर तो आलेख उतरताना दिसतेय. परंतू बजेटचा आलेख मात्र वाढताना दिसतोय. नेमके काय झाले आहे. खरेतर लागणारे साहित्य कमी व्हायला पाहीजे होते. पण हरकत नाही. नेहमी म्हटले जाते, आजचा विद्यार्थी उद्याचा नागरीक आहे. या विद्यार्थ्यांना ख-या अर्थाने जीवंत रुप देण्यासाठी शिक्षण मंडळ किंवा महापालिका काय जबाबदारी पाहतेय. कुठेतरी आपण फक्त खरेदी हे एकच लक्ष्य, हेच शिक्षण मंडळाचे ब्रीदवाक्य आहे. असे न पाहता न विचार करता त्यांनी इथे यादी दिली पाहीजे की, आमचा ३६ शाळांमध्ये मागील वर्षी विद्यार्थी संख्या २० होती ती ३०, ४० ४५ केली असे का होत नाही. प्रत्येक वर्षी हा खर्च हवा आहे, तो खर्च हवा आहे. खर्च पाहता तो खर्च करायचा अधिकार निश्चितपणे आपला आहे असे आम्हाला वाटते. एकही सदस्य इथे नाही म्हणणार नाही, पुन्हा रेनकोट खरेदी, स्वेटर खरेदी. खरोखरच सांगा, आमची सगळ्यांची मुले खाजगी शाळेत शिकतात. आम्ही ३,०००/- महिन्याची फी भरतो. स्वेटर एकदा घेतल्यानंतर ४ वर्षे तरी वापरतो. आर्थिक सक्षम पालकांना दरवर्षी घ्यायची गरज लागत नाही. परंतू गरीब विद्यार्थ्यांनाच का लागते कारण आमचा दर्जाच चांगला नसतो हे निश्चितपणे सांगावे लागेल. आपल्या मोठ्या भावाचा रेनकोट छोटा भाऊ सुद्धा वापरतो. वर्षभर वापरल्या जात नाहीत. परंतू कुठेतरी या वस्तू घेत असताना त्या वस्तूंचा दर्जा क्वालिटी सगळ्या गोष्टी बघणेदेखील गरजेचे आहे. शाळेत मुलांना जे गणवेश वाटतात, तेव्हा त्याचे आधी माप घेतो, शोल्डर, नंतर कंबरेचे

माप सगळ्या गोष्टींचे प्रमाण असते. महापालिकेतील मुलांच्या गणवेशाची अवस्था पहा. गुडघ्यापासून हातभर काच असते, कंबरेचे हुकच नसते, मग कंबरेच्या मधली गॅप असते, असे का होते. कापड घेत असताना त्याचा दर्जा पाहणे माहितच नाही  निविदा प्रक्रिया काढायची, टेंडर प्रोसेस करायची, गणिते मांडायची. आज २६ जानेवारीपर्यंत सुद्धा महापालिकेच्या शाळांतील मुलांना कपडे मिळाले नव्हते. व्हाईट शर्ट, रेड कलरची पॅण्ट मिळाली नव्हती. यावर तुम्ही काय ऍक्शन घेतली. फक्त शिक्षकांवर ऍक्शन घेऊन सगळे प्रश्न मिटत नाहीत. खरेतर तुकड्या कमी होत आहेत त्या मागची कारणे शोधली पाहीजेत. कोणीही म्हणावे, मोठ्या संख्येवर शाळेत विद्यार्थी आहेत का नाहीत. मा.शारदा बाबर म्हणाल्या आहेत, आमची कामवाली म्हणते, आम्ही धुणीभांडी का करतो. आमच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायचे आहे. हा त्यांचा अट्टाहास असतो. पालिकेच्या शाळेत मुलाला चांगले वळण लागणार नाही. ही भिती, धाकधूक तिच्या मनात असते. तिला माहिती असते  तिला तिचे कुटूंब प्रगतीच्या मार्गावर न्यायचे आहे. निश्चितपणे प्रगतीचा मार्ग पालिकेच्या शाळेतून खुंटतो, पालिकेच्या शाळेत मुल घडते अशी खात्री पालिकेच्या शाळेबद्दल वाटली पाहीजे. शिक्षक मुलांना शिकवत नाहीत अशी कोणतीही भूमिका निश्चित नाही. आपल्याकडे जो हस्तक्षेप होतो तो थांबला पाहीजे. डिसेंबरमध्ये, जानेवारीमध्ये, फेब्रुवारीमध्ये शिक्षकांच्या बदल्या करता. कोणत्या वेळेला बदल्या करताय. सद्या करताना हा विचार करत नाही. फेब्रुवारीमध्ये शिक्षण मंडळ बदल्या करत असातीलतर, आपल्याकडे मुल्यमापनाची पद्धत आहे. तिथे वर्षभर मुलगा कसा वागतो त्याचे मुल्यमापन केले जाते. तिथे शिक्षकाची गरज असते. तुम्ही फेब्रुवारीमध्ये तिथे गेल्यावर त्या शिक्षकाचा बायोडाटा तिथे काय असणार आहे. अमक्या म्हणतो, तमक्या म्हणतो, कोण किती देणार, सगळ्या गोष्टी घडतात. शिक्षकाला सांगितले पाहिजे तुम्ही आहे त्याच ठिकाणी त्याने काम केले पाहीजे. कोणीतरी दबाव आणतो किंवा दबाव निर्माण करतो. कोणत्या शिक्षकाने टाचण वही दिली नाही सांगताना लाज वाटते, म्हणून त्या शिक्षकाला शंभर रुपये दंड करतो ही कोणती पद्धत आहे. चो-या केल्यावर अधिकारी त्या चोरीत सापडला तर त्याला दहा रुपये दंड करता. दंड लावताना तिथे ४ शिक्षक काम करत असतील याचा तुम्ही विचार केला पाहीजे होता. हे डॉकीवर्क आहे, ते आपण नंतर पण बघू शकतो. ४/४ महिने स्वच्छता करायला, सुरक्षेसाठी तिथे कर्मचारी नव्हते. त्यावेळी शिक्षकांना कामाला लावले जाते. शिक्षकांना वर्षभर ट्रेनिंगला लावा, त्यांचा प्रकार सुद्धा पहा. मी अनेक वेळा ट्रेनिंगला गेले आहे. ट्रेनिंगची वेळ सकाळी १०.०० ची असते. ११ वा. पर्यंत माहित नसते. आम्हीच टेबल घ्यायचा, खुर्ची घ्यायची मग सन्माननियांची वाट पहायची. ट्रेनिंगसाठी सुरुवात करा. ट्रेनिंग द्यायचे तर खरेच द्या. इंग्रजी ही खरेच काळाची गरज आहे. आपल्या मुलांना इंग्रजीचे शिक्षण दिले पाहीजे. इंग्रजीचे शिक्षण घेण्यासाठी अद्ययावत शिक्षक असले पाहीजेत. त्यांना दर्जेदार ट्रेनिंग दिले पाहीजे. खरेतर राईट टू एज्युकेशनच्या अंडर प्रत्येक मुलाला शिक्षण दिले पाहीजे. शिक्षक भरती का केली गेली नाही, ही पद्धत आहे का. खरेतर शिक्षण मंडळाने निर्णय घ्यावा. निर्धार करावा. दरवर्षीच नाहीतर मागील वर्षीसुद्धा बजेटचा विषय मंजूर केला गेला. मग हा खर्च केला तो केला अनेक गोष्टींवर चर्चा झाली. पुढील वर्षीच्या बजेटमध्ये आणखी १० कोटी वाढवून द्या. काही विशेष नाही. पण शिक्षणाचा दर्जा कसा आहे याचा सुद्धा आलेख द्यावा. लॅबची अवस्था काय आहे. शिक्षकच नाहीत. गणित, विज्ञान विषय कोणीही शिकवू शकतो असा नाही.

त्यासाठी त्या शाखेतील शिक्षण घेतलेला माणूसच असावा लागतो. प्रयोगशाळा कशी शिकविली जाईल. ई-लर्निंगचे शिक्षण खाजगी शाळेतील मुलांना मिळते मग महापालिकेच्या शाळेतील मुलांना का मिळू नये. मुलांना संगणक चालवता येतो का. संगणकांची अवस्था काय आहे ते बघा. संगणकाचे ज्ञान कुठेही दिले जात नाही. या सगळ्या गोष्टींचा पाठपुरावा केला पाहीजे. तो केलातर शाळेचा दर्जा कसा वाढणार नाही. आहे ते शिक्षकच कमी आहे. कासारवाडी शाळेच्या बाजुला थरमॅक्सची शाळा आहे. त्या शाळेत कासारवाडीतली ३० मुले आहेत. त्यांचा दर्जा, त्यांचे शिकवणे पाहून पालक खुष आहेत. मुलांना खरोखरच छान शिक्षण मिळते. तिथे सुद्धा २ पायांचे शिक्षक आहेत व इथे सुद्धा २ पायांचेच शिक्षक आहेत. कुठेतरी त्याचा फॉलोअप केला जावा. शिक्षकांना घंटा मारायला लावतात. कर्मचारी कमी असेल तर शिक्षक येतात. खरेतर त्याठिकाणी शिक्षण मंडळासाठी ज्या गोष्टी सांगीतल्या गेल्या आहेत. यापुढे इथे म्हटले पाहीजे, वाढता आलेख वाढत जावा. जेणेकरुन मुलांना जास्तीत जास्त फायदा मिळेल. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरीक चांगला घडवू शकू. परंतू आपण त्याचा फॉलोअप चांगल्या पद्धतीने केला पाहिजे तो केलातर आपण त्यांना चांगल्या पद्धतीने घडवू शकू.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाचे बजेट दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा गाजणार असे वाटले होते. पण आज जरा उत्साह कमी दिसतोय. मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी सर्वांनी सविस्तर माहिती दिली आहे. मला याठिकाणी बजेटसंदर्भात बोलायचे झालेतर सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यात काटकसर करणे हे अजिबात चुकीचे आहे. मला मा.तानाजी शिंदे यांना विनंती करायची आहे की, त्यांनी स्वतः शाळांना भेटी देऊन तेथील अडीअडचणी सोडवून घेण्यास सुरुवात केली आहे. आयुक्तांमार्फत चांगल्या निर्णयाला सुरुवात केली आहे. याठिकाणी बजेटविषयी बोलत असताना माझे मित्र मा.तानाजी खाडे यांनी सांगितले. महापालिकेने शाळा खरेतर सुरु केली ती मुळातच गोरगरीब, झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी सुरु केली आहे. ही मुले चांगली शिकली पाहीजेत. त्यासाठी आपण प्रयत्न करतोय. रेनकोट, स्वेटरच्या माध्यमातून तरी मुले शाळेत येतील. त्यांना खाऊ वाटप, पुस्तक वाटप, खिचडी वाटप या दृष्टीकोणातून सर्व योजना राबविल्या आहेत. याठिकाणी शाळेत पिण्याच्या पाण्याची फिल्टर यंत्रणा बसविण्यासंदर्भात बजेट केले आहे. मुळात इथे पाण्याचाच प्रॉब्लेम आहे. टाकीत पाणी नसताना फिल्ट्रेशन प्लाण्ट कितपत उपयोगी होईल हा संशोधनाचा विषय आहे. मोटर बंद झालीतर स्थापत्य यांना सांगितले तर कमीतकमी ८/८ दिवस मोटर रिपेअर होत नाही. मोटर चालू झाली नाही, टाकीत पाणी गेले नाहीतर या फिल्ट्रेशनचा काय उपयोग. मा.प्रशांत शितोळे स्थायी समिती अध्यक्ष असताना महापालिका शाळांमध्ये फिल्ट्रेशन प्लाण्ट बसविला होता. नंतर ते कुठे गेले, काय झाले हा आजही लोकांना प्रश्न आहे. वीजरोधक यंत्रणा बसविण्याचा विषय आहे. फॅन चालू नाही, पाणी नाही, ट्युबलाईट नाही असे असताना हे सगळे करणे गरजेचे आहे. हा एक मोठा प्रश्न पडलेला आहे. बालवाडी शिक्षिकांना मानधन देणे खरोखर गरजेचे आहे. लहान मुलांना शिक्षण देणे खूप कष्टाचे असते. हा कित्येक वर्षापासून प्रलंबित विषय होता, तो मार्गी लागला पाहिजे. माझी विनंती राहील, ई-लर्निंग यंत्रणामार्फत बायोमेट्रीक हजेरी हे सगळे करुन प्रश्न सुटणार नाही. बायोमेट्रीक करुन काय होणार आहे. ते सकाळी येणार संध्याकाळी जाणार मधल्या काळात निघून जाणार. शेवटी शिक्षकांमध्ये उत्साह

आला पाहीजे, आपण मुलांना घडवतोय हे घडणे गरजेचे आहे. त्यांनी मुलांना शिकवले पाहीजे. मुलांना शाळेत आणण्यासाठी प्रयत्न केला पाहीजे. मा.सोनकांबळे यांनी सांगितले, कार्टूनच्या माध्यमातून मुलांना एज्युकेशन दिले पाहीजे. प्रॅक्टीकल नॉलेज दिले पाहीजे. त्यांना व्हिजन दिले पाहीजे. मुले २/२ तास कार्टून बघत बसतात. त्या माध्यमातून काहीतरी शिकतील म्हणून प्रयत्न केला पाहीजे. शहरात प्रायव्हेट स्कूलसचा एवढा गदारोळ झाला आहे. या शाळेत कोणी यायला मागत नाही. प्रत्येकाला वाटते माझ्या मुलाने चांगले शिक्षण घेतले पाहीजे. महापालिका शाळांतील पटसंख्या कमी होते आहे आणी फुगा वाढतोय याचे दुःख वाटतेय. काही हरकत नाही. मुलांना खाऊ वाटप, गणवेष, स्वेटर या माध्यमातून काहीतरी दिलेतर मुले शाळेत येतील. विषयाला थोडे डायव्हर्ट करुन मला शिंदे साहेबांना सांगायचे आहे. प्रायव्हेट शाळांवर आपण थोडाफार कंट्रोल ठेवला पाहीजे. मोठमोठ्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी लाखो,करोडो रुपये खर्च करतो. प्रायव्हेट शाळांवर कंट्रोल करण्यासाठी आपल्याला काही अधिकार आहेत का. शासनाच्या माध्यमातून ३०% ॲडमिशन एक लाखापेक्षा कमी उत्पन्न गटातील लोकांना किंवा मागासवर्गीयांना देण्यासाठी कंट्रोल ठेवलेला आहे. यातून पर्याय काढला आहे. ते स्वतः सांगतात, कोणाचातरी दाखला आणा. अमुकअमुक करा, तुम्ही ॲडमिशन घ्या. प्रॅक्टीकली इम्प्लिमेंट होत नाही त्यासाठी आपण काही करु शकणार नाही का. प्रत्येकाला वाटते, माझ्या मुलाला चांगल्या शाळेत ॲडमिशन मिळाले पाहीजे. महापालिकेच्या शाळेत कोणाला नको. परिस्थिती खरोखर तशीच आहे. शिक्षकांना बाकी कामे लावायची व म्हणायचे शिक्षकांना उत्साह नाही. हे शिक्षक जुनी दहावी, बारावी झालेले शिक्षक आहेत. त्यांना कम्प्यूटरचे शिक्षण नाही. आजच्या युगातील ट्रेनिंग त्यांना मिळालेले नाही. त्याची गरज आहे. त्यांना माहित आहे, आपण एकदा महापालिकेत जॉईन झाल्यावर आपल्याला कोणीही काढू शकत नाही. म्हणून ते मनमानी करत असतात. त्यांच्यावर काय कंट्रोल आहे. उदा. देतो, टेल्को कंपनीत सकाळी सकाळी पत्र देतात, उद्यापासून येऊ नका. आजच्या युगाप्रमाणे क्लास वनचा ऑफीसर सुजित पाटील इथे असतील त्यांना माहिती आहे. यांना डायरेक्ट कंपनी पत्र देते की उद्यापासून येऊ नका. का तर त्यांचे जुने शिक्षण आहे. त्याचा नव्या युगाप्रमाणे उपयोग नाही. त्यांना भिती आहे. आपल्याकडे तसे नाही. शिक्षकांना कम्प्यूटर एज्युकेशन माहित नाही. काय उपयोग आहे. मग शिक्षणाला अर्थ आहे का. मग झोपडपट्टीतील गोरगरीबांची, कामगारांची मुले तिथे जाणार. जायचे म्हणून, पाठवायचे म्हणून त्यांना शाळेत पाठवतात. शिक्षकांना सुद्धा शिकवायचे नसते, दिवस भरुन काढायचा व घरी जायचे असते. हिच परिस्थिती अधिकारी वर्गाची आहे. त्यांच्यावर आपण कंट्रोल ठेवताय, भिती निर्माण करताय. या सगळ्या गोष्टी करत असताना त्यांचा दर्जा सुद्धा सुधारण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहीजेत. त्यासाठी मुलांना खेळांसाठी एनकरेज केले पाहीजे. लहान मुले स्पोर्टस् मुळे सर्वात जास्त ॲट्रॅक्ट होतात, एनकरेज होतात. क्रिडा विभाग वेगळा आहे, शाळेचा विभाग वेगळा आहे. शाळेत विचारले तर म्हणतात, आमच्याकडे साहित्य अजून आलेले नाही. प्रायव्हेट शाळेत खेळण्यासाठी क्लासेस असतात. खेळण्यासाठी मुले ॲट्रॅक्ट होतात. इथे परिस्थिती वेगळी आहे. स्वच्छतेचा विषय खूप मोठा आहे. दरवर्षी आपण सदस्य सभेत विषय आल्यानंतर बोलतो. शून्य टक्के सुधारणा झालेल्या आहेत. अजूनही जाऊन बघा. कोणतेही टॉयलेट क्लीन नसून वास येत असतो. कॉन्ट्रॅक्टर वेळोवेळी बदलत असतो. त्याला परिस्थिती ओळखायला वेळ लागतो. मानधनावरील मनुष्य

काय स्वच्छता ठेवणार. आपण तिथे फिल्ट्रेशन प्लाण्ट ठेवायचा म्हणताय. आपण तिथे जाऊ शकत नाही. विचार करण्यासारखी गोष्ट आहे. शिक्षण मंडळ ही स्वायत्त संस्था आहे. पण त्यांना अधिकारच नाही. काहीही गोष्ट असो, तो मान्यतेसाठी आपल्यापुढे पाठवणार. फक्त नावाला स्वायत्त संस्था म्हणून दिले आहे. कोणत्या गोष्टीचा अधिकार त्यांच्याकडे राहीलेला नाही. त्यांना एकदा पूर्ण स्वातंत्र्य देऊन बघा. खरेदी करुन तरी काय काय करणार. कदाचित ते सुद्धा प्रयत्न करत असतील, ते सुद्धा या शहराचे नागरीक आहेत. स्विकृत सदस्य आहेत. शाळांमध्ये सुधारणा व्हावी असे त्यांना सुद्धा वाटते. रेनकोट, स्वेटर इ. साहित्य मुलांना मिळाले पाहीजे, वातावरण चांगले राहीले पाहीजे. पट वाढले पाहीजे. शिक्षणाचा दर्जा चांगला राहीला पाहीजे. नाहीतर कालांतराने शाळा हळूहळू बंद होत चालल्या आहेत. आकुर्डीतल्या शाळेची अशीच परिस्थिती आहे. बजेट मोठे होते आहे व पट कमी होते आहे, कशामुळे असे होते आहे हे परमेश्वरालाच माहित आहे. याचा विचार करायची गरज आहे. इंग्रजी माध्यमामुळे हजारो विद्यार्थ्यांना शिक्षक नाहीत. शिक्षक भरायला आपल्याला काय अडचण आहे. एकिकडे म्हणतो, विद्यार्थी शिकला पाहीजे. शाळा सुधारली पाहीजे. शिक्षणाला दर्जा दिला पाहीजे. शिक्षकच कमी आहेत. थरमॅक्स यांनी दोन शाळा दत्तक घेतल्या. त्यांना चांगला रिस्पॉन्स मिळतोय. अशा संस्थेला/कंपनीला शाळा चालवायला दिल्या पाहीजेत. आपला कंट्रोल कमी होईल. स्टेट लेवलवर इन्कम टॅक्स बेनेफिटसाठी फंड असतात, ते ते वापरतील तर आपल्या बजेटमधील सुद्धा पैसे वाचतील. मुलांना टी-शर्ट - काहीतरी देतील, निदान नावाला गालबोट लागणार नाही म्हणून प्रयत्न करतील. माझी विनंती आहे, टेल्को, बजाज यांना प्रोजेक्ट करायला एनकरेज करा. अमुक अमुक भागातली शाळा घ्या. आपले बजेटसुद्धा असू द्या, त्यांचे सुद्धा असू द्या. स्वतःचे नाव ठेवण्यासाठी, इन्कमटॅक्समध्ये फायदा मिळण्यासाठी वेल्फेअर फंड असतील, सामाजिक काम करायला पाहीजे. त्यांचेही नाव होईल. माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे, सदस्यांना यात इनव्हॉल्व्ह करुन घ्या आणि अप्रोच करा. प्रोजेक्ट करणा-या कंपन्यांना भेटून, त्यांच्या डायरेक्टर यांच्याशी बोलून टेल्को, ऑटो बजाज, फिरोदिया, सॅण्डविक या कंपन्या आहेत. ज्ञानप्रबोधिनी ही शाळा घेण्याचा सुद्धा मागे विचार केला होता. या गोष्टी डेफिनेटली होतील, यात दुमत नाही. गरज आहे पण त्याचबरोबर कंट्रोल करणे गरजेचे आहे. फिल्ट्रेशन बसविण्याआधी पाणी आहे का नाही हे बघणे गरजेचे आहे. फक्त खरेदी करण्यासाठी ते बसवू नका. वीज यंत्रणाही बसवू नका. कुठेतरी फुलफील केले पाहीजे. तिथे परिस्थिती काय आहे. तिथे शहाबाद फरशी ५० वर्षांपूर्वीची आहे, ती बदलत नाहीत. वातावरण निर्मिती करण्यासाठी शाळेतले ऑटमॉसफियर चांगले झाले पाहीजे. नाहीतर आपले आहेच, दरवर्षी कपडे घ्या, बेंच घ्या, साहित्य घ्या. आता लोकांनी प्रॅक्टीकली नॉलेजमध्ये जायला पाहीजे. तू तुझ्या मनाने लिही, मनाने वाच असे झाले पाहीजे, हे तर उलट झाले आहे. विद्यार्थांना इथे बळेबळे पाठवावे लागते. आज स्वेटर मिळणार आहे, आज गणवेश मिळणार आहे. असे नको. मुलांना ऍट्रॅक्शन निर्माण झाले पाहीजे. मुलांना शाळेबद्दल गोडी निर्माण झाली पाहीजे. मुलांना प्राथमिक शिक्षण देणे हा त्यांचा अधिकार आहे. भविष्यात डेफिनेटली तो टप्पा पार करेल. पण त्यासाठी फाऊंडेशन स्ट्रॉंग होणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व सदस्य तुमच्याबरोबर आहेत. तुम्ही सुद्धा त्यासाठी प्रयत्न करा, आम्ही सुद्धा प्रयत्न करतो आहोत.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी गेले दीड तास शिक्षण मंडळावर चर्चा झालेली आहे. परंतू सगळ्यांना परिस्थिती माहित आहे. नळी फुंकीली सोनारे, इकडून तिकडून गेले वारे! याठिकाणी शिक्षण मंडळाचे जबाबदार, भवितव्य घडवतात त्या शिक्षण मंडळाच्या सदस्यांना बजेटच्या वेळेला सभागृहात बसायला परवानगी दिली पाहीजे. कारण येणा-या वर्षात ते त्यावर अंमलबजावणी करणार आहेत. आत्ता आपण जे बोलतोय ते फक्त वर्षातून एकदा. दुसरा मजला, तिसरा मजला यांचा संबंध फक्त बजेटपुरता आहे. त्या व्यतिरिक्त एकही पदाधिकारी त्यांना डिस्टर्ब करायला, काही सांगायला जाऊ शकत नाही. गेलातरी त्याचा काही उपयोग होत नाही. असे असताना सदस्य तिथे कधी येत नाहीत. वर्तमानपत्रात फक्त छापून येण्यासाठी आम्ही बोलायचे किंवा सांगायचे अशी परिस्थिती सभागृहाची आहे. उद्या येथील मिटींगमध्ये या या सदस्यांनी चर्चेत भाग घेतला जे अधिकारी आहेत ते नुसते ऐकायची भूमिका घेत आहेत. त्याची अंमलबजावणी कोण करणार आहेत. मी इथे लक्ष वेधू इच्छिते की, शिक्षण मंडळासाठी कमीत कमी ३४७ कोटी अशा प्रकारचा खर्च बघितला आहे. १०१ कोटी आजचे बजेट आहे. शासनाकडून पगारासाठी ९० कोटी येतात. १८ कोटी सर्वशिक्षा अभियानासाठी येतात. त्याचप्रमाणे माध्यमिक शिक्षण मंडळाचे ३८ कोटी, इन्फ्रास्ट्रक्चरसाठी शाळा मालमत्ता म्हटले जाते यासाठी १०० कोटी. ४३,००० विद्यार्थी प्राथमिक शाळेत आहेत आणि ८ ते ९ हजार विद्यार्थी माध्यमिकमध्ये आहेत. आपण एका विद्यार्थ्यामागे रु.एक लाख दरडोई खर्च करतोय. दर्जेदार प्रायव्हेट शिक्षण संस्थांमध्ये पालकांना एवढा सुद्धा खर्च येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. अत्यंत मोलाच्या सूचना मा.आशा शेंडगे, मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.उल्हास शेट्टी यांनी मांडल्या आहेत. त्या सूचनांचा पुढील वर्षात सहभाग करुन घेणार आहात का. तर त्याचे उत्तर नाही असे आहे. या सूचनांचा चांगला उपयोग करता येत नाही असे अजिबात नाही. तशी इच्छाशक्ती असावी लागते, मानसिकता असावी लागते. आपल्याला ही नाही असे म्हणता येणार नाही. तळवडे इथे मा.शांताराम भालेकर यांच्या वॉर्डात महापालिकेची शाळा आहे. त्या शाळेला आदर्श शाळा म्हणून बक्षिस मिळाले आहे. शेजारच्या सिनटेल कंपनीतल्या चैत्राली ईनामदार या शिक्षिका आहेत. त्या स्वतःचा वेळ देऊन मुलांना संगणक शिकवतात. त्यांनी कम्प्यूटर सुद्धा दिले होते. औषधी वनस्पतींचे प्लाण्टेशन तिथे केले आहे. त्यात नगरसेवकांचा सुद्धा बरोबरीचा सहभाग आहे. ही जबाबदारी फक्त प्रशासनाची आहे का, फक्त शिक्षकांची आहे का, फक्त पालकांची आहे का. तर सगळ्या नगरसेवकांची सुद्धा तेवढीच जबाबदारी आहे हे ओळखून प्रत्येकाने याठिकाणी बोलले पाहीजे. मी स्वतः तळवडेची शाळा बघितली आहे. मा.शांताराम भालेकर यांच्या वॉर्डातल्या शाळेत जशा प्रकारचे घडले आहे, ते दुस-या शाळेत घडू शकत नाही का याचे सुद्धा आत्मपरिक्षण केले पाहीजे. काही ठिकाणी बो-हाडे वस्ती इथे काही ठिकाणी नव्याने शाळा झाल्या आहेत. जाधववाडीतल्या शाळेत बसायला जागा नाही. व्हरांड्यात बसून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. असी वाईट परिस्थिती शाळांची आहे. त्याबाबतीत म्हणावे तेवढे कमी आहे. खरेदी बाबतीत मा.आप्पा बारणे एकदा म्हणाले होते, मुन्नीपेक्षा शिक्षण मंडळ जास्त बदनाम झाले आहे. माझी स्वतःची जागा आहे. डॉ. श्रीकर परदेशी यांनी शिक्षणासाठी नांदेड इथे चांगला पॅटर्न राबविला होता. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे नाव झाले होते. इकडे येऊन महापालिकेचा,सगळ्यांचा चेहरामोहरा बदलून टाकला. परंतू शिक्षण मंडळ बदलू शकले नाहीत. जर परदेशी बदलू शकले नाहीत तर मला वाटत नाही ते

बदलायची कोणाच्यात ताकद नाही. ते सुद्धा हतबल झाले. आमच्या सूचना आहेत. जसे खाजगी शाळेत बोलले गेले. मा.अपर्णाताई डोके यांनी सांगितले, २/२ दिवस लाईनमध्ये थांबून सुद्धा ॲडमिशन मिळत नाही. जकात समानिकरणामुळे १८९ कोटींची तूट झाली आहे. अशा वेळेला डोळे झाकून बजेटमध्ये वाढ करतोय. असे असताना प्रायव्हेट शाळा आहेत, यांना आपल्या शाळांची आरक्षणे आहेत. ती डेव्हलप करायला दिली, त्यात ५० टक्के गोरगरीब मुलांना, स्थानिक मुलांना मोफत शिक्षण द्यायचे अशी अट घालून ते प्लॉट डेव्हलप केलेतर त्याचा निश्चित फायदा होणार आहे. आपले जे चालले आहे ते येणा-या काळात करु शकतो का नाही माहित नाही. शिक्षण मंडळाच्या शाळा अनुदानित आहेत. जर खाजगी अनुदानित शाळांचा दर्जा घसरत नाही, मग आपलाच दर्जा का घसरतो, याचा विचार केला पाहिजे. आपले नगरसेवक ज्यांना या कामामध्ये रस आहे, त्यांना शिक्षण मंडळाच्या लोकांना इथे सूचना करा. नगरसेवकांना टक्केवारी बाकीच्यांना देऊ नका ज्यांच्या सूचना आहेत त्या सभागृहात सहभागी करुन घ्या. त्या सूचना त्यांनी अंमलात आणा. अशा प्रकारचे शिक्षण मंडळाचे सदस्य यांना सुद्धा सांगावे. मग त्या मा.आशा शेंडगे असतील, मा.चंद्रकांता सोनकांबळे असतील. शिक्षण मंडळाच्या विभागप्रमुख मा.ऊबाळे या तर हैराण आहेत. काही ऑर्डर दिल्या गेल्या. काही ऑर्डर मागे घ्याव्या लागल्या. त्यांचे अजूनही कामावर पूर्ण प्रभुत्व आलेले नाही. मा.रामदास बोकड यांनी सांगितले. क्रिडा विभागाची काय परिस्थीत आहे. कोंडे साहेब असताना क्रिडा प्रबोधिनीला सुरुवात केली होती. त्याची आजची परिस्थिती काय आहे. आज चौकशी करा. चांगल्या प्रकारचे शिक्षण देऊन, शिक्षकांना मानधन देऊन, मुलांना दोनही वेळचे जेवण देऊन रहायची सोय असताना सुद्धा शिक्षणाचा दर्जा खालावला आहे. बजेट कमी झाले आहे. मा.शरद बो-हाडे यांचा सुद्धा मुलगा तिथे शिक्षण घेते होता. परंतु दर्जा नाही असे म्हणून आपणच बदनाम करायचे. लोक आपल्यालाच उलट बोलतात. मग आपण सुधारणा काय करतोय. मा.महापौर साहेब, नुसते ऐकून घेऊ नका काही सूचना करावी. आपले ऐकतील. वस्तुस्थिती ऐकून घेऊन निश्चितपणे बजेट मंजूर न करता सन्मा. सदस्यांनी ज्या महत्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यांचा यात अंतर्भाव झाला पाहीजे, त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे. यावर्षी आम्ही पाठिंबा देतोय. परंतू या सूचनांचा अंतर्भाव यात झाला नाहीतर पुढील वर्षी आम्ही पाठिंबा देणार नाही असे जाहीर सांगते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाच्या बजेट आणि चर्चा झाली नाही असे कोणतेही वर्ष गेलेले नाही. काम तसे जोराचे असते म्हणून चर्चा सुद्धा जोराची असते. आपण शिक्षण मंडळ डोळ्यासमोर ठेवून चर्चा करत असतो. त्यांचे काम जर चोख असेल तर आपणच आपल्यामधून नेमलेल्या काही सदस्यांमधून चोख काम झाले. विशेष लक्ष दिले गेलेतर विशेषतः शिक्षणाच्या कामात, ज्ञानार्जनाच्या कामात. दुर्दैवाने त्याकडे जास्त लक्ष आमचे शिक्षण मंडळ देत नाही असे मला सांगावेसे वाटते. आयुक्त साहेब, याठिकाणी आपण सुद्धा थोडेसे केले पाहीजे. मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिक्षण मंडळ सुधारण्याच्या दृष्टीने दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने जी पाऊले उचलली आहेत त्यांचे पुन्हा एकदा बजेटच्या निमित्ताने अभिनंदन करते. ते स्वतः त्याठिकाणी शाळेत जात आहेत. तिथे गोंधळ असेल तर त्याप्रमाणे नोंद करत आहेत. सूचना देत आहेत. आवश्यक असेलतर ताबडतोब बदली करत आहेत. मी

प्रत्यक्ष पाहिले आहे. आपण शाळेत जाताय. तुम्ही मनापासून बदल करावा असे प्रयत्न करत आहात. म्हणून आत्ताच सांगितले, आम्ही बोलणार व पेपरमध्ये फक्त नाव यावे. यासाठी चर्चा केली यासाठी बोलत नाही. आपण मनापासून काम करताय. या सूचनांचा अंतर्भाव असावा असे वाटते. काही सूचना सांगणार आहे. सर्वांत सुरुवातीला बालवाडीबाबतीत बोलले होते. आपल्या शहरात जिल्हा परिषदेने काढलेल्या अंगणवाड्या सुद्धा आहेत. अंगणवाडी शिक्षक व मदतनीस यांचा महामोर्चा टि.व्हीवर पाहिला. तेव्हा लक्षात आले, आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये एका प्रभागात निदान ७ ते ८ अंगणवाड्या आहेत. त्यांनाही शासन पगार देते. आपण शासनाचे अधिकारी आहात. आयुक्त साहेब, आपण या गोष्टीकडे विशेषतः गांभिर्याने लक्ष द्या. त्यांनी आपल्या महापालिकेची किंवा शिक्षण मंडळाची कधी एनओसी घेतली का, नाही, मग एवढ्या ढिगाने अंगणवाड्या कशाला? त्यांचे काम काय, यायचे कोप-यावर थांबायचे, मुलांना गोळा करायचे, पौष्टीक आहार आणलाय तो द्यायचा, काम संपले की घरी जायचे. हिच मुले पुढे आपल्या बालवाडीत येत असतात. बालवाडी शिक्षिकांना पगार वाढ द्या, याला माझा विरोध नाही. परंतू त्यांच्याकडून आपण शिक्षण मंडळाच्या ज्या शाळा, बालवाड्यांतले विद्यार्थी तरी पुढे जावेत, त्याने पहिलीला ऍडमिशन घ्यावी. असे होत नाही. अंगणवाड्या किती ते पहा. झेड.पी.कडून त्याची नोंद घ्या. किती विद्यार्थी आपल्याकडे आहेत हे बालवाडी शिक्षिकांना प्रशिक्षित  करा. त्यांनी कधी प्रशिक्षित केले आहे का. त्या विद्यार्थ्यांना छोटी-छोटी कविता पोएमस् आल्या पाहीजेत. अपर के.जी.त प्रायव्हेट शाळेत विद्यार्थी जातात. ते जे शिकतात, ते या विद्यार्थ्यांना येते का. प्राथमिक शाळेत जात असताना बालवाडी सुद्धा जोडली आहे. कृपा करुन त्याची सुद्धा पाहणी करा हे आवर्जून सांगते. बालवाडी, आंगणवाडी याची यादी करा. हेच विद्यार्थ्यी आपल्याकडे येतात. शासनाचा पगार यांना जातो आहे. मुले शिकली पाहीजेत. त्यांना आले पाहीजे. त्यांनी अभ्यास केला पाहीजे. त्यांच्याकडून करुन घेतले पाहीजे. चांगल्या प्रकारे लिहून घेतले पाहीजे. किंवा पाठांतर करुन घेतले पाहीजे. म्हणजे पैशाचे चीज झाले असे वाटेल. महापालिकेचा दर्जा, दर्जा-दर्जा, प्रत्येकाच्या तोंडातून हेच ऐकले आहे. शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी दर्जा कोणाचा, कोणाच्या तुलनेत दर्जा पाहतोय. शहरात एवढ्या शाळा आहेत. खाजगी संस्थांच्या शाळा आहेत. त्यांच्याबरोबर आपली स्पर्धा होऊ द्यात. अत्यंत अल्पसंतुष्ट, आत्मसंतुष्ट असे आपले शिक्षण मंडळ आहे. झोपडपट्टीपासून बंगल्यापर्यंत आपण प्रॉपर्टी टॅक्स घेतो आहोत. मग सगळ्या मुलांबरोबर बाहेरच्या शाळांबरोबर त्यांच्या स्पर्धा घेतल्या पाहीजेत. खेळाच्या स्पर्धा सुद्धा फक्त महापालिकेचे शिक्षण मंडळ व आपण यांच्यातच स्पर्धा होत असते. यांच्यातच बक्षिस दिलेले असते. महापालिका कोणाची आहे. संपूर्ण नागरीकांची आहे, जनतेची आहे. मग फक्त आपला संकुचित विचार सोडून बाहेरच्या प्रायव्हेट संस्थांबरोबर स्पर्धा केलीतर आपला दर्जा आपल्याला कळेल. आपल्याकडून दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न होतील. शिक्षकांबाबतीत आत्ता सांगितले. मा.आशा शेंडगेताईंनी सांगितले, विनंती करुन सांगितले, शिक्षकांकडे जर टाचण नसेल तर त्या दिवसाचे शिक्षण द्यायला त्यांची तयारी नसते. ते हे शिक्षण देऊ शकत नाही. आपण सुद्धा शिक्षक आहोत. आपण तयारीनिशी वर्गावर जात असाल तर आपली सुद्धा हिच अपेक्षा या शिक्षकांकडून असेल. हे काहीतरी उपाययोजना गरजेच्या असतील तर टाचण आवश्यक आहे. शिक्षकांना नवनवीन शिक्षणाबाबतीत नवीन तंत्रज्ञान शिकविण्यासाठी आपण किती शिक्षकांना

प्रशिक्षणासाठी पाठवतो. त्यांची सोय करतो का. काहीतरी रिव्हिजन व्हायला पाहीजे. आपण तेच तेच वाचत राहीलात तर मुलांना नाविण्य वाटणार नाही. संगणकबाबतीत सांगते, मा.ऊबाळेताईंना सांगायचे आहे, आपण पत्रव्यवहार चेक करुन पहा. एकतर हाताने लिहिलेले किंवा बाहेरुन टाईप करुन आणलेले पत्र आहे. आपल्याकडे शाळेत संगणकच कार्यरत नाहीत. किती शिक्षकांना संगणक दिलेले आहे. त्याबाबतीत आपण सोय केली पाहिजे. आपल्या संगणकावर पत्रव्यवहार झाला पाहीजे. प्रत्येक शाळेत वर्गाच्या प्रमाणात, विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात प्रशिक्षणासाठी संगणक ठेवले पाहीजेत. नाहीतर आपल्या शिक्षण मंडळाच्या शिक्षणाला काही अर्थ राहणार नाही. शिक्षकांच्या मोठ्या रजाकाळात जे शिक्षक भरले जातात, त्यांना शासनाकडून पगार मिळतो का. आपण असे शिक्षक का भरत नाहीत. कोणत्याही शाळेत शिक्षक ३ महिने/६ महिने रजेवर गेल्यावर त्यांच्या जागी दुसरा शिक्षक भरत नाहीत. त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. आपण सुपरवायजर कोणासाठी नेमलेले आहेत. त्या-त्या शाळांसाठी नेमलेले आहेत. ४/५ शाळांमध्ये लक्ष ठेवण्यासाठी नेमलेले असतात. मग त्यांना महापालिकेच्या या इमारतीत बसवून क्लेरिकल वर्क करुन घेतो. फक्त आलेल्या पत्राला उत्तर देणे व परत पत्र पाठवणे. ते अर्धा तासासाठी शाळेवर देऊन काय सुपरविजन करतात. माझा याला आक्षेप आहे. यासाठी त्यांना शिक्षण मंडळाच्या कार्यालयात बसविणे बंद करा. त्यांनी शाळेतच बसले पाहीजे. शाळेवर सुपरविजन केली पाहीजे. शिक्षक वर्गावर जात नाहीत का हे पाहणे एकट्या मुख्याध्यापकांना शक्य नसते म्हणून ते आहेत. शिक्षण अधिका-यांच्या हाताखाली काम करण्यासाठी ते नाहीत. त्यांचे काम त्यांना करु द्या. खरेतर शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक करताना शिक्षण मंडळातील सभासदाने डोळसपणे चेक करायला पाहिजे होते. रेनकोट, स्वेटर हा फक्त सारा गोंधळ आहे. आपल्या शाळेतून आपण भूगोल विषय बाद केला आहे का. नकाशा व तक्ते यासाठी काय तरतूद केली आहे, झिरो. तुम्हाला विषय माहित असतील. सगळे सुशिक्षित आहेत. माझा माझ्याच सहका-यांवर आरोप आहे, त्यांनी बजेट करताना अजिबात लक्ष दिलेले नाही. त्यानंतर शिष्यवृत्तीसाठी आपण किती तरतूद ठेवली आहे. आपण जी शिष्यवृत्ती देतो, त्याची काहीच सोय नाही, झिरो आहे. महिला बालकल्याणकडून शिष्यवृत्ती दिली जाते. शाळेकडून दिली जात नाही मग इथे ५० लाख इतकी तरतूद कशासाठी ठेवली आहे. विद्यार्थी साहित्य – गणवेशाबाबत सगळे बोलले आहेत. दृकश्रवण यंत्र/साहित्य – विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान देणारे, प्रात्यक्षिक दाखवणारे. त्यासाठी झिरो बजेट ठेवले आहे. म्हणजे आपण मुलांना प्रत्यक्षात काही दाखवणारच नाही का. ती वस्तु त्यांच्यासमोर ठेवणार नाही का शास्त्र असू द्या, भूगोल असू द्या. सगळ्या विषयात समोर ठेवावे लागते. त्याशिवाय तो विषय विद्यार्थ्यांवर बिंबवता येत नाही. त्याची समज येत नाही. शिक्षकांना नवीन ज्ञान द्यायचे असेल तर शिक्षकांचे प्रशिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. प्रशिक्षणासाठी १ लाख खर्च म्हणजे एकाही प्रशिक्षणाला पुरणार नाही. फार वाईट वाटते, प्रयोगशाळेसाठी किती तरतूद ठेवली आहे. झिरो बजेट ठेवले आहे. काय म्हणावे या शिक्षण मंडळाला. त्यांना दिसले नाही का. काय म्हणावे या अधिका-यांना. प्रयोगशाळा कशा चालणार. नियतकालिके – यात नवनवीन माहिती असते. सायन्सची इंग्रजी, मराठीतूनही काही असतात. त्यासाठी काही तरतूद केली पाहिजे. बाल ग्रंथालय - यासाठी झिरो बजेट म्हणजे शिक्षणाच्या दृष्टीने आपले बजेट झिरो. प्राथमिक शाळांमध्ये बाल ग्रंथालये नाहीत. अजून सुद्धा अनेक शाळांमधून ग्रामीण भागातून, जिल्हा

परिषदेच्या शाळेतून पटसंख्या वाढवण्यासाठी ग्रंथालयांसाठी बजेटचा उपयोग केला जातो. आपल्याकडे बाल ग्रंथालय नाही. मग मुलांना वाचनाची आवड कशी निर्माण होईल. मग पटसंख्या का घसरणार नाही. शास्त्र साहित्य – ५१ नंबरचे आहे. शिक्षकांकडून आपण काय अपेक्षा करावी. त्यासाठी झिरो बजेट आहे. शिक्षण मंडळातील सगळ्या हिरोंना हे कळावे आपण काय बजेट मांडले आहे. विज्ञान प्रदर्शन – इथेसुद्धा झिरो बजेट आहे. खाजगी शाळांमध्ये या विज्ञान युगात सगळीकडे खूप मोठ्या प्रमाणात खर्च करतात. त्यामानाने मुलांना शिक्षण मिळतेय, ज्ञान मिळते आहे. आणि आपल्याकडे शिकवण्याचे राहू दे काय शिकवतात पण एखादा विद्यार्थी घरातील मार्गदर्शनामुळे, शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे ८०% पर्यंत गेला असेल म्हणजे महापालिकेच्या शिक्षण मंडळातील शिक्षण खूप सुधारले आहे असे मुळीच समजू नये. त्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून बजेटचा उपयोग विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विचार झाला असतातर, तसे मांडले गेला असतेतर हे बजेट खरोखर चांगले झाले असते. आपण आयुक्त म्हणून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. म्हणून सागंते, इथे शून्य शून्य लिहीले असेलतरी हे तुम्ही पुन्हा मंजूर करुन घ्या.  शिक्षणाच्या दृष्टीने काही बाबी आहेत. त्या पुन्हा ॲड करा. तुम्ही पुन्हा एकदा ज्या भेटी देत आहात, आवश्यकता आहेच. मा.जयंत नारळीकरांसारखे शास्त्रज्ञ आपल्याबरोबर येतात.

माध्यमिक शिक्षणाबाबतीत सुद्धा हेच आहे. त्याठिकाणी सुद्धा तुम्ही जायला सुरुवात करा. विद्यार्थ्यांना खरोखर घडवणारे हे संस्कारांचे वय असते. पाचवी ते दहावीचे वय अतिशय संवेदनशील वय असते. चांगले संस्कार त्यांच्यावर झाले नाहीतर तर तो विद्यार्थी वाया जाईल. आजचे मुल उद्याचा नागरीक आहे. तो आदर्श घडवावा. तो सुशिक्षित काय पण सुसंस्कारीत व्हावा या दृष्टीकोणातून प्रयत्न करावा नाहीतर आम्ही जातो. तुम्ही गेलात तर तुम्हाला काय अनुभव आहे माहिती नाही. तुम्ही अचानक भेट द्या.  उद्या शाळेत येतो म्हणून जाऊ नका. मी तापकीर ताई, बारणे ताई त्या मुलाचे असे झाले म्हणून गेलो. त्याठिकाणी आजारी पडायची वेळ आली आहे. मुख्याध्यापकांच्या खोलीत सुद्धा आम्ही बसू शकलो नाही, इतकी भयानक दुर्गंधी. शिक्षकांनी सगळ्या बाबींकडे लक्ष दिले पाहीजे. मुख्याध्यापकांना सांगितले, पगार फक्त घ्यायचा नसतो. त्याचा काही प्रमाणात उपयोग विद्यार्थ्यांसाठी केलातर बिघडत नाही. ते समाधान आयुष्यभर टिकते. हे त्यांच्या मनावर थोडेसे बिंबवा. आपणही त्यात भाग घेतला पाहीजे. आपला सुद्धा त्यात सहभाग असावा त्या दृष्टीने संपूर्ण शिक्षण मंडळाकडे आपण दृष्टी वळवली आहे. बजेटला पुन्हा एकदा शुभेच्छा देते. शिक्षण मंडळाच्या सर्व सदस्यांना सदबुद्धी देवो अशी प्रार्थना करते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्यावेळी शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय येतो, त्यावेळी सगळेजण या विषयावर बोलतो. मला वाटते, सभागृहातून बाहेर गेल्यानंतर प्रत्येक सदस्य त्या-त्या वार्डातल्या शाळेचा अध्यक्ष असतील, तिथे जाऊन ते कामकाज करत असतील. खरेतर त्या-त्या भागातील सगळे नगरसेवक त्या शाळेचा अध्यक्ष आहे असे मी मानते. तरीसुद्धा ओरड का येते हाच खरा प्रश्न निर्माण झाला आहे. जसे मघाशी माझ्या एका भगिनीने सांगितले, मा.शांताराम भालेकर यांच्या शाळेत ते स्वतः वैयक्तिक लक्ष देतात. शाळेचा दर्जा खूप सुधारला आहे. योजना चांगल्या होतात. सर्व बाजुंनी सर्वगुणसंपन्न

अशी शाळा आहे. प्रत्येकाने त्यांच्या वॉर्डातल्या शाळेत अध्यक्ष आहेत तिथे लक्ष ठेवावे. जे अध्यक्ष नाहीत पण काम करायची इच्छा आहे त्यांना त्या शाळेवर अध्यक्ष म्हणून नेमण्यात येईल, त्यांनी तिथे काम करावे अशी सगळ्या नगरसेवकांना विनंती करते. प्रत्येकाने तेच तेच मुद्दे मांडले आहेत. मलाही तेच मुद्दे मांडायचे आहेत अशातला भाग नाही. मला असे वाटते, अध्यक्ष होत येत नसेल तरी सभासद व्हा. आम्ही मुले दत्तक घेऊ शकतो. आपण आयुक्त साहेबांचे कौतुक केले पाहीजे. ते म्हणाले होते, पाणी कोणत्या बाजुने वळवायचे, रस्ता आपण काढायचा असतो. त्या दृष्टीकोणातून सभागृहात बजेट मंजूर करायचे असेल तर कोणत्याही सदस्याने दोन मुले दत्तक घेतली तर त्यासाठी कोणत्या सदस्याची ना नाही. तर तो त्याच्या वॉर्डातल्या शाळेचा अध्यक्ष होऊ शकतो हे तुम्हाला सांगते. त्यामुळे सगळे नगरसेवक/नगरसेविका शाळेचे अध्यक्ष होऊ शकतात. प्रत्येकाला हे सगळे माहित आहे. फक्त शिक्षण मंडळामध्ये ज्यावेळी चर्चा होते. खूप पारदर्शक काम करायचा प्रयत्न शिक्षण मंडळाचे सदस्य करतात. परंतू येरे माझ्या मागल्या. त्यांची प्रतिमा खराब करायची प्रत्येकाच्या मनाची तयारी झाली आहे. शिक्षण मंडळ म्हणजे फक्त बूट, फक्त स्वेटर, फक्त रेनकोट, आणि खिचडी याशिवाय दुसरे काय आहे असे मला वाटत नाही. म्हणून आमचा रोल जास्त आहे असो वाटत नाही तुमचा रोल यात जास्त आहे. म्हणून त्या पद्धतीने आपण कामकाज करुन घ्यावे. मी काही सांगणार आहे, त्या उपसूचना समजून घेतल्या तरीसुद्धा हरकत नाही. मदारी माकडाचा खेळ करत असताना त्याला अमिष देतो. त्याला हातात फळ देतो. खेळ केल्यामुळे आपल्याला फळ मिळणार आहे हे त्याला माहित असते. पाण्यात डॉल्फीन असते, मासे असतात, त्यांना वाटते चांगला खेळ करुन दिलातर, माझा मालक मला खायला देणार आहे. आम्ही आमच्या मुलांना असे समजायचे का. मला दप्तर देणार, बूट देणार, स्वेटर देणार म्हणून मी शाळेत जाणार आहे. तुम्ही हे सगळे या मुलांना नका देऊ. मी आत्ता मा.चंद्रकांता सोनकांबळे यांच्याशी चर्चा केली. आपण एकदा परदेशात गेले होतो. तिथे डॉल्फीन माशाने काय केले. त्याचा खायचा टाईम ठरलेला असतो. नाहीतर त्याला उपाशी ठेवले जाते म्हणून तो ते काम करत असतो. मुलांना सुद्धा वळण लावायची गरज पडलेली आहे. आपण सुद्धा कुठेतरी नाही म्हणायची सवय ठेवली पाहीजे. पूर्वी विद्यार्थ्यांना छडी मारत होते. आत्ता छडी पण मारायची नाही नाहीतर शिक्षक तुरुंगात जातात. मग करायचे कसे शिक्षणाची गुणवत्ता कशी वाढणार. म्हणून कुठेतरी चांगले निर्णय घेतले पाहीजेत. दप्तर खरेदी असेल, रेनकोट असेल, सगळ्या वस्तू डायरेक्ट कंपनीकडून मागवा. जास्त पैसे जाऊ देत. म्हणतात कंपनीकडून घेतले तर रेट जास्त पडतो. बाटाच्या अधिका-यांना इथे खुलासा करायला लावा. कंपनीला ब्रँड ठेवा, जे पुरवतात ते ओरिजनल असावे. ३ वर्षे तरी ती वस्तू खराब होता कामा नये. तशी अट टेंडरमध्ये टाका. एक वर्षाचे वॉरंटी पिरीयड द्या. दप्तर, रेनकोट, स्वेटर दरवर्षी कशाला लागतात. मला आठवत नाही मी माझ्या मुलांना दरवर्षी युनिफॉर्मस् शिवले नाहीत. स्वेटर दरवर्षी घेतला नाही. मी सुद्धा एक युनिफॉर्म वर्षभर वापरत होते. दर वर्षाला दप्तर कशासाठी लागते. नाही म्हणायला शिकले पाहीजे. मुले मनाने शिकली पाहीजेत. अमिष दाखवून मुले शिकली नाही पाहीजेत. जोपर्यंत शिक्षण कडक होत नाही, तोपर्यंत शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही. म्हणून शिक्षणाचा दर्जा हा कडक झाला पाहीजे. शिक्षकांचे निश्चित शाळेत प्रत्येक ठिकाणी ट्रेनिंग असते, त्याठिकाणी सांगितले, काही बोलता येत नाही. मग डोळा वर करुन बोलायचे का. मारणे म्हणजे अघोरी

मारणे यासाठी कायदा आहे. बाकीच्या गोष्टींना काय कायदा आहे. तू अभ्यास का केला नाही म्हणून काय कायदा आहे का. अति. आयुक्तांना यात दुरुस्ती करुन घेतली पाहीजे. शिक्षकांनी कसे शिकले पाहीजे. ट्रेनिंगचे प्रमाण वाढले पाहीजे. पहिलीपासून इंग्रजी माध्यम असले पाहीजे. जसे कंपनीला दिले आहे, तशी दत्तक योजना सुरु झाली पाहीजे. प्रस्ताव कोणी दिला होता. पिंपरी चिंचवड मधील मराठी माध्यमाच्या नामांकित शाळा ४/४ लोकांना दत्तक द्या. त्या शाळा दत्तक घ्यायला जे तयार आहेत त्यांना द्यायला काय हरकत आहे. महापौर साहेब, माझी विनंती आहे की, शाळेच्या बजेटमध्ये काटछाट करुन प्रत्येक शाळेत कॅमेरे बसवावेत. अक्षर सुधार झाला पाहीजे. आम्ही नेवाळे वस्ती इथे रु.३,०००/- देऊन अक्षर सुधारण्यासाठी महिला नेमली. क्लास घेतला. बजेटमध्ये का आले नाही. अक्षर सुधार झाला पाहीजे. इंग्रजी लिहिता, वाचता आले पाहीजे. चांगली खेळणी मिळाली पाहीजेत. आत्ता मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी सांगितले, किर्लोस्कर कंपनी शिक्षण साहित्य देते. असे दर्जेदार शिक्षण साहित्य घेतले पाहीजे. कंपनीकडून ब्रॅण्डेड साहित्य घेतले पाहीजे. टेंडरसुद्धा कंपन्यांनाच दिले पाहीजेत. पिंपरी चिंचवड शहरातून काही कार्यकर्त्या ट्रेनिंगसाठी यशदामध्ये गेल्या होत्या. आम्ही ज्यावेळी गेलो त्यावेळी समजले की, किशोरवयीन किंवा वयात आलेल्या मुलींसाठी टॉयलेट सुद्धा स्वच्छ नसतात. टॉयलेटमध्ये पाणी नसते. काही राज्यांत योजना राबविली गेलेली आहे. किशोरवयीन मुलींसाठी नॅपकीन्स दर महिन्याच्या महिन्याला दिले गेले पाहीजेत. ही योजना राज्यभर चालणार आहे. म्हणून यात माझी उपसूचना म्हणून घ्यावी. आपल्या सदस्यांवर विश्वास ठेवावा व शिक्षण मंडळाचे चांगल्या पद्धतीने कामकाज झाले पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त करते. टेंडरचा महिना ठरवा. त्याच महिन्यात टेंडर काढले गेले पाहीजेत व कंपन्यांना दिले गेले पाहीजेत. ही सुद्धा माझी उपसूचना आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला बोलायला संधी दिल्याबद्दल मा.महापौर साहेब यांचे आभार मानतो. शिक्षण मंडळाचा सन २०१३-१४ च्या बजेटचा विषय घेतला आहे. सन २०१३-१४चे सुधारीत व सन २०१४-१५ चे अंदाजपत्रक पास करतोय. ही भाषा काय आहे ते समजले नाही. ख-या अर्थाने आधीच खर्च केला आहे. ७५ लाखांचे, रु,१,४०,०००/- चे टेंडर निघणार आहे. यावर मी हरकत घेतली आहे. मी विचारले,सन २०१४-१५ चे टेंडर काढता का. नियमाप्रमाणे असे काढता येत नाही. वाढीव टेंडर काढून सुद्धा आज विचारतात, पैसे द्या म्हणून. पैसे नसताना टेंडर कसे काढले होते. यात लक्ष द्या. सभागृहाला शिक्षण मंडळ अंधारात ठेवतेय. पैसे खर्च करण्यासाठी सगळे लिहिलेले आहे. अशी वस्तुस्थिती असताना असे का करतात. सभागृहातील सगळे लोक गोंधळले आहेत का. म्हणून वाढीव पद्धतीने टेंडर काढून टाकले आहे. मी परदेशी साहेबांना पत्र दिले होते. ते गेल्यानंतर आपणच त्यावर सही केली होती. मला माहित नाही पण सही झालेली आहे. असे का घडतेय. आयुक्तांच्या अंडर शिक्षण मंडळ येते. शिक्षण मंडळ कशा पद्धतीने खर्च करते याची आयुक्त साहेबांना कल्पना असते. इथे बूट देतो, स्वेटर देतो, दप्तर देतो. आजची परिस्थिती आयुक्त साहेबांना सांगितली आहे. ते शाळेत व्हिजिट देतात. ज्या वस्तू देतो, त्याठिकाणी गेल्यावर पालकांना विचारण्यापेक्षा मुलांना विचारा, बुट कुठे आहे, दप्तर कुठे आहे, स्वेटर व्यवस्थित आहे

का. मुलांच्या अंगावर स्वेटर कधी दिसला आहे का, याची चौकशी करा. याचा पंचनामा करा. तिथल्या स्थानिक नगरसेवकाला बरोबर घ्या. स्वेटर, दप्तर हयात आहेत का. माझ्या माहितीप्रमाणे त्या टेंडरमध्ये ७ टेंडर आले होते. त्यापैकी ४ टेंडर एकाच मालकाच्या नावाचे होते. इन्कम टॅक्स एकाच मालकाचा, असे असताना त्याने टेंजर भरले. जकात बंद झाली असलीतरी गेली १०/१२ वर्षे एकच मालक शिक्षण मंडळाला माल सप्लाय करतोय. त्याने जकात भरली का, का मटेरिअल घरातून आणले का बाहेरुन आणले आहे. त्याने करोडो रुपयांची जकात बुडवली आहे. हे आयुक्त साहेबांच्या लक्षात आणून देतो. तो ठेकेदार दरवर्षी ३ कोटी रुपये कॅश बँकेतून विड्रॉ करतो. हे बूट, स्वेटर, दप्तर कोणी कॅश घेऊ शकत नाही. दरवर्षी कॅश केलेले ३ कोटी कुठे जातात, त्याने इन्कमटॅक्स भरला का नाही याची चौकशी करा. गेले १० वर्षे काम करणारा माणूस ३ कोटी कॅश काढून कोणाला देतो. काय कॅलक्युलेशन करतोय. महापालिकेच्या पैशाची अशी विल्हेवाट लावत असालतर त्यातून महापालिकेची बदनामी होते. बूट बाबतीत किस्सा सांगायचा, जे बूटाचे टेंडर भरले गेले. माझ्याकडे पुरावा आहे. कंपनीने २ वर्षे बूटाचे मॅन्युफॅक्चरींग बंद केले आहे. मग ते बुट कुठून आणले. त्याच्या गोडाऊनमधून रिजेक्ट झालेले मटेरिअल मुलांना दिले आहे. चौकशी करा. ४० से.मी. कापडाची लहान मुलाला चड्डी होते. ४० से.मी. मध्ये शर्ट होतो. १/२ मी. कापड घेतले तर मार्केटमध्ये ते रु.१८०/- मिळते. होलसेलमध्ये २०/- त चड्डी व शर्ट शिवून दिली जाते. आपल्या मुलांना जे ड्रेस देतो, त्याला रु.६८०/- पडतात. रु.४००/- पर ड्रेस कुठे जातात याची चौकशी करा. हा खेळखंडोबा कशाला चालतोय. आम्ही दरवर्षी लाखो रुपये भरतोय. हा जनतेचा टॅक्सचा पैसा आहे. आत्ता त्यांना स्वायत्तता द्या अशी मागणी झाली. त्यांना स्वायत्तता दिलीतर महापालिका विकून खातील. नगरसेवकांचा अंकुश आहे म्हणून ते अजून शांत आहेत. एलबीटी चालू होऊन एक वर्ष व्हायला आले. तो ५० कोटी, १०० कोटींचा माल आणताना त्याने एलबीटीचा नंबर घेतला आहे का याची चौकशी करा. तो बाहेरुन मटेरिअल आणतोय. पुण्यात कुठे बुटाचे मॅनिफेक्चरिंग होत नाही. दप्तर इथे मिळत नाही. तो मटेरिअल बाहेरून आणतोय. असे असताना त्याला एलबीटी भरायला लावा. छोटे-छोटे अनेक प्रश्न आहेत. शिक्षण मंडळाचा दर्जाच घसरत चालला आहे हे मान्य करतो. पोरगा आलातर लगेच कळते. कॉर्पोरेशनच्या शाळेतला पोरगा आहे. तुमची किती मुले महापालिकेच्या शाळेत आहेत. महापालिकेच्या शाळेत येणा-या मुलांसाठी करा. आपली मुले १/२ लाख डोनेशन देऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. टाय, बुट, शर्ट. मा.तानाजी खाडे आपण सद्य परिस्थिती मांडली त्याच्याशी एकनिष्ठ रहा, एकनिष्ठ राहीलात तर सर्व मिळेल. देखरेख करणे हे नगरसेवकाचे काम आहे. तुमचा अंकुश पाहीजे. शिक्षण मंडळाला विचारा, मुलाचा ड्रेस कसा आहे, दप्तर आहे का. मुलांना विचारा, सगळे डुप्लिकेट आहे. एकाला ६० लाख, दुस-याला ४५ लाख आम्ही आमच्या तोंडाने बोलू शकत नाही. बाकीच्यांना ३०/३० लाख, हा आकडा आमच्यापर्यंत आलेला आहे. खायचे किती खायचे का आख्खा बुंधाच खायचा. मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले. बूट, स्वेटर पुरवणा-या अनेक कंपन्या आहेत. त्या कंपन्यांचे प्रस्ताव मागवा. फार फार चालले आहे हे कुठेतरी थांबले पाहीजे. परदेशी साहेबांनी सांगितले होते, केस करा. साहेबांना कोणी दम दिला. साहेबांनी केस विड्रॉ केली. सगळ्यांवर अंकुश बसला असता. म्हणून महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे, आपण महापौर आहात. शाळांना व्हिजिट करा. शाळेत क्वालिटीचे शिक्षण मिळते का नाही एवढेच बोलू शकतो.

डांबरीकरणाचे किती से.मी. झाले, किती खड्डे भरले हे तर आपण समजू शकत नाही. फक्त शिक्षक पाहीजेत हे बोलू शकतो. परवा आयुक्त साहेबांकडे बसलो होतो तिथे ६ महिला आल्या होत्या. त्या अक्षरशः रडत होत्या. त्यांना रु.८०/- रोज दिला जातो. इथे रु.३,५००/- लिहिले आहेत. आपण यांना रु.२,०००/- देतोय. प्रत्येक महिलेचे रु.१५००/- त्या ठेकेदाराच्या खिशात जात आहेत. गरीबाला पैसे द्या ना. ज्या महिला काम करतात त्या रडून सांगत होत्या. ठेकेदार त्यांना दम देतो. घरची कामे करायला सांगतो. सुट्टीच्या दिवशी घरी काम करायला बोलवतो. मी स्वतः डोळ्याने पाहिले आहे. हे थांबले पाहीजे नाहीतर महापालिका भिकारी व्हायला वेळ लागणार नाही. कुठेतरी अंकुश ठेवा ही कळकळीची विनंती आहे. मा.मंगलाताई कदम, मा.सुलभाताई ऊबाळे या सगळ्या महिला नगरसेविकांना बरोबर घेऊन दाखवा. काय मटेरिअल दिले आहे ते पहा. एवढी चौकशी केलीतर सगळ्यांवर चेक बसेल.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ करिता दिलेल्या उपसुचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४७४ विषय क्रमांक - ४
दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/१९५१/२०१४,दि.७/१/२०१४
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६४० दि.१६/१/२०१४

शिक्षण मंडळाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१०६,१६,६२,०००/- चे व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१०१,८६,२२,०००/- मान्यतेकामी सादर केलेले असल्याने त्यास तसेच शिक्षण मंडळासाठी पुढीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेबाबत विनंती आहे

| तपशील | तरतूद वाढ कोटीमध्ये |
|---|---|
| १) दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना रेनकोट देण्यात यावेत. | (र.रु.१.२० लाख) |
| २) दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात यावेत. | (र.रु.१.७५ लाख) |
| ३) मनपा शाळांच्या सर्व इमारतीवर वीज रोधक यंत्रणा बसविणे | (र.रु.२.०० लाख) |
| ४) ई-लर्नींग प्रकल्प मनपा शाळेत चालू करणे | (र.रु.१.५० लाख) |

(एकूण अपेक्षित वाढ रक्कम रुपये ६ कोटी ४५ लाख फक्त)

वरीलप्रमाणे १ ते ४ किमान संयुक्तीक मागण्यांबाबत आपण आपल्या अधिकारामध्ये तरतुदीमध्ये वाढ करणे अथवा नव्याने तरतूद करणे बाबत. मा.स्थायी समिती सभेमध्ये निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

तसेच उपरोक्त विषयानुसार सन २०१४-१५ च्या तरतुदीमध्ये सर्व प्राथमिक शाळांसाठी १) वीजरोधक यंत्रणा २) पिण्याचे पाणी फिल्टरेशन यंत्रणा ३) एलइडी स्क्रीनसाठी मा.शिक्षण मंडळ समितीने प्रस्तावित केलेले होते. ते मंजूर करणेत यावे. ४) सर्व विद्यार्थ्यांना

रेनकोट/स्वेटर सालाबादाप्रमाणे याही वर्षी दिले जावेत यासाठी आवश्यक तरतूद व्हावी.५) बालवाडी शिक्षकांची मानधन वाढीची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. सध्या देण्यात येत असलेले मानधन अपुरे आहे. ६) तसेच स्थायी आस्थापना खर्चामध्ये वाढ करणेत यावी. ७) ई-लर्नींग यंत्रणा व बायोमॅट्रीक हजेरी यंत्रणा प्रत्येक शाळेमध्ये बसविणेकामी आवश्यक तरतुद करणे गरजेचे आहे. वरीलप्रमाणे १ ते ७ मागण्यांबाबत तरतुदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच बुट, रेनकोट, स्वेटर कंपनीकडून खरेदी करणेत यावेत. अल्पवयीन मुलींना दर महिना नॅपकिन देणेत यावेत. शालेय साहित्य / खेळणी ब्रँण्डेड कंपनीकडून खरेदी करणेत यावेत. सर्व शाळांमधून / वर्गांमधून कॅमेरे बसविणेत यावेत, अक्षर सुधार योजना राबविणेत यावी. सेमी इंग्लिश / इंग्लिश शाळा, इंग्रजी माध्यम शाळा सुरु करणेत याव्यात. नामांकित शाळांना शाळा दत्तक देणेत याव्यात. याप्रमाणे अंमलबजावणी करुन एकाच महिन्यात सर्व टेंडर पब्लिश करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड शिक्षण मंडळ अंतर्गत बालवाडी शिक्षिका कार्यरत आहेत. त्यांना सध्या मिळणारे मानधन अत्यंत कमी आहे. त्यामध्ये वाढ करणेबाबतची मागणी अनेक दिवसांपासुन प्रलंबित आहे. पुढीलप्रमाणे मानधन टप्प्यानुसार वाढविणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

| अ.क्र. | तपशिल/मानधन टप्पा | सध्याचे मानधन | मागणीनुसार वाढविणेचे मानधन |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५ वर्ष सेवा पुर्ण | ३५००/- | ७०००/- |
| २ | ५.१ ते १० वर्ष सेवा | ४०००/- | ८०००/- |
| ३ | १०.१ ते १५ वर्ष सेवा | ४५००/- | ९०००/- |
| ४ | १५.१ ते २० वर्ष सेवा | ५०००/- | १००००/- |
| ५ | २० वर्षांच्या पुढील सेवा झालेल्या सर्व बालवाडीताई शिक्षिका / सेविका | ५५००/- | ११०००/- |

वरीलप्रमाणे बालवाडीताई शिक्षिका व सेविका यांच्या मानधनामध्ये टप्प्यानुसार वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) सदरचा विषय वाढीव खर्चासह मान्य करण्यात येत आहे.

(४) शिक्षकांना प्रशिक्षण (Training) देणेबाबत वाढीव खर्चास मान्यता देण्यात येत आहे. ३० लाख वाढीव तरतूद करण्यास (मूळ अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदी व्यतिरिक्त) मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४७३ विषय क्रमांक - ९
दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृक्ष/४/कावि/२०/२०१४, दि.२४/०१/२०१४.
**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५८२६ दि.०७/०२/२०१४

मनपाच्या वृक्षप्राधिकरणाचे सन २०१३-१४ चे सुधारीत र.रू.१५,२८,२१,०००/- व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.१५,२८,२१,०००/- प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या वृक्ष प्राधिकरण ठराव क्र.९ दि.१८/१२/२०१३ चे अंदाजपत्रकास तपशिलाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –
अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, यानंतर विषय क्रमांक २, ३७ व ३८ या क्रमांकाने विषय घ्यावेत अशी विनंती आहे. आरोग्यचा विषय आहे. दुसरा टॅक्स संदर्भातील विषय आहे. २४X७ चा जेएनएनयूआरएम अंतर्गत विषय केंद्र शासनाकडे पाठवायचा आहे. म्हणून सभागृहाच्या वतीने विनंती करण्यात येत आहे.

मा.महापौर – विषय क्रमांक २,३७ व ३८ प्राधान्याने घेणेत येत आहेत.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २
दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/५/कावि/८८८/२०१३, दि.१६/१२/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५५७५ दि.१६/१/२०१४

सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींची फी/शुल्क सोबतचे प्रपत्र अ व ब प्रमाणे निश्चित तसेच प्रपत्र 'ब' मध्ये प्रशासकीय सेवाशुल्क प्रती बीलास पूर्वी ५ रुपये होते ते १० रुपये प्रति बीलास करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचा विषय आहे. आपल्या सगळ्यांना माहित असेल, शास्तीकर, त्याच्या रुपाने सामान्य नागरीकांच्या मनगटावर एक मोठे भूत बसले आहे. आपण मा.महापालिका सभेमधून, १ पट शास्तीकर घ्यावा असा प्रस्ताव पाठवला होता. शासनाने तो प्रस्ताव विखंडीत करुन परत एकदा दुप्पट आकारणी करायला सांगितले आहे. आपल्याला माहित आहे, तत्कालिन आयुक्तांनी त्यावेळी शासनाने ठराव विखंडीत केल्यामुळे त्यावेळी मागच्या वर्षाचा, २ वर्षांचा शास्ती कर, चालू कर वेगळा, दुप्पट शास्ती कर २ वर्षांचा वेगळा. सध्या महागाई खूप आहे. अशा प्रकारे सक्तीने शास्तीकर वसूल केलातर निश्चितपणे ते अन्यायकारक आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून किंवा काही निमित्ताने टॅक्समध्ये वाढ केली नाही म्हणून आपले अभिनंदन करते. माझी उपसूचना आहे की, मनपाकडून दुप्पट शास्तीकर वसूल केला जात आहे. त्यामुळे नागरिकांवर आर्थिक बोजा वाढल्यामुळे शास्तीकराचा दंड रद्द होत नाही तोपर्यंत येणा-या पुढील वर्षामधील सर्व वर्षांमध्ये मिळकत कर आहे तसा ठेवणेत यावा.

**मा.अश्विनी (चिखले) मराठे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा,आयुक्त साहेब, याठिकाणी सुलभाताईंनी शास्तीकरासंदर्भातील विषय मांडला आहे. यावर्षी व मागील वर्षी आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना २००८ नंतर जी बांधकामे झाली आहेत, त्यांना शास्ती कर लागू केला व ज्या पद्धतीने वसूली करण्यात आली आहे. एक नगरसेवक म्हणून सर्वजण असा प्रयत्न करत आले आहेत. नागरीकांना शास्तीकर भरावा लागू नये त्या दृष्टीने प्रत्येकजण आपआपल्या पद्धतीने प्रयत्न करतोय. अनधिकृत बांधकामांबाबत निर्णय झाला. दंडाचा सुद्धा निर्णय होईल. माझी सगळ्या सभागृहाला विनंती आहे की, मागील वर्षी पहिल्यांदा आपण मूळ कर आहे तो घेण्याची सूचना केली होती. त्या पद्धतीने करा. आपण सुरुवातीच्या काळात ओरिजनल टॅक्स भरायला मुभा दिली होती. त्याप्रमाणे भरतो. पहिल्यांदा शास्ती/दंड घेण्यात यावा अशी सूचना केली. त्यामुळे नागरीक शास्ती/दंड भरु शकत नाहीत. आज मंदीच्या वातावरणात हे अन्यायकारक आहे. कायदेशीर बाबी तपासून घ्याव्यात. परंतू मी विनंती करतो, ओरिजिनल टॅक्स घेण्यात यावा. उर्वरीत शास्ती/दंड आहे तो जेव्हा शासनात निर्णय लागेल तेव्हा घेण्यात यावा. रोज जी बेंडबाजी महापालिकेत सुरु केली आहे ती कोणत्याही नगरसेवकाला माहित नाही. लोकांच्या दारात बँण्ड वाजवतात. नागरीक आम्हाला फोन करतात, महापालिकेचे पथक आमच्या दारात येऊन बँण्ड वाजवतेय. तुम्ही सुद्धा पदाधिका-यांना विश्वासात घेतले पाहीजे होते. असे प्रशासनाने विश्वासात न घेता कारवाई केलीतर ते योग्य नाही. आज एवढ्या मोठ्या प्रमाणात मंदी आहे. एमआयडीसीतले कारखाने बंद होत आहेत. अशा पद्धतीने नागरीक दंड भरु शकत नाहीत. अशा पद्धतीने वागणूक दिली जाते. खरेतर हे अन्यायकारक आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, यासंदर्भात प्रशासनाकडून खुलासा घ्यावा. शास्ती/दंड भरायला मुभा द्यावी. अनधिकृत बांधकामासंदर्भात समजू शकतो, कोर्टाचा आदेश झाला म्हणून कारवाई करावी

लागते. यात कुठेतरी सवलत दिली पाहिजे. इतर महापालिकांत यासंदर्भात नेमके काय करतात. का फक्त पिंपरी चिंचवडमधील नागरीकांना असा दंड भरावा लागतो याचा सुद्धा खुलासा सभागृहात करावा अशी विनंती आहे.

**मा.भानुदास गायकवाड** (सहा.आयुक्त, करसंकलन) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,एवढ्या बांधकाम शास्तीबाबत महाराष्ट्र शासनाने २००८चा जो काही अधिनियम अंमलात आणला होता. त्याच्या तरतुदीकरिता अधिनियमांत बदल करुन २६७अ कलम अंतर्भूत केले. २००८ नंतरची बांधकामे जी काही अनधिकृत/अवैध बांधकामे आहेत, त्यांना २६७अ नुसार मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती आकारण्यात आला. आपल्या महापालिकेने सुरुवातीला या शास्तीबद्दल दोन्ही समित्या मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभा या दोघांनी दुप्पट शास्तीचा प्रस्ताव फेटाळला होता. यात शासनाने पुन्हा बदल करुन कलम २६७ अ प्रमाणे शासनाने शास्ती आकारावी अशी सूचना प्रशासनाला दिली होती. त्याअनुषंगाने आपल्या प्रशासनामार्फत सन २०१२-१३ आणि २०१३-१४ या दोन आर्थिक वर्षांमध्येच शास्ती आकारण्यात आलेली आहे. आपली पहिली आकारणी होती ती सन २०१२-१३ चा दि.८/३/२०११ चा ठराव विखंडीत झाल्यानंतर एक पट आकारणी होती. त्यानंतर आपण दुप्पट शास्ती लावून आकारण्यात आली होती. म्हणजे मूळ सामान्य कराच्या एक पट व त्यावर पुन्हा दुप्पट ***1+1*** अशी दुप्पट झाली आहे. मालमत्ता करात ज्या काही गोष्टी अंतर्भूत राहतात, त्यात सामान्य कर असतो, साफसफाई कर, अग्निशमन कर असतो. समजा रु.१००/- कर असेलतर त्यावर दुप्पट शास्ती म्हणून रु.२००/- आकारतात. त्यामुळे आजअखेर २००८ नंतरची एकूण ४३,३९२ बांधकामे शहरात आहेत. त्यावरसन २०१२-१३ व २०१३-१४ या दोनच आर्थिक वर्षांत शास्ती कर आकारण्यात आला आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे २००८ पासून आकारणे अपेक्षित होते. परंतु आपण तो सन २०११-१२ पासून न आकारता रेट्रोस्पेक्टिव्ह इफेक्टिव्ह होईल म्हणून वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षांसाठी आकारलेले आहे. आपण यात कायदा सल्लागार यांचे मत घेतले होते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, एकेकाने बोलल्यानंतर मग सगळ्यांना साहेबांनी उत्तर द्यावे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाच्या विषयावर एक तास हात वर केलातरी मला बोलायला दिले नाही. इलेक्शन आहेत म्हणून का होईना कोणतेही कर वाढवले नाहीत. पुढच्या वेळेस आकारणार नाही असे काही होणार नाही. पुढच्या वेळेस दुप्पट शास्ती कर लावला तसा कर सुद्धा वाढवणार आहेत. जेएनएयूआरएम फंड घेतला म्हणून कर वाढवणे बंधनकारक आहे. पण राजकीय मतांसाठी फायदा कसा होईल हे पाहिले गेले आहे. मतदाराचे हित पाहिलेले नाही. रेडझोनमधील बांधकामे कधीच नियमित करु शकणार नाही मग तिथे सर्वसामान्य कर सुद्धा आकारला नाही पाहीजे. जी बांधकामे तुम्ही नियमित करुच शकत नाही, त्यांना शास्ती कर लावायचा कसा. मग त्यांनी पहिल्यांदा एक रुपयासुद्धा भरला नाही पाहीजे. रस्ता करायचा तर रेड झोन आहे, ड्रेनेज लाईन करायची रेड झोन आहे मग शास्ती कर कसा स्विकारता. खरेतर यावर बहिष्कार टाकला पाहीजे. नागरिकांना सुविधा देत नाही मग

कर कसा घेताय. उद्या बांधकामे पाडायची म्हटले तर उद्या त्यांना हात घालणार आहात. बांधकामे नियमित करु शकणार नाही मग शास्ती कर कसला घेतोय. एकिकडे शासन निर्णयाची वाट बघतोय, २००८ नंतरची बांधकामे नियमित होतील. दूर्दैवाने तसे झाली काय. मग बांधकामे पाडावी लागतील. आरक्षणातली बांधकामे पाडावी लागतील. आजच त्यांना शास्तीकरातून वगळा. आपल्याच वागण्यात विरोधाभास आहे. एकिकडे बांधकामे नियमित करणार अशी गोड गाजर दाखवले जातेय. दुसरीकडे ही बांधकामे कधीच नियमित करु शकत नाही म्हणून त्यांच्याकडून शास्तीकर घेतोय. किचकट योजना आहे. जो आपला अधिकार आहे तो निश्चितपणे इथे महापौर साहेब आपण बजावला पाहीजे. ग्रीन झोन असेल, रेड झोन असेल, पूररेषेतली बांधकामे असतील, आरक्षणातली असतील, जी कायद्याप्रमाणे नियमित करता येणार नाहीत अशा सर्व बांधकामांवरील शास्ती कर सुद्धा घेऊ नये अशी याठिकाणी विनंती आहे. जर आपण घेतलाच तर आपण डिप्लोमॅटिक आहोत हे लोकांना वेगळे सांगायची गरज राहणार नाही. मी याठिकाणी आवाहन करणार आहे की, तुम्ही शास्ती कर भरलाच नाही पाहीजे. एकदा डिसीजन घ्या. बिल्डींग पुढे घेऊन खुशाल बँण्डबाजा वाजवतात. परवा माझ्या १२ नं.च्या बिल्डींगसमोर बँडबाजी चालू होती. मला फोन आला. परवा १२ नंबरच्या बिल्डींगमधील २/३ लोक होते. ७००/८०० रुपयांसाठी बँड बाजा वाजवून त्यांची इज्जत काढताय. जो मनुष्य आयुष्यभर इज्जतीसाठी मरमर करतो त्यांचे तुम्ही असे करताय. मोठमोठ्या शिक्षण संस्थांच्या दारात उभे करत नाहीत. त्यांच्यासमोर बँड वाजवा. १२००/१३०० असे बील होते, त्यासाठी तिकडे तुमचे लोक बँड वाजवत आले. मिळकतींचे पुर्नसर्वेक्षण करतोय. भोसरीत पुर्नसर्वेक्षण करुन दाखवा. किती मिळकती आहेत ते मी दाखवते. त्यांचे फेर सर्वेक्षण करायला गेलेले अधिका-यांना विचारा, हात पाय काढून टाका, बघतो तुझ्याकडे, काय काय घाण घाण बोलतात. तुम्हाला माहित सुद्धा नाही. मनगटाच्या बळावर घाबरवतात, त्यांना घाबरता आणि जे नियमाने चालतात त्यांना नियम दाखवता. बँड वाजवून बेईज्जत करुन तुम्ही कोणाकडून असे पैसे वसूल करू शकत नाही. ज्यांच्या रकमा मोठ्या आहेत, त्यांना बँड वाजवून दाखवा. छोट्या-छोट्या लोकांना का दाखवताय. मोठे थकबाकीदार आहेत त्यांच्या दारापुढे आपले लोक गेले पाहीजेत. महापौर साहेब, सभागृहात आज सांगा रेडझोनमुळे लोकांनां शास्तीकरात पूर्णपणे सूट दिली पाहीजे. तुम्ही त्यांचा एक रुपयासुद्धा देणे लागत नाही जोपर्यंत तिथून रेड झोन जात नाही, तोपर्यंत तुम्ही त्यांचा शास्ती करच काय पण सामान्य कर सुद्धा वसूल करु शकत नाही. रोज उठून ऐकतो, पेपरमध्ये वाचतो. आज काय यांनी मिटींग घेतली, उद्या काय त्यांनी मिटींग घेतली. रेड झोन जाणार, रेडझोन जाणार, गेले २० वर्षांपासून मी राजकारणात आहे तेव्हापासून ऐकतेय. तेव्हापासून आजपर्यंत रेड झोन जाईल असेच ऐकतोय. गेलेला पाहिलाच नाही. खरेतर आपल्या हातात असताना सुद्धा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आत्ता निवेदनांचा खेळ चालला आहे. सगळ्यांचे एकच निवेदन सूचना असती, महाराष्ट्र शासनाला, मा.मुख्यमंत्र्यांना एकच मागितले असते तर त्यातून तोडगा निघाला असता. परंतू आपण तसे न करता जिल्हाधिका-यांनी रेड झोनची हद्द मोजली. शपथ पत्राद्वारे हायकोर्टात सांगितले, मग मतांचा खेळ चालू आहे. रेड झोन आज जाणार, उद्या जाणार. महापौर साहेब, यातून सांगायचे तात्पर्य एकच आहे, पहिले रेड झोन घालवायचा होता तर जिल्हाधिका-यांच्या हातात असताना जिल्हाधिका-यांना त्यांचा हात धरुन सांगू शकत होतो, त्यांना आपण सांगितले नाही. रेड झोन

जाणार नाही. परंतू शास्ती कराचे भूत मानगुटीवर ठेवले आहे. दरवर्षी तीनपट वाढणार का. दरवर्षी १० टक्के कर वाढणार आहे. जेएनएनयूआरएमचा बॉण्ड लिहून दिला आहे. आपल्याला बाईंडींग आहे. १० टक्के वाढवून तुम्ही सुद्धा नियमबाह्य वागता. तुम्हाला कोणी नियम सांगायचा. आम्ही काय करायचे. मग कोणत्या निवडणूका आमदारकीच्या, खासदारकीच्या दोन्ही निवडणूक होऊन गेलेल्या असतात. मग २० टक्के वाढवायचे. कारण तसे ॲग्रीमेंट केलेले आहे. तुमच्यासाठी सत्तेचा वापर होता का तुम्ही सत्तेचा वापर करताय. पुढील वेळी लोकांनी काय करायचे. जसे २००९-१० ला मिटर बसवले. सन २०१२-१३ मध्ये बील आले. पाणीपट्टी थकली ती कशामुळे थकली. मला २ वर्षे बीलच आले नाही. माझ्या मीटरमध्ये वाढ झाली , का तर स्लॅब बदलला, म्हणून त्याचा भूर्दंड मलाच. त्यासाठी खेटा मारायच्या. पहिले बील भरा, नंतर बघू असे एमएसईबीसारखे तुमचे कर्मचारी सांगताहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, पुढील वर्षी टॅक्स वाढवून येणार आहे का, येणार नसेल तर तसे तुम्ही याठिकाणी सांगितले पाहीजे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा जो दरवाढीचा विषय सभागृहात आला आहे. त्याबाबत करसंकलन अधिकारी यांनी खुलासा द्यावा. खरेतर याची नोंद आपण घ्यावी. करसंकलनचा विषय आहे. खरेतर या विषयात शास्तीकराचा विषय आहे. जास्त करुन आमच्या भागात हा शास्तीकराचा विषय आहे. शास्तीकराचा विषय असताना मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले, शास्तीकर घेण्याआधी मूळ रक्कम भरायला जातो. करयोग्य मूल्य भरायला जातो. पहिला शास्तीकर द्या नंतर टॅक्स घेण्याच्या माध्यमातून करसंकलन विभागाला आपल्या हेडऑफीसमधून तशा सूचना केल्या आहेत. माझी आपल्याला पहिली विनंती आहे, पत्रकार बांधवांना विनंती करतो, जोपर्यंत अनधिकृत बांधकामांचा विषय होत नाही, तोपर्यंत कोणीही शास्तीकर भरु नये. २००८ नंतरचे बांधकाम लिगल होणार का नाही हा गौण विषय आहे. परंतू आद औद्योगिक मंदी आहे. कारखानदारी बंद आहे. घरदार विकून लोक गावाला चालले आहेत. घर विकून झोपडी बांधावी किंवा भाड्याच्या घरात राहावे का असा सर्वसामान्य नागरीकांना प्रश्न पडला आहे. रु. १००/- टॅक्स असेलतर त्यावर २००/- शास्ती लागते. माझी आपल्याला विनंती आहे की, रु.१००/- ला किती टक्के वाढ होते. एकिकडे २४ टक्के करयोग्य मूल्य, ५ टक्के साफसफाई कर, २ टक्के शिक्षण कर, अग्निशामक कर ४ टक्के असे जवळजवळ ३० ते ३५ टक्के टॅक्स वाढतो. फक्त ३००/- वाढलेत असे सांगतात. परंतू एका मिळकतीला १००/- टॅक्स मागे रु.५० ते ६० टॅक्स या पटीने वाढतात. हा रेडझोनचा विषय मा.सिमा सावळे यांनी काढला. ज्यांची प्रॉपर्टी रेडझोनमध्ये येते, जी लिगल होणार नसेल तर त्यांच्याकडून टॅक्स घेण्याचा अधिकार कसा आहे. तुम्ही त्यांना एकिकडे सुविधा देणार नाहीत. त्यांची कामेही करत नाहीत. मग त्यांनी टॅक्स का भरायचा. मी जाहीर आवाहन करतोय, मग या लोकांनी टॅक्स भरु नका. बँड वाजवायचे नवीन फॅड काढले आहे. आम्हाला लग्नासाठी बँडवाले मिळत नव्हते. बँडवाले म्हणतात आम्ही कॉर्पोरेशनसाठी बुक आहोत. हा अतिशय निंदनीय प्रकार चालू आहे. ५ लाख/१० लाख मोठी रक्कम असेल तिथे हरकत नाही. पण महापालिकेच्या माध्यमातून आपल्यात गटस् नाहीत असे म्हणावे लागेल. बँडवाले आणायचे म्हणजे तुमच्या अधिका-यांकडे कर वसूल करायचे गटस् नाहीत. इथे नवीन पद्धत आणली आहे. सभागृहात कोणी विषय

आणला आहे. चिखली गावात कुदळवाडी-चिखली रोडला आपला अंदाधुंद कारभार समोर आणायचा प्रयत्न करतोय. स्वाईन रोड बीआरटी रोड चालू आहे. तिथे ४/५ वर्षांपूर्वी नागरीकांची घरे काढून बाजूला घेतली आहेत, घरे पाडलेली आहेत, तिथे काहीच नाही. महापालिकेचा रस्ता झाला आहे. स्वतःहून कोणताही मोबदला घेतला नाही, अशा लोकांना टॅक्स नोटीसा आल्या आहेत. त्यांच्या घरापुढे बँड वाजवताय. असा तुमचा चुकीचा कारभार चालू आहे. दुसरे वर्ष आहे. श्री.सदाशिव बाबुराव बालगरे हे बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांचे संपूर्ण घर पाडले आहे. त्या माणसाने त्याची संपूर्ण प्रॉपर्टी, त्यांचे राहते घर रस्त्यासाठी दिले होते. लग्नाच्या हॉलमध्ये त्यांनी त्यांचा प्रपंज ठेवला आहे. घर पाडून ५ वर्षे झाली आहेत. २००७च्या दरम्यान घर पाडले होते. तरीसुद्धा आज त्यांना शास्तीकर, पूर्वीची थकबाकी अशी ५ ते ७ लाख रुपये बील आले आहे. कोणताही टिडीआर, एफएसआय दिलेला नाही. त्यांना टॅक्स लावतोय, यापेक्षा निंदनीय बाब काय आहे. त्यांना फाशी घ्यावी लागेल. डोळे झाकून अंदाधुंद कारभार करताय. कमीत कमी ६ जण आहेत. ताबडतोब खुलासा करावा. अन्यथा या लोकांना तुमच्या दारापुढे उपोषणाला बसवू. आयुक्त साहेबांनी यात लक्ष घालावे. नाहीतर तुमच्या दारापुढे आम्ही बँण्डबाजा वाजवू की तुम्ही चुकीचे काम करताय. आम्ही सुद्धा बँड वाजवू शकतो. तुमच्यासमोर तुमच्या नावाने डी.जे, ढोल काही पण आणू. तुमचा निषेध करु. तुम्ही चुकीचे काम करताय. लोकांनी स्वतःचे बलिदान दिले आहे. घरदार पाडली आहेत. बंड साहेब असताना प्रत्येकाच्या घरावर जाऊन मिटींग घेतली होती. लोकांनी तुम्हाला जागा दिली. अशा लोकांना टॅक्स लावायचे चुकीचे काम केले आहे. गायकवाड साहेबांनी सांगितला तो शास्तीकराचा विषय तो सुद्धा चुकीचा आहे. शंभर रुपयासाठी तीनशे रुपये असा शास्ती कर आहे. २४ टक्के करयोग्य मूल्य, ५ टक्के साफसफाई कर, २ टक्के शिक्षण कर, अग्निशामक कर ४ टक्के, मूळ सामान्य करावर शास्तीकर अशा प्रकारे नागरीक नाहक भरडले जात आहेत. खरेतर शास्तीकर कोणी भरु नका. शासनाने निर्णय दिला असला तरी कोणीही शास्तीकर भरु नये असे आवाहन करावे. आता प्रॉपर्टीबद्दल सांगितले त्याचा खुलासा करावा. हे श्री.सदाशिव बालघर बैलगाड्यांचे मालक आहेत. त्यांचा ताफा त्यांच्याबरोबर असतो. तो सगळ्यांना माहित आहे. त्याला तुमच्या घरासमोर बसवेल.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,शास्तीकर लोकांसाठी आहे का. ***Democracy is for the people, by the people. For the people*** आहे का. सगळे वैतागले आहेत. आज सकाळी वयस्कर माणसे आली. मला म्हणाले, मला रु.१५,०००/- टॅक्स आला, रु.३०,०००/- शास्तीकर आला. माझा ५ महीन्यांची पेंशन त्यात जाणार. अनधिकृत बांधकामासाठी ५ ते १० टक्के लावा पण २०० टक्के हा अन्याय आहे. राजे महाराजांच्या काळात अशी वसुली करत होते. आत्ता लोकशाहीच्या काळात अशी वसूली करतात हे चुकीचे आहे. म्हणून महापौर साहेब विनंती आहे,सगळ्या महापौरांनी एकत्रित येऊन निर्णय घ्या. आचारसंहिता सुरु करण्याअगोदर शास्तीकर सुरु करा नाहीतर फार मोठा धोका आहे, धोकादायक आहे. कर वसुलीत किती कर आहे. सामान्य कर, सफाई कर, महापालिका शिक्षण कर, सुविधा लाभ कर मग सामान्य कर, रोड कर, विशेष सफाई कर हे काय आहे. पिंपरी चिंचवडमध्ये श्वास घेण्यासाठी सुद्धा टॅक्स लावला पाहीजे. आपल्याकडे रिटायर्ड गव्हर्नमेंट सर्वण्ट, प्रायव्हेट कंपनीचे लोक इथे राहतात ते

एवढा टॅक्स भरु शकणार नाहीत. त्यांच्यावर हा फार मोठा बोजा आहे. महापौर साहेब आपण पुढाकार घ्या. तुम्ही महापौर परिषद बोलवा. सरकारकडे ठराव पाठवा. सगळ्या माणसांनी डिमाण्ड केलीतर सरकारलासुद्धा तुमच्यासमोर झुकावे लागेल. २/३ दिवसांत महापौर परिषद घेऊन हा निर्णय घ्यावा.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.दत्ता साने यांनी जो विषय मांडला, तसाच विषय माझ्या प्रभागात आहे. आपल्याला माहित आहे. मोशीतला कचरा डेपो, त्याभोवती ५०० मी. बफर झोन, २००९ पासून शासनाच्या पटलावर निर्णयासाठी प्रस्तावित आहे. २००९ पासून त्याठिकाणी नागरीकांना कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा मिळालेल्या नाहीत. ज्या पद्धतीने रेड झोनमध्ये नागरी सुविधा मिळत नाहीत. एका बाजुला कर वसुलीचा कार्यक्रम जोरात चालू आहे. आत्ता याठिकाणी सदस्यांनी संताप व्यक्त केला आहे. टॅक्स भरला नाही म्हणून बँड वाजवताय इतकी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. या बफर झोनमध्ये ३,००० मिळकती येतात. नागरीकांना २००९ पासून महापालिका अस्तित्वापासून नागरी सुविधा दिल्या नाहीत. एका बाजुला सगळ्या शहराचा कचरा तिथे नेऊन टाकतो. ५०० मी. बफर झोनमध्ये १५,००० नागरीकांनी १०/१५ दिवस दुर्गंधी स्विकारत असतात. एका बाजुला या नागरीकांना कचरा कुंडीतल्या दुर्गंधीने हैराण करुन टाकले आहे. सगळ्या शहरातील कचरा तिथे आहे. नवीन ग्रामिण भागात कचरा डेपो केलात. प्रत्येकाला आपला वॉर्ड मॉडेल वॉर्ड पाहीजे आहे. सगळे चांगले काही माझ्या वॉर्डात पाहीजे. महापालिकेत असूनही आम्ही याठिकाणी हे सहन करतो आहोत. त्यातून दुष्काळात तेरावा महिना त्याप्रमाणे या नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या रोजनिशी नागरी सुविधा मिळत नाहीत. या भागात लोकवर्गणी व मी स्वतः रु.५ लाख खर्च करुन त्या बफर झोनमध्ये गटर व्यवस्था केली, खड्डे बुजवले, पाईप टाकली. जेणेकरुन लहान मुले, ज्येष्ठांना त्रास होऊ नये व साफसफाई राहील. सगळ्यांना सांगितले आत्ताच निर्णय घेऊ नका त्यांना सुविधा द्या. याचा निकाल लागायचा आहे असे म्हणून खोटे पाडणार इतके प्रशासन असंवेदनशील आहे. अनेक वेळा प्रशासनाला, महापौरांना सांगितले आहे. शासन दरबारी याचा निकाल अजूनही लागलेला नाही. आत्ताच निर्णय घेऊ नका. तोपर्यंत त्यांना सुविधा द्या. तोपर्यंत ५०० मी. बफर झोनचा निकाल कायम राहील. हरकती/सूचना, निवेदने केली आहेत. त्याचवेळी शंभर टक्के सुनावणी सुद्धा झाली आहे. त्याचा निर्णय शासन दरबारी होऊ द्या. तोपर्यंत नागरीकांना सुविधा द्या. आपण अत्यंत बेकायदेशीरपणे काम करतोय, या नागरीकांकडून टॅक्स घेतोय. आधी मरेपर्यंत शिक्षा द्यायची, नंतर फाशी द्यायची अशा पद्धतीने दोनदा फाशी, इतके चुकीचे काम प्रशासनाने, शास्तीकर आखणा-यांनी इथे केले आहे. ठेकेदारी पद्धतीने, सावकारी पद्धतीने वसुली चालू आहे. आपले लोक बँड वाजवतात. लोक बोलतात, लाज वाटते. महापौर साहेब, आम्ही आज ठरवले आहे तुम्हाला मानसिक त्रास द्यायचा नाही. महापौर साहेब आपण यात लक्ष घाला. दीड लाख लोकांना शास्तीकर आहे. ते नाराजी झालीतर काय होऊ शकते याचा थोडा विचार करा. लोकांना सांगितले आहे, अजिबात शास्तीकर भरु नका. बँण्डवाला आलातर त्याचा बँड वाजवा आम्ही भक्कम आहोत. कायदेशीर कारवाई व्हायची ती होऊ द्या. आम्ही घाबरत नाही. दरोडे,लूटालूट करण्यापेक्षा अशा लोकांसाठी बँड आलातर बँडवाल्याला फटकून काढा. तुम्ही १६ वर्षे सुविधा देत नाही. शासनाकडे प्रस्तावित

आहे. एवढीच सूचना इथे करायची आहे. याचा गांभिर्याने विचार करा. कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी होत नाही. सभासद पोटतिडकीने बोलतो. त्याची ताकद वाया घालवता. मागील वर्षी सुद्धा सांगितले होते, महापौर साहेब आदेश द्या. प्रशासन सुस्त आहे, मुस्त आहे. यांना काही फरक पडत नाही. यांचे लक्ष यांचा गल्ला कसा भरेल याकडे लागले आहे. नागरीकांची काय काळजी, यांचे लक्ष किती असते. यांना जागे करायचे काम तुमचे आहे. ही तळमळ तुम्ही समजून घ्या. ग्रामीण भागातील लोकांनी फार सहन केले आहे. हा टॅक्सचा बोजा टाकताय, मग तिथे ताबडतोब चांगल्या नागरी सुविधा मिळतील अशी पाऊले उचला. नाहीतर आम्ही ठरवले आहे, उग्र स्वरुपाचे वेगळ्या पद्धतीने आंदोलन करावे लागेल याची तुम्ही दखल घ्या.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात पूर्णतः रेडझोन येतो आहे. सर्व बांधकामे अनधिकृत ठरवली गेली आहेत. शास्तीकर लागू केलेला आहे. शास्तीकर पूर्णतः रद्द करावा. सामान्याची परवड चालवली आहे ती थांबवा अशी विनंती करते.

**मा.बाळासाहेब तरस** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,शास्तीकराबाबत वेगळेच मत व्यक्त करणार आहे. शास्तीकर पूर्णपणे रद्द करावा. आमच्या प्रभागात १८-१९ मध्ये वीटभट्टी कामगार हंगामी काळासाठी राहतात. त्यांची पालिकेतर्फे नोंद करण्यात आली आहे. त्यांच्या घराचे बांधकाम पक्के नसते. फक्त वीटांचे बांधकाम व त्यावर छप्पर टाकलेले असते. पालिकेतर्फे त्यांच्या घरांचा सर्वे होऊन त्यावर कर आकारणार आहेत. पार्किंगसाठी पत्र्याची शेड मारली आहे. त्याचा सुद्धा पालिकेकडून सर्वे झाला आहे. पत्र्याचे पार्किंग व्यवस्थित नसल्यामुळे त्याला दरवाजा भिंत काही दिलेली नाही. मला वाटते, नवीन समाविष्ट गावांत रेड झोन असेल, अनधिकृत बांधकाम असेल तर सर्वसर्वसामान्य नागरिकांवर बोजा पडतो आहे. म्हणून शास्तीची रक्कम असेल किंवा वीटभट्टी कामगाराचे घर असले पार्किंगची जी व्यवस्था केली आहे. तो कर रद्द करण्यात यावा अशी विनंती करतो.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शास्तीकर म्हणजे मिळकत कराचे बील. भीक नको पण कुत्रं आवर अशीच म्हण आठवते. एवढे बील ४ पट झाले. सामान्य करासाठी सूट देताना सामान्य कराचा विचार केला जातो. परंतु शास्तीकर ३ पट लावतोच. सर्व मालमत्तांचा विचार करावा लागतो. परंतु सामान्य कर फक्त एकाच ठिकाणी असतो. बाकी सर्व कर मिळून मालमत्ता कर होतो. यावर तिप्पट आकारावे असा आदेश आहे. आमच्या ग्रामीण भागात ४३,००० मिळकती ह्या जास्तीत जास्ती चिखली व तळवडे भागात आहेत. रेडझोन बाधित घरे आहेत. इथे रेडझोनमुळे उद्याने, शाळा नाहीत. इथून शिक्षण कर सुद्धा दिला जातो. यावर शास्तीकर लावला जातोय. ही निंदनीय बाब आहे. वसुलीचे धोरण असले तरी प्रथमतः रेग्युलर टॅक्स फक्त घ्यावा. शास्ती मागे ठेवावी. जोपर्यंत शासनाचा निर्णय होत नाही, तोपर्यंत बँड पथक पाठवले. ते पण थांबवावे ही कळकळीची विनंती आहे. मी तिथे २५ पोरे तयार केली आहेत. आम्हाला सुद्धा असे आंदोलन करावे लागले. मागील महिन्यात विकास कामे होत नाहीत म्हणून आयुक्तांच्या नावाने बोलले गेले. आम्ही सुद्धा आयुक्तांच्या नावाने त्यांच्या दारात बँड वाजवायचा का विकास कामे होत नाहीत म्हणून. एक नंबर वॉर्ड मा.शांताराम (बापू) भालेकर आहेत, दोन नंबर वॉर्ड माझा आहे असे वाटून घेऊ. ज्या नागरीकांच्या मिळकत कर

थकलेला आहे. जे मोठे थकबाकीदार आहेत, त्यांच्या दारात पहिला बँड जाऊ द्या. नेटवर लिस्ट पाठवा की मोठे थकबाकीदार हे आहेत. त्यांच्या कार्यालयाबाहेर बँड वाजवा. कृपा करुन बँड वाजवणे थांबवा. थकीत करावर व्याज लावताय. व्याज लावत असालतर बँड वाजवणे हा कोणता प्रकार आहे. तुम्हाला बँड वाजवायचा अधिकार आहे. आम्हाला व्याज कितीही असू द्या, दारासमोर बँड वाजवणे हे कायद्याने ऑथोराईज आहे का, परवानगी आहे का या गोष्टीचा आपण विचार करा. अशा पद्धतीने थकबाकी वसूल करणे थांबवावे. एखाद्याचा अपमान होईल असे कृत्य करु नका.

**मा.कैलास कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,ही उद्योग नगरी आहे. इथे शहरात सगळे कामगार व कष्टक-यांचा मोठा भरणा आहे. किमान शास्तीकर पूर्णपणे रद्द करावा अशी माझी व्यक्तिगत मागणी आहे. मघाशी शिक्षण मंडळाच्या बजेटला मान्यता दिली आहे. माझ्या खराळवाडी शाळेत १४ विद्यार्थ्यांना गणवेष मिळालेला नाही. हा विषय मघाशी मला मांडायचा होता. तुम्ही संबंधित अधिका-यांना खुलासा करु दिला नाही. संबंधित प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना विचारणा केली गेली पाहीजे. गणवेष का दिला गेला नाही याची माहिती घेतली पाहीजे एवढेच इथे सांगायचे आहे.

**मा.वसंत लोंढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ख-या अर्थाने शास्ती कराबद्दल कोणी समाधानी नाही, मी सुद्धा समाधानी आहे असे नाही. तुम्ही तुमच्या खुर्चीवर बसला आहात. शास्तीकराबद्दल ख-या अर्थाने शासनाची चूक आहे. अर्बन लॅण्ड कायदा १९७६ साली आला. शेतक-यांच्या जमिनी घ्यायला सुरुवात केली. सर्वसामान्यांनी गुंठा/दोन गुंठे जागा घेतल्या. ज्यांनी जागा घेतली, तो बांधकाम केल्याशिवाय राहणार नाहीत. त्यांनी एक/दोन गुंठे जागा घेतली आणि १०/१५ एकर जागेत प्लॅन पास करायचे म्हटलेतर त्यांना सर्व जागेचा पैसा भरावा लागतो आहे. अशा पद्धतीने प्लॅन पास केला नाही. लॅण्ड सिलिंग कायदा केल्यानंतर खरेदी/विक्री बंद करायला पाहीजे होती. म्हणजे लोकांनी जागा घेतली नसती. यात चुकी शासनाची आहे. त्याचा भूर्दंड आमच्या लोकांवर पडतोय. एवढे करुन प्लॅन पास होत नाही. एन.ए. करा. ६/६ महिने फाईल पडून राहते. मग सर्वसामान्य माणूस विनापरवाना घर बांधणारच. महापौर साहेब, सर्वसामान्य कर भरायचा आदेश द्या. जोपर्यंत निकाल लागत नाही, तोपर्यंत शास्ती कर कोणीही लावू नये. बँण्ड पथक बंद करा. सगळीकडे हीच परिस्थिती आहे. पुण्यात, महाराष्ट्रात सगळीकडे हिच परिस्थिती आहे. तिथे बँण्ड वाजवतात का. विकास कामे, कदाचित थांबलीत तरी चालतील. लाईट, पाणी या सुविधा सर्वसामान्यांना द्या. मोठ्या प्रोजेक्टचे काम करु नका. लोकांचा पैसा लाटताय. त्यांच्याकडून पैसे काढताय आणि इथे खर्च करताय. शहराचा नावलौकिक होणारी कामे थांबली पाहीजेत. लोकांना शहरात अजिबात समाधान नाही. सगळे नगरसेवक मग तो सत्ताधारी पक्षाचा असो, विरोधी पक्षाचा असलातरी कोणीही समाधानी नाही. महापौर साहेब, तुम्ही निर्णय घ्या, आपण आदेश द्या. जोपर्यंत शासन परवानगी देत नाही, बिगर परवाना बांधकामांचा निर्णय होत नाही, तोपर्यंत शास्ती कर लावू नये असा आदेश द्या.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आत्ता मालमत्तांचे सर्वेक्षण चालू आहे. त्याअनुषंगाने नोटीसा आलेल्या आहेत. मला सहाय्यक आयुक्त श्री.गायकवाड साहेबांना सांगायचे आहे की, त्यात अनेक चुका आहेत. त्या बघून घ्याव्यात. तुमच्याकडे अर्ज करायला सांगून आपण नागरीकांना आवाहन केले पाहिजे. माझ्या वॉर्डातला एकच भाग पाहीला. त्यात रेणुका अपार्टमेंट आहे. पाऊस येतो म्हणून फक्त पत्रा लावला होता. त्यांना सुद्धा तुमची नोटीस आली होती. त्याचप्रमाणे पत्र्याचे खूप जुने बांधकाम आहे, त्याला सुद्धा तुम्ही नोटीस पाठवली होती. तळवा यांना आपले कर्मचारी यांनी नोटीस काढली आहे. त्यांनी बिल्डींग परमिशन घेऊन २ गुंठ्यांत घर बांधायला काढले होते. त्याप्रमाणे बांधकामाला सुरुवात केली होती. पहिला मजला झाला. दुस-या मजल्यावर प्लास्टर होण्यासाठी अर्धवट बांधकामात रहात आहेत. कॉन्ट्रॅक्टरला पळून गेला होता. त्यांना सुद्धा नोटीस दिली आहे. ज्यांनी सर्वे केला, त्यांना सूचना द्यायच्या राहून गेल्या असतील. डबल रुम आहे. एक इंचसुद्धा वाढवला नाही. तरीसुद्धा जयुद्दीन यांना सुद्धा नोटीस आली आहे. त्यांचे १९८५ चे घर आहे. असे अनेकजण आहेत. माझ्याकडे यादी आहे. तुमच्याकडे यादी आणून देते. आमचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा अशी विनंती करते. तुम्ही आम्हाला सविस्तर माहिती सांगावी. कोणत्या काळापासून हे लावलेले आहे, कोणत्या नियमानुसार आहे. आधी शास्ती भरुन घेता नंतर करआकारणी रेग्युलर घेता ती कोणत्या कलमानुसार हे सांगितले तर आम्हाला लक्षात येईल.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज खरेतर नवीन आयुक्तांची ओळख होईल असे वाटले होते. त्यांना सभागृहाला बघायचा काही योग आला नाही. खरेतर टॅक्सबाबत ब-याच लोकांनी त्यांचे म्हणणे किंवा त्रुटी मांडायचा प्रयत्न केला आहे. शास्तीबाबतीत शासनाचे काय धोरण आहे. शासनाने ही शास्ती कशासाठी लागू केली याची कल्पना तुम्हाला मला आहे. परंतु चुकीच्या पद्धतीने शास्ती आकारली जाते आहे. कायदा मोडून करा असे कोणाचेचे म्हणणे नाही हे एकंदरीत चर्चेतून लक्षात येते. जसे मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले, पहिल्यांदा शास्ती आकारली जाते, नंतर दंडाची रक्कम. आज सगळ्यांना माहीत आहे, महाराष्ट्र शासनाने अगदी युद्ध पातळीवर जाऊन अनधिकृत बांधकामे, आरक्षणातील बांधकामे याला लागू केलेली शास्ती याबाबतचा निर्णय दोन/चार दिवसांत अपेक्षित आहे. कॅबिनेटमध्ये या विषयावर सारखी चर्चा होते आहे. तज्ञ मंडळींचे मत मागवले जाते आहे. सगळ्या अडचणी दूर होत असताना सगळ्या महापालिकांचा विचार करुन निर्णय होणार आहे. त्यामुळे आपण ज्या पद्धतीने काम करतोय, त्या पद्धतीने मला गायकवाड साहेबांनी सांगावे, एकतर महापालिकेला शास्तीची रक्कम आजपर्यंत किती जमा केली आहे. आजपर्यंतच्या कालावधीत जमा झालेली शास्ती कराची रक्कम शासनाला पाठवण्यात आली का याचे उत्तर द्या. शासनाचा निर्णय लागू झाल्यानंतरची परिस्थिती काय असेल याबाबत काही चित्र दिसत असेल तर शहरातला एक्झॅक्ट आकडा सांगू शकाल की, या या बांधकामांना शास्ती कर लागू केला आहे, एवढी एवढी संख्या आहे. एवढी एवढी रक्कम शासनाकडे जमा होणार आहे. यात आपल्याला एक रुपयाचा सुद्धा फायदा नाही. मग तुम्ही कशाला घाई करताय. आज शहरातील सर्व सभासद, तिन्ही आमदारांची शास्ती रद्द व्हावी, अनधिकृत बांधकामे नियमित व्हावीत म्हणून गेल्या २/४ महिन्यांत जी काही पाऊले उचलली आहेत. ती शेवटच्या टप्प्यात आहेत.

तुम्ही पुन्हा सुरुवात करायला लागला आहात. माझी मागणी आहे, तुम्ही शास्ती म्हणून जमा केलेली रक्कम करात वर्ग केली पाहीजे. जास्त रक्कम भरली गेली असेल तर किंवा जमा झाली असेल तर पुढील वर्षाच्या टॅक्समध्ये रुपांतरीत करण्यासाठी ज्या-ज्या मान्यता घ्याव्या लागल्या त्या घेतल्या पाहीजेत. उद्याच्या काळात शासन निर्णय होणारच आहे. महापालिकेला उत्पन्न कमी आहे म्हणून एकमेकांच्या दारांत जाऊन बँड वाजवणे ही मानवी हक्कांवर सुद्धा गदा आहे. ह्युमन राईटस् वर अतिक्रमण करतोय. इंडस्ट्रियल असेल, कमर्शियल असेल परंतु रेसिडेन्शियल भागाला अशी वागणूक देणे चुकीचे आहे. एकंदरीत परिस्थिती पाहीली तर ३२५ कोटी लॉस गृहीत धरुन चालत असालतर एखाद्याचा जीव जाईल अशी वसुली होता कामा नये. संपूर्ण सभागृहाचे मत आहे, ज्या पद्धतीने चुकीच्या पद्धतीने टॅक्स आकारला जातो. ५०० बांधकामे पाडली गेली असतील तरी त्यावर टॅक्स येत असेलतर ते शंभर टक्के चुकतेय. तुम्ही सगळे अधिकारी लोक चांगले काम करता. आम्ही सगळे चुकीचे सांगतो असे तुमचे धोरण असेल तर ते शंभर टक्के चुकीचे आहे. आमच्या काही सूचना घेत जा. आम्हाला काही अडचणी वाटत असतील तर त्या समजून सांगत जा. तुम्हाला त्यातून ताबडतोब मार्ग काढता येऊ शकेल. शेवटी तुम्हाला व आम्हाला शहरातील अडचणी कमी करुन पुढे जाता आलेच पाहीजे. तुम्हाला कुठलाही वैयक्तिक निर्णय घेता येणार नाही. सभागृहासमोर तुमचा निर्णय असेल, प्रश्न असेलतर प्रश्न, उत्तर असेल तर उत्तर, दोन्हीसाठी हो किंवा नाही म्हणण्यासाठी तुम्हाला आमच्या समोर यावे लागणार आहे. आत्ता मा.सिमा सावळे यांनी सागिंतले. एवढा गवगवा केला, टॅक्स वाढला, टॅक्स वाढला. ८०,००० बांधकामे सापडली. ते तुमचे शंभर टक्के कामच आहे. मी एका एजन्सीचे लोक पाठवले होते. आपल्या परिसरात डिजीटायझेशन होऊन कोणी अधिकारी जात असेल तर त्याबाबतीत भूमिका ठेवली पाहीजे. टॅक्स वाढवण्याकडे बघितले पाहीजे. टॅक्स चुकवेगीरी, टॅक्स बुडवेगीरी याकडे लक्ष दिले पाहिजे. कोणी टॅक्स लागू करुन अधिका-यांना कोणी धमकवत असेल, मारत असेल, शिविगाळ करत असेल, धमकावत असेल तर काय तंत्र वापरायचे. टेक्नॉलॉजी वापरा. आकाशातून आख्खे जग दिसतेय. महापालिका ई गव्हर्नन्स यूज करणारी सगळ्यात चांगली महापालिका आहे. आजपर्यंत एकही विभाग पेपरलेस झालेले नाही. प्रत्येक विभागात अर्धवट काम आहे. शंभर टक्के ई गव्हर्नन्स वापरताय का विचारा. टॅक्स देणे व टॅक्स घेणे हे ढोबळ काम करसंकलन विभागाचे आहे. पण मला वाटत नाही शंभर टक्के पेपरलेस झाले आहे. लोकांकडून कागद गोळा करतात. पेपरलेस कशाला म्हणतात घेताना पेपर घेतले नाही पाहीजेत. देताना पेपर दिले नाही पाहीजेत. तुम्हाला डिजिटल ऑथराईज सिग्नेटरी मिळते. अशा प्रकारे कामकाज पूर्णपणे करतो त्याला पेपरलेस म्हणतात. करसंकलन करा, एलबीटी करा, बांधकाम परवानगी करा हे विभाग टेक्नॉलॉजी वापरुन पेपरलेस झाले पाहीजेत. कर संकलन विभागाचा कर शंभर टक्के वाढल्याशिवाय राहणार नाही. अजूनही ४०,००० मिळकतींचा लॉस आहे. अजून ४०,००० मिळकती शंभर टक्के मिळतील. टेक्नॉलॉजी वापरा. प्रत्येक काम मनुष्यबळ वापरुन होतेच असे नाही. टेक्नॉलाडी कशी वापरायची हे ध्यानात घेतले पाहीजे. जे काम करतो ते समोरच्याला अपमानास्पद वाटले नाही पाहिजे. घरी बसून काम झाले पाहीजे. शास्तीबाबत प्रशासनाला आदेश द्या. शास्ती जमा केलेली आहे ती कररुपातून वर्ग करा. मिळकत कर म्हणून तिचा भरणा झाला पाहीजे. शास्ती

म्हणून नाही. ज्यावेळी शासन शास्तीबाबत निर्णय घेईल, त्यावेळी योग्य ती पुढील पाऊले उचलली जातील.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्या अजेंडावर टॅक्स मान्यतेचा विषय आहे. याठिकाणी माहिती देत असताना साहेबांनी सांगितले, कलम २६७ अ अन्वये लागू करुन शास्ती किंवा दंडाची व्यवस्था करण्याची प्रोव्हिजन केलेली आहे हे सुद्धा सांगितले. शासनाने २००८ नंतरच्या बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकामांना शास्ती लावायची होती. २०१२-२०१३ व २०१३-१४ साठी शास्ती लावली कारण रेट्रोस्पेक्टिव्ह करता आले नाही. म्हणून सन २०१३-१४ च्या अनुषंगाने केले आहे. राज्य शासनाचा मी प्रथमतः निषेध करतो. आमचे लोक मंत्रिमंडळात असले तरी मी या निर्णयाचा निषेध करतो. वास्तविक पाहता, जेव्हा महापालिकेने एक पट किंवा १० टक्के दंड वसूल करावा असा निर्णय मा.महासभेने घेतला असताना एका बाजूला महापालिका ही स्वायत्त संस्था आहे असे म्हणायचे. नंतर याच संस्थेच्या अधिकारांवर गदा आणायची. जशी काय महापालिका यांची गुलाम आहे. त्यांनी आदेश करायचे, आम्ही त्याचे पालन करायचे असे चालणार नाही. मी नागरीकांना विनम्र आवाहन करतो की, नागरीकांनी शास्ती किंवा दंड भरायचा नाही. उलट त्यांच्या घरासमोर बॅण्ड वाजवतात. महापौर साहेब, आपण आदेश द्यावा. बील भरणा टप्याटप्यात करा. रु.१,४०,०००/- बील आले असेल रु.३०,०००/- चा एक टप्पा असे टप्पे करा. नागरीकांना बील भरण्यात सवलत दिली जात नाही. टप्पा दिला जात नाही. उलट त्यांना सांगितले जाते, संगणक अशाप्रकारे बील स्विकारत नाही. असे सांगून या लोकांना परत पाठवले जाते. आपण उलटी सिस्टीम आणली आहे. एकाचवेळी सगळी रक्कम भरावी लागते आहे. ही सिस्टीम रद्द केली पाहीजे. कायदा नागरिकांना सुखसोयी देण्यासाठी आहे, त्यांची पिळवणूक करण्यासाठी कायदा करत नाही. बॅक सिस्टीमने सगळे काढायचे असेल तर त्याचा कायदा झाला पाहीजे. नागरीकांना प्रत्यक्षात आदेश जातो. एखाद्याने अपुरे बील भरले असेल तर त्याच्या घरासमोर अशाप्रकारे बॅण्ड वाजवायचा, त्याने बील भरले नाही अशी दवंडी पिटवायची असे काम आपण करणार असाल तर याची तुम्ही महासभेकडून परवानगी घेतली होती का. पुणे महापालिका करते म्हणून तुम्ही करता. पुण्यात ब्ल्यू लाईन नाही म्हणून इथे तसे का करत नाही. असा मनमानी मर्जीनुसार कारभार करणार असाल, महासभेत अनेक वेळा सर्वपक्षीय ठराव केल्यानंतर, आमदारांनी धरणे धरल्यानंतरही राज्य शासन त्यावर निर्णय घेत नसेल, शास्तीतर लावायचा असेल तर २००८ नंतरच्या बांधकामांना लावणार आहात का याचे लॉजिक काय आहे. One has to prove that. तुमचे बांधकाम २००८ आधीचे आहे का नंतरचे आहे हे सिद्ध करावे लागणार आहे. तुम्ही शास्तीकर ४ लाख केला, ५ लाख केला, किंवा ३ लाख मग २००८ आधीच्या बांधकामांना त्यातून माफी व २००८नंतरच्या बांधकामांना दंड किंवा शिक्षा हा कोणता कायदा आहे. नागरीकांना शास्ती कर अजिबात भरु नये असे मी आवाहन करतो. मा.महापालिका सभेने त्याचा पाठपुरावा करावा. जोपर्यंत शासन अनधिकृत बांधकामांबाबत निर्णय घेत नाही, तोपर्यंत आपण महापौर साहेब तसे आदेश द्यावेत. पहिले बॅण्ड वाजवणे बंद करायला लावा. जे नागरीक कर रुपाने पैसे देतात, त्याचे टप्पे करावेत. कटऑफ डेट नुसार पैस भरले तर त्यांना एक्झेंम्पशन द्या. त्यांना अमुक अमुक स्वरुपात रिबेट, डिस्काऊंट मिळत असेलतर सामान्य

माणसाला ते नको आहे का. सवलत असताना सुद्धा तो वेळेत पैसे भरु शकत नाही मग याचा अर्थ त्याच्या घरासमोर बॅण्ड वाजवायचा, त्याच्या अधिकारांवर गदा आणायची हे आम्ही अजिबात सहन करु शकणार नाही. ही अतिशय निंदनीय बाब आहे. प्रशासनाने हे करु नये. हे ताबडतोब थांबवावे. वसूली जरुर करा. दुसरा माझा प्रश्न आहे की, तुमची डे टू डे असेसमेंट असते का. परदेशी साहेब असताना त्यांनी नवीन असेसमेंटची यंत्रणा लावली होती. शहरात ३० ते ४०,००० मिळकती आहेत. त्यांची मोजणी झाली नव्हती. असा लोकांना २००८ मध्ये धरणार का २००६ मध्ये धरणार का २००५ मध्ये धरणार आहात. आज या मिळकती सापडल्या म्हणून २०१३ मध्ये धरणार का. मग त्यांना आजचे रेट लावावे लागतील. २०१३ मध्ये प्रॉपर्टी सापडल्या त्या बेकायदेशीर असणार, ते कागदपत्रे देऊ शकले नाहीत, बिल्डींग प्लॅन देऊ शकले नाहीत, २००५ मध्ये बेकायदेशीरपणे बांधल्या होत्या. या मिळकतींची रेकॉर्डवर नोंद नाही. परदेशी साहेब असताना या मिळकती उघडकीस आल्या. या मिळकतींवर कर कोणत्या रेटने लावणार आहात. तर तुम्ही अशाप्रकारे कर लावू शकत नाही. रिकव्हरी करायचा तुम्हाला अधिकार नाही. आजची परिस्थिती काय. मी फक्त ३ गुंठ्यांचा प्लॅन रावेत इथे टाकला होता. त्याप्रमाणे बिल्डींग परमिशन केली, एन.ए. केला. प्लॅन पहिला मंजूर करावा लागतो. आज इथे बिल्डींग परमिशन विभागाचे लोक बसले आहेत. ३ गुंठे व ३६ आर असेल तर त्याला इथे रु.४,६८,०००/- रुपये मोजणीचे भरावे लागतील. त्याप्रमाणे एन.ए.साठी पैसा खर्च करावा लागले. नंतर फाईलवर अभिप्राय नंतर बिल्डींग परमिशन. एक दोन गुंठ्यासाठी स्वतःचे घर बांधण्यासाठी जर त्या माणसाची अशा पद्धतीने पिळवणूक होणार असेल, त्याचे ५ लाख खर्च होत असतील तर तुमच्याकडे येईल का. शासनाने हा विचार करावा. लोकांनी घरे कोणत्या परिस्थितीत बांधली होती. त्यांनी बेकायदेशीर बांधकाम केले याला अधिकारी, प्रशासन जबाबदार नाही का. दंड त्याने एकट्याने सोसायचा. महापौर साहेब, आपण कडक शब्दांत आदेश द्यावा. अन्यथा या सभागृहात नो-कोऑपरेशन चालू करु. अशी परिस्थिती असेल तर आम्ही महापालिका सभेला येणार नाही. हे ताबडतोब थांबवावे. जोपर्यंत शासन अनधिकृत बांधकामांचा निर्णय घेत नाही, तोपर्यंत नागरीकांनी शास्तीकराचा एक रुपयासुद्धा भरु नये अशा प्रकारचे आवाहन करतो.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - महापालिका सभेने दिनांक १८/१/१४ रोजी विषय क्रमांक २ अन्वये महापालिका आयुक्त यांनी मनपा हद्दीमध्ये रुग्णालय/दवाखाने यांची वार्षिक फी बेड संख्यानिहाय आकारली होती. एकूण क्लिनिक/डिस्पेन्सरी संख्या ७७० एवढी आहे. सदर ठराव मा.आयुक्त यांना सूचविलेले दर हे प्रतिवर्षीकरिता आकारली होती. परंतू महासभेने उपसूचनेद्वारे सदर प्रस्तावाला प्रती वर्षाऐवजी प्रती महिना अशी उपसूचनेद्वारे मान्यता दिली. ती या ठरावाद्वारे रद्द करण्यात यावी व खाली सूचविल्याप्रमाणे सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे. छोट्या छोट्या रुग्णालयांना मागील सभेमध्ये मान्यता दिलेले दर अवाजवी व न परवडणारे असल्याने सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे नविन फी आकारण्यात यावी.

| अ.क्र. | रुग्णालये बेडसंख्या | संख्या | दर | र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २२२ | २००० | ४,४४,००० |
| २ | ११ ते ४९ | ११९ | ५००० | ५,९५,००० |
| ३ | ५० ते १०० | १४ | १२००० | १,६८,००० |
| ४ | १०१ ते ४९९ | १० | १,००,००० | १०,००,००० |
| ५ | ५०० च्या पुढे | २ | २,००,००० | ४,००,००० |
| | | | | २६,०७,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | क्लिनीक, डिस्पेन्सरी, लॅबोरेटरी कन्सल्टेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकिय सेवा पुरविणा-या संस्था | ५००० अंदाजे | १२०० | ६०,००,००० |
| | | | | ८६,०७,००० |

सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षाकरिता १ एप्रिल पासून वरील सूचविल्याप्रमाणे फी आकारण्यात यावी.

तसेच करेत्र बाबींचे फी/शुल्कांचे दर खालीलप्रमाणे सन २०१४-२०१५ करीता प्रस्तावित करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | नांव | सन २०१३-१४ चे प्रचलित दर | सन २०१४-१५ करीता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्य मुल्यावर १% | करयोग्य मुल्यावर ५% |
| २ | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रति दाखला ५ रु. | प्रति दाखला १० रु. |
| ३ | मिळकत उतारा | प्रति उतारा १० रु. | प्रति उतारा २० रु. |
| ४ | प्रशासकिय सेवा शुल्क | प्रति बिलास ५ रु. | प्रति बिलास १० रु. |

वरिलप्रमाणे सन २०१४-१५ करिता दर प्रस्तावित करणेस मान्यता देणेत येत आहे.

परिशिष्ट ब **: सामान्य करातील सवलत योजना :** सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर **+** साफसफाई कर **+** अग्निशामक **+** मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत.)

मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक ५५७५, दिनांक १६/०१/२०१४ अन्वये सामान्य करातील एकूण ४ सवलत योजनांना मंजूरी देऊन मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी शिफारस केली आहे. सदर सवलत योजनांपैकी अनुक्रमांक १ ते ३ सवलत योजना कायम ठेऊन अनुक्रमांक ४ ऐवजी खालीलप्रमाणे सवलत योजना मंजूर करावी.

| अ. क्र. | योजना तपशील | सामान्य करातील सवलत |
|---|---|---|
| ४अ | ग्रीहा : ही ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये २५०० चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत देणेत येणा-या अंतिम भोगवटा पत्राचे वेळेस अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate देणेत येणा-या मिळकतीस सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>• **3 Star Rating – 05% रक्कम सूट**<br>• **5 Star Rating – 08% रक्कम सूट**<br>• **6 Star Rating – 10% रक्कम सूट** |

| | | |
|---|---|---|
| ४ब | स्वगृहा : ही ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये २५०० चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत देणेत येणा-या अंतिम भोगवटा पत्राचे वेळेस अंतिम ग्रीन बिल्डींग ***Certificate*** देणेत येणा-या मिळकतीस सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>• **1 Star Rating – 05% रक्कम सूट**<br>• **2 Star Rating – 08% रक्कम सूट**<br>• **3 Star Rating – 10% रक्कम सूट**<br>• **5 Star Rating – 12% रक्कम सूट**<br>• **6 Star Rating – 15% रक्कम सूट** |

तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध,अपंग,मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस त्यांना सामान्य कराच्या ५० टक्के सवलत देणेत यावी. परंतु त्यांनी सदरची रक्कम ३० जूनपूर्वी भरावी त्यांना मनपाने जाहीर केलेल्या कोणत्याही एका सवलत योजनेचा लाभ घेण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

सन २०१४-१५ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर निश्चित करत असताना करात कोणतीही वाढ केली नाही. त्याबद्दल महापालिका प्रशासनाचे अभिनंदन. परंतू महाराष्ट्र शासनाने कलम २६७ अ अन्वये सन २००८ नंतरच्या बेकायदेशीर अथवा अनाधिकृत बांधकामांना कराच्या रकमेच्या दुप्पट शास्तीकर वसूल करण्याबाबतचे आदेश रद्द करावेत व महापालिका ही महाराष्ट्र महापालिका अधिनियमांच्या अधिपत्याखाली जरी चालत असली तरी ही संस्था स्वायत्त संस्था आहे व लोकप्रतिनिधींना लोकांच्या हितास्तव निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आम्हाला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये आम्ही असा निर्णय घेत आहोत की, जोपर्यंत राज्य शासन अनधिकृत बांधकामांच्या नियमितीकरणाबाबतचा निर्णय घेत नाही, तोपर्यंत “शास्तीकर” वसुल करु नये. कारण २००८ सालानंतरच्या अनाधिकृत बांधकामांनाच शास्ती कर का**?** त्याआधी केलेल्या अनाधिकृत बांधकामांना कोणताही दंड,शुल्क अथवा शास्ती नाही हे कायद्यास विसंगत आहे.

दुसरे म्हणजे शास्तीकर २००८ सालापासून वसुल करावा असे आदेश महाराष्ट्र राज्य शासनाने निर्गमनीत जरी केले असतील तरीसुद्धा नियमानुसार सुप्रिम कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे पूर्व लक्षणीय दराने (रिट्रॉस्पेक्टिव्ह) कोणतेही शुल्क वसुल करता येत नाही. त्यामुळे जरी महापालिकेने वरील नमूद केलेल्या सन २०१२-१३ व सन २०१३-१४ सालाकरिता शास्तीकर/दंड वसुल करण्याचा निर्णय घेतला असेल तर तो रद्द करावा व नागरिक त्यांचा जो नियमित कर

भरत असतील तो भरुन घ्यावा. त्यामध्ये ज्या नागरिकांना दोन किंवा तीन टप्प्यांत पैशाचा भरणा करावयाचा असल्यास तसे टप्पे देऊन पैसे भरुन घ्यावेत. संगणक तसे पैसे स्विकारत नाही, टप्पे देता येत नाही. आधी शास्तीकर भरावा अन्यथा टॅक्स घेतला जाणार नाही. आदी सबबी, कारण देऊन नागरिकांची पिळवणूक करण्याऐवजी पैसे स्विकारावेत व त्याबाबतचे आदेश प्रत्येक विभागाला, प्रभागाला/संगणक विभागाला देण्यात यावेत व आवश्यकता पडल्यास संगणक प्रणालीमध्ये त्याप्रकारची दुरुस्ती करावी. पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये येथून मागे म्हणजेच २००८ नंतर सर्वेक्षण केव्हा झाले, टॅक्स असेसमेंट केव्हा केले, नोटीसा केव्हा बजविल्या व दर निश्चित करुन बीले देण्यात आली. या सर्व बाबींचा विचार केल्यास आपल्या लक्षात येईल, २००८ नंतर शास्तीकर लावत असताना किती चुका झाल्या. त्यामुळे या सर्व बाबी लक्षात घेता शास्तीकर रद्द करुन फक्त निवासी कर वसुल करावा व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करुन आवश्यक वाटल्यास राज्य शासनास अवलोकनाकरिता अथवा मान्यतेकरिता पाठवावा. नवीन कलम २६७अ रद्द करण्यात यावे व गैरपद्धतीने चालू असलेली वसुली थांबविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** – उपसूचनेसहित हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४७२ विषय क्रमांक - २
दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/५/कावि/८८८/२०१३, दि.१६/१२/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५५७५ दि.१६/१/२०१४

सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींची फी/शुल्क सोबतचे प्रपत्र अ व ब प्रमाणे निश्चित तसेच प्रपत्र 'ब' मध्ये प्रशासकीय सेवाशुल्क प्रती बीलास पूर्वी ५ रुपये होते ते १० रुपये प्रति बीलास करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाकडून दुप्पट शास्तीकर वसूल केला जात आहे. त्यामुळे नागरिकांवर आर्थिक बोजा वाढल्यामुळे शास्तीकराचा दंड रद्द होत नाही तोपर्यंत येणा-या पुढील वर्षामधील सर्व वर्षांमध्ये मिळकत कर आहे तसा ठेवणेत यावा. तसेच महापालिका सभेने दिनांक १८/१/१४ रोजी विषय क्रमांक २ अन्वये महापालिका आयुक्त यांनी मनपा हद्दीमध्ये रुग्णालय/दवाखाने यांची वार्षिक फी बेड संख्यानिहाय आकारली होती. एकूण क्लिनिक/ डिस्पेन्सरी संख्या ७७० एवढी आहे. सदर ठराव मा.आयुक्त यांना सूचविलेले दर हे प्रतिवर्षीकरिता आकारली होती. परंतू महासभेने उपसूचनेद्वारे सदर प्रस्तावाला प्रती वर्षाऐवजी प्रती महिना अशी उपसूचनेद्वारे मान्यता दिली. ती या ठरावाद्वारे रद्द करण्यात यावी व खाली सूचविल्याप्रमाणे सदर विषयास मान्यता देण्यात येत

आहे. छोट्या छोट्या रुग्णालयांना मागील सभेमध्ये मान्यता दिलेले दर अवाजवी व न परवडणारे असल्याने सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे नविन फी आकारण्यात यावी.

| अ.क्र. | रुग्णालये बेडसंख्या | संख्या | दर | र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २२२ | २००० | ४,४४,००० |
| २ | ११ ते ४९ | ११९ | ५००० | ५,९५,००० |
| ३ | ५० ते १०० | १४ | १२००० | १,६८,००० |
| ४ | १०१ ते ४९९ | १० | १,००,००० | १०,००,००० |
| ५ | ५०० च्या पुढे | २ | २,००,००० | ४,००,००० |
| | | | | २६,०७,००० |
| २. | क्लिनीक, डिस्पेन्सरी, लॅबोरेटरी कन्सल्टेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकिय सेवा पुरविणा-या संस्था | ५००० अंदाजे | १२०० | ६०,००,००० |
| | | | | ८६,०७,००० |

सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षाकरिता १ एप्रिल पासून वरील सूचविल्याप्रमाणे फी आकारण्यात यावी.

तसेच करेत्र बाबींचे फी/शुल्कांचे दर खालीलप्रमाणे सन २०१४-२०१५ करीता प्रस्तावित करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | नांव | सन २०१३-१४ चे प्रचलित दर | सन २०१४-१५ करीता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्य मुल्यावर **१%** | करयोग्य मुल्यावर **५%** |
| २ | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रति दाखला ५ रु. | प्रति दाखला १० रु. |
| ३ | मिळकत उतारा | प्रति उतारा १० रु. | प्रति उतारा २० रु. |
| ४ | प्रशासकिय सेवा शुल्क | प्रति बिलास ५ रु. | प्रति बिलास १० रु. |

वरिलप्रमाणे सन २०१४-१५ करिता दर प्रस्तावित करणेस मान्यता देणेत येत आहे.

परिशिष्ट ब ***: सामान्य करातील सवलत योजना :*** सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर **+** साफसफाई कर **+** अग्निशामक **+** मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत.)

मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक ५५७५, दिनांक १६/०१/२०१४ अन्वये सामान्य करातील एकूण ४ सवलत योजनांना मंजूरी देऊन मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी शिफारस केली आहे. सदर सवलत योजनांपैकी अनुक्रमांक १ ते ३ सवलत योजना कायम ठेऊन अनुक्रमांक ४ ऐवजी खालीलप्रमाणे सवलत योजना मंजूर करावी.

| अ. क्र. | योजना तपशील | सामान्य करातील सवलत |
|---|---|---|
| ४अ | ग्रीहा : ही ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये २५०० चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत देणेत येणा-या अंतिम भोगवटा पत्राचे वेळेस अंतिम ग्रीन बिल्डींग ***Certificate*** देणेत येणा-या मिळकतीस सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>• **3 Star Rating – 05% रक्कम सूट**<br>• **5 Star Rating – 08% रक्कम सूट**<br>• **6 Star Rating – 10% रक्कम सूट** |
| ४ब | स्वगृहा : ही ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये २५०० चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत देणेत येणा-या अंतिम भोगवटा पत्राचे वेळेस अंतिम ग्रीन बिल्डींग ***Certificate*** देणेत येणा-या मिळकतीस सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>• **1 Star Rating – 05% रक्कम सूट**<br>• **2 Star Rating – 08% रक्कम सूट**<br>• **3 Star Rating – 10% रक्कम सूट**<br>• **5 Star Rating – 12% रक्कम सूट**<br>• **6 Star Rating – 15% रक्कम सूट** |

तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध,अपंग,मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस त्यांना सामान्य कराच्या ५० टक्के सवलत देणेत यावी. परंतु त्यांनी सदरची रक्कम ३० जूनपूर्वी भरावी त्यांना मनपाने जाहीर केलेल्या कोणत्याही एका सवलत योजनेचा लाभ घेण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१४-१५ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर निश्चित करत असताना करात कोणतीही वाढ केली नाही. त्याबद्दल महापालिका प्रशासनाचे अभिनंदन. परंतू महाराष्ट्र शासनाने कलम २६७ अ अन्वये सन २००८ नंतरच्या बेकायदेशीर अथवा अनाधिकृत बांधकामांना कराच्या रकमेच्या दुप्पट शास्तीकर वसूल करण्याबाबतचे आदेश रद्द करावेत व महापालिका ही महाराष्ट्र महापालिका अधिनियमांच्या अधिपत्याखाली जरी चालत असली तरी ही संस्था स्वायत्त संस्था आहे व लोकप्रतिनिधींना लोकांच्या हितास्तव निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आम्हाला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये आम्ही असा निर्णय घेत आहोत की, जोपर्यंत राज्य शासन अनधिकृत बांधकामांच्या नियमितीकरणाबाबतचा निर्णय घेत नाही, तोपर्यंत “शास्तीकर” वसुल करु नये. कारण २००८ सालानंतरच्या अनाधिकृत बांधकामांनाच शास्ती कर का? त्याआधी केलेल्या अनाधिकृत बांधकामांना कोणताही दंड,शुल्क अथवा शास्ती नाही हे कायद्यास विसंगत आहे.

दुसरे म्हणजे शास्तीकर २००८ सालापासून वसुल करावा असे आदेश महाराष्ट्र राज्य शासनाने निर्गमनीत जरी केले असतील तरीसुद्धा नियमानुसार सुप्रिम कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे पूर्व लक्षणीय दराने (रिट्रॉस्पेक्टिव्ह) कोणतेही शुल्क वसुल करता येत नाही. त्यामुळे जरी महापालिकेने वरील नमूद केलेल्या सन २०१२-१३ व सन २०१३-१४ सालाकरिता शास्तीकर/दंड वसुल करण्याचा निर्णय घेतला असेल तर तो रद्द करावा व नागरिक त्यांचा जो नियमित कर भरत असतील तो भरुन घ्यावा. त्यामध्ये ज्या नागरिकांना दोन किंवा तीन टप्प्यांत पैशाचा भरणा करावयाचा असल्यास तसे टप्पे देऊन पैसे भरुन घ्यावेत. संगणक तसे पैसे स्विकारत नाही, टप्पे देता येत नाही. आधी शास्तीकर भरावा अन्यथा टॅक्स घेतला जाणार नाही. आदी सबबी, कारण देऊन नागरिकांची पिळवणूक करण्याऐवजी पैसे स्विकारावेत व त्याबाबतचे आदेश प्रत्येक विभागाला, प्रभागाला/संगणक विभागाला देण्यात यावेत व आवश्यकता पडल्यास संगणक प्रणालीमध्ये त्याप्रकारची दुरुस्ती करावी. पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये येथून मागे म्हणजेच २००८ नंतर सर्वेक्षण केव्हा झाले, टॅक्स असेसमेंट केव्हा केले, नोटीसा केव्हा बजविल्या व दर निश्चित करुन बीले देण्यात आली. या सर्व बाबींचा विचार केल्यास आपल्या लक्षात येईल, २००८ नंतर शास्तीकर लावत असताना किती चुका झाल्या. त्यामुळे या सर्व बाबी लक्षात घेता शास्तीकर रद्द करुन फक्त निवासी कर वसुल करावा व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करुन आवश्यक वाटल्यास राज्य शासनास अवलोकनाकरिता अथवा मान्यतेकरिता पाठवावा. नवीन कलम २६७अ रद्द करण्यात यावे व गैरपद्धतीने चालू असलेली वसुली थांबविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४७५ विषय क्रमांक - ३७

दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ **:** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. वैद्य/०७/कावि/२४०/२०१४ दिनांक-१०/०२/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबिय तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचे वैद्यकीय उपचाराकरिता धन्वंतरी स्वास्थ्य योजना 2013 चे नियमावलीचे प्रारुप तयार करणेत आले आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना 2013 चालु करणेकरिता प्रथमत: दोन वर्षासाठी यापुर्वी प्रमाणेच वैद्यकीय प्रतिपुर्ती या लेखाशिर्षाखाली तरतुद करणे आवश्यक असलेने तशी तरतूद सन 2013-2014 चे अंदाजपत्रकात करणेत आली आहे. सदर योजनेमध्ये मनपा अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन दरमहा र.रु.300/- प्रमाणे व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन दरमहा र.रु. 150/- प्रमाणे या योजनेच्या अग्रीमाचा हिस्सा घेणेत येणार असुन या हिश्श्याच्या

दुप्पट रक्कम मनपातर्फे या निधित जमा करणेत येणार आहे. मनपाची सध्याची अधिकारी/कर्मचारी यांची तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संख्या विचारात घेता या योजनेमध्ये पुढीलप्रमाणे निधी जमा होणार आहे. याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | कर्मचारी संख्या | कर्मचारी हिस्सा र.रु. | एकुण र.रु |
|---|---|---|---|---|
| **अ) कर्मचारी हिस्सा** | | | | |
| १ | कार्यरत कर्मचारी | 7575 | 300 | 22,72,500/- |
| २ | सेवानिवृत्त कर्मचारी | 2000 | 150 | 3,00,000/- |
| ३ | एकुण कर्मचारी मासिक निधी | | | 25,72,500/- |
| **ब) मनपा हिस्सा** | | | | |
| १ | कार्यरत कर्मचारी | 7575 | 600 | 45,45,000/- |
| २ | सेवानिवृत्त कर्मचारी | 2000 | 300 | 06,00,000/- |
| ३ | एकुण मनपा मासिक निधी | | | 51,45,000/- |
| **क) एकुण जमा होणारा मासिक निधी** | (अ3+ब3) | | | 77,17,500/- |
| **एकुण जमा होणारा वार्षिक निधी** | (क) □ 12 | | | 9,26,10,000/- |

तसेच मागील तीन वर्षातील 'वैद्यकीय प्रतिपुर्ती' या लेखार्शिर्षाखाली झालेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्षे | एकुण बिले | कर्मचारी सरासरी | प्रत्यक्ष खर्च 80% |
|---|---|---|---|---|
| 1 | 2010-11 | 1927 | 25.43 | 6,45,56,321/- |
| 2 | 2011-12 | 2022 | 26.69 | 7,59,52,523/- |
| 3 | 2012-13 | 1647 | 21.74 | 5,52,86,879/- |

उपरोक्त बाबींचा विचार करता मनपास सन 2014-2015 या आर्थिक वर्षामध्ये वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी र.रु. 6,50,00,000/- व मनपा हिस्सा जमा करणेसाठी र.रु. 6,20,00,000/- अशी एकुण र.रु. 12,70,00,000/- तरतूद करावी लागेल त्यानंतर पुढील वर्षासाठी कर्मचा-यांच्या संख्येत जशी वाढ होईल त्याप्रमाणे मनपास कर्मचारी संख्येप्रमाणे हिश्श्यानुसार रक्कम जमा करावी लागणार आहे. त्याकरिता सुध्दा वार्षिक तरतूद ही करावीच लागणार आहे.

धन्वंतरी योजने अंतर्गत प्रचलित पध्दतीनुसार ८०% प्रतिपुर्तीऐवजी १००% प्रतिपुर्ती द्यावी लागणार असलेने पुढील आर्थीक वर्षात २०% वाढ अपेक्षित असुन ही योजना चालु

झालेवर बाहेरील रुग्णालयात उपचार घेणेचे प्रमाणात साधारणत: १५% वाढ अपेक्षित धरली आहे. व या योजनेतर्गंत निवृत्तीवेतनधारकांना सुध्दा फायदा द्यावयाचा असलेने त्यापोटी १०% वाढ अपेक्षित धरणेत आली आहे.  सन 2014-2015 मध्ये अंदाजे र.रु 10.49 कोटी इतका खर्च गृहीत धरणेत आला आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता या योजनेसाठी सुरुवातीचे १ वषार्साठी सध्याचे प्रचलित पध्दत अंमलात ठैडफन योजना राबिवणे योग्य ठरेल व त्यानंतर निधीची रक्कम उपलब्ध झालेनंतर फक्त कर्मचारी संख्येनुसार हिश्श्याचे रकमेकरीता मनपास तरतूद करावी लागेल. साधारणत: र.रु 6.50 ते 7.50 कोटी इतकी तरतूद पुढील ४ वर्षासाठी करावी लागणार आहे. फक्त सुरुवातीचे पहिले वर्षासाठी दुप्पट तरतूद म्हणजेच वैद्यकीय प्रतिपुर्ती व मनपा हिस्सा यासाठी करावी लागेल. तसेच या योजनेमध्ये खाजगी रुग्णालयाकरिता मनपाने प्रत्येक आजारांसाठी व उपचारासाठी मनपाचे पॅकेज दर निश्चित केले असून सदरचे दर खाजगी रुग्णालयांना मान्य झालेनंतरच अशाच रुग्णालयांबरोबर करारनामा करणेत येणार आहे.

सबब, धन्वंतरी स्वास्थ्य योजना सन 2013 ही योजना मनपा अधिकारी/कर्मचारी यांचे आरोग्याशी निगडीत असल्याने महत्वाकांक्षी अशी योजना आहे.  ही योजना मनपात सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी बंधनकारक व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता ऐच्छीक असून या योजनेमध्ये मनपा अधिकारी/कर्मचारी यांचा दरमहा र.रु 300/- प्रमाणे व सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचा दरमहा र.रु. 150/- प्रमाणे हिस्सा, व सदर हिश्श्याचे दुप्पट रक्कम मनपाने जमा करुन तयार  होणा-या निधीस मान्यता मिळणेकामी तसेच या योजनेचे तयार केलेल्या नियमावलीच्या प्रारुपास मान्यता मिळणेसाठी तसेच ही योजना चालु करण्यासाठी सुरुवातीचे पाहिले वर्षासाठी र.रु 6.50 कोटी तरतूद करण्यास व वेळोवेळी या निधीमध्ये मनपाचा नियमाप्रमाणे हिस्सा जमा करण्यास व या योजनेतर्गंत मनपाने उपचारार्थ निश्चित केलेल्या दरांप्रमाणे शहरातील व शहराबाहेरील नामांकित खाजगी रुग्णालयांबरोबर मनपाचे वतीने करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४७६ विषय क्रमांक - ३८
दिनांक - २०/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त
संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. जशुके/पापु/४१/२०१४ दिनांक-२०/०२/२०१४

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या निरनिराळ्या प्रकल्पांचे प्रस्ताव राज्यशासन व केंद्रशासनाकडे सादर करणेत आलेले आहेत. या योजनांना केंद्र शासनाकडून ५०% निधी व राज्यशासनाकडून २०% निधी अनुदान म्हणून प्राप्त होणार आहे. सदर निरनिराळ्या प्रस्तावासाठी मा.महापालिका सभा ठराव क्र. २७४, दि. ९/५/२०१३ अन्वये र.रु.४५९.८३ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर निरनिराळ्या प्रकल्पांमध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये (२४X७ प्रमाणे) पाणीपुरवठा करणे या प्रकल्पासाठी र.रु.२१३.७५ कोटी या रक्कमेचा समावेश आहे. सदर प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन राज्य व केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. सदर प्रकल्पात केंद्र शासनाने दि.१७/१२/२०१३ रोजीच्या CSMC मध्ये र.रु.१४३.१७ कोटी मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावामध्ये महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रापैकी ४०% क्षेत्राचा विचार पहिला टप्पा म्हणून करणेत आला होता. या प्रकल्पास केंद्र शासनाच्या CSMCने मान्यता देताना उर्वरित ६०% क्षेत्रासाठीचा प्रकल्प अहवाल (DPR) शासनाकडे सादर करावा अशा सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने उर्वरित ६०% क्षेत्राचा प्रकल्प अहवाल (DPR) केला असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.३१३.८४ कोटी इतकी येत आहे. सदर प्रकल्प अहवाल (DPR) राज्यशासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेत आलेला आहे. वरील बाबींचा विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी २४X७ प्रमाणे पाणीपुरवठा करणेच्या एकूण प्रकल्पासाठी (१४३.१७ + ३१३.८४) र.रु.४५७.०१ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. यापैकी मा.महापालिका ठराव क्र.२७४, दि. ९/५/२०१३ अन्वये एकूण र.रु.४५९.८३ कोटी पैकी २१३.७५ कोटी एवढ्या रक्कमेस या प्रकल्पास मान्यता प्राप्त आहे. संपुर्ण क्षेत्रासाठीच्या येणा-या खर्चासाठी मा.महापालिका ठराव क्र. २७४, दि. ९/५/२०१३ मध्ये सुमारे र.रु.२१३.७५ कोटी या रक्कमेस मान्यता असलेने व उर्वरित ६०% भागात म्हणजेच एकूण १००% भागासाठी मंजूर रक्कम रु. १४३.१७ +३१३.८४= ४५७.०१ कोटीस या सुधारीत रक्कमेस मान्यता मिळणे आवश्यक आहे. यानुसार सदर रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २४X७ प्रमाणे पाणीपुरवठा योजना राबविणेसाठी एकूण र.रु.४५७.०१ कोटी या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब,खालील मान्यवरांचे निधन झाले आहे, त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी. नरसिंह रामचंद्र तथा एन.आर.शिंदे- पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे माजी मुख्याधिकारी व माजी नगरसेवक, श्रीमती जनाबाई सदाशिवराव बहिरवाडे - नगरसदस्य नारायण बहिरवाडे यांच्या मातुःश्री व बाजीरावशेठ काळभोर यांना आजच्या सभेत श्रद्धांजली वाहणेत यावी व सभा दिनांक १८/०३/२०१४ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दिनांक १८/३/२०१४ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत ही सभा तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २६**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०.२.२०१३ ची तहकूब सभा)**

दिनांक – १८.३.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची दि.२०.०२.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.१८.०३.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
११. मा.काळजे नितीन प्रताप
१२. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१३. मा.जगदीश शेट्टी
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१६. मा.उल्हास शेट्टी
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१८. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१९. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२०. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२१. मा.भारती फरांदे
२२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२३. मा.नेटके सुमन राजेंद्र
२४. मा.तरस बाळासाहेब जयवंत
२५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
२६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

२७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
२८.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
२९.मा.लोंढे गणेश नारायण
३०.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३१.मा. †›. संदीप गुलाब चिंचवडे
३२.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३३.मा.अपर्णा निलेश डोके
३४.मा.अनंत सुभाष को-हाळे
३५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३६.मा.प्रसाद शेट्टी
३७. मा.अविनाश (दादा) टेकावडे
३८.मा.काळभोर वैशाली जालिंदर
३९.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४०.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४१.मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४२.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४३.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४४. मा.सुपे आशा रविंद्र
४५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४६.मा.गोफणे अनुराधा देविदास
४७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
४८.मा.महेशदादा किसन लांडगे
४९.मा.श्रद्धा बाजीराव लांडे
५०.मा.लोंढे शुभांगी संतोष
५१.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५२. मा.पालांडे सुजाता सुनिल
५३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
५४. मा.कदम सदगुरु महादेव
५५. मा.कैलास महादेव कदम
५६.मा.वाघेरे सुनिता राजेश
५७. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
५८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
५९.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
६०.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
६१. मा.काळे विमल रमेश
६२.मा.पाडाळे निता विलास
६३.मा.विनोद जयवंत नढे

६४.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
६५.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
६६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
६७.मा.ओव्हाळ शेखर अशोक
६८. मा.यमुनाताई रमणनाना पवार
६९. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७०.मा.चौंधे आरती सुरेश
७१. मा.बापू उर्फ शत्रुध्न सिताराम काटे
७२. मा.बोकड रामदास गेणभाऊ
७३. मा.जवळकर वैशाली राहुल
७४. मा.जगताप राजेंद्र गणपत
७५. मा.शितोळे शैलजा बाबुराव
७६.मा.प्रशांत शितोळे
७७. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
७८. मा.गायकवाड संध्या सुरदास
७९.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
८०. मा.मोटे किरण बाळासाहेब
८१. मा.संजय केशवराव काटे
८२.मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
८३.मा.पाटील सुजित वसंत
८४.मा.बो-हाडे अरुण तुकाराम
८५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.टेकाळे, मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.पाटील - सहशहर अभियंता, मा.डॉ.रॉय - प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सखुबाई भीमराव भोसले-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर हनुमंत भोसले यांच्या मातोश्री व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसदस्य राहुल भोसले यांच्या आजी, सुधीर मोघे-प्रसिद्ध कवी, गीतकार, संगीतकार, विजय वाडेकर-ज्येष्ठ साहित्यिक,आकाशानंद-दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीचे माजी केंद्र उपसंचालक आणि ज्येष्ठ निर्माते, श्याम फरांदे-ज्येष्ठ पत्रकार, उत्तमराव पाटील-अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे सरचिटणीस आणि पुणे महापालिकेचे माजी नगरसदस्य यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना या सभेत श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, आजची सभा दि.२५ एप्रिल २०१४ दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी अशी विनंती करते.

**मा.सुरेखा गव्हाणे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दिनांक २५/०४/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २६

## सभावृत्तांत

**(दिनांक २०.२.२०१४, १८.३.२०१४ ची तहकूब सभा)**

दिनांक – २५.०४.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची दि.१८.०३.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२५.०४.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. (चिखले) मराठे अश्विनी अजित
२४. मा.भारती फरांदे
२५. मा.आर.एस.कुमार
२६. मा.जावेद रमजान शेख

२७.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२८.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९.मा.नंदा विकास ताकवणे
३०.मा.नेटके सुमन राजेंद्र
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६.मा.लोंढे गणेश नारायण
३७.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३९.मा.अपर्णा निलेश डोके
४०.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१.मा.जयश्री वसंत गावडे
४२.मा.प्रसाद शेट्टी
४३.मा.अविनाश (दादा) टेकावडे
४४.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४६.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४८.मा.वाबळे संजय मल्हारराव
४९.मा.मडिगेरी वर्षा विलास
५०.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५१.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५२.मा.सुपे आशा रविंद्र
५३.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५४. मा.अजित दामोदर गव्हाणे
५५. मा.गोफणे अनुराधा देविदास
५६.मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८.मा.महेशदादा किसन लांडगे
५९.मा.श्रद्धा बाजीराव लांडे
६०. मा.लोंढे शुभांगी संतोष
६१.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६२.मा.ननवरे जितेंद्र बाबा
६३.मा.सावळे सिमा रविंद्र

६४.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६५.मा.भोसले राहुल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७.मा.बहल योगेश मंगलसेन

६८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६९. मा.कदम सदगुरु महादेव

७०.मा.गिता सुशिल मंचरकर

७१. मा.कैलास महादेव कदम

७२.मा.छाया जगन्नाथ साबळे

७३.मा.वाघेरे सुनिता राजेश

७४. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७५. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७६.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७७. मा.काळे विमल रमेश

७८.मा.विनोद जयवंत नढे

७९.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८१. मा.बारणे निलेश हिरामण

८२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८४.मा.बारणे माया संतोष

८५.मा.ओव्हाळ शेखर अशोक

८६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८७.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८८. मा.नांदगुडे विलास एकनाथ

८९. मा.चौंधे आरती सुरेश

९०. मा.बापू उर्फ शत्रुध्न सिताराम काटे

९१.मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

९५.मा.जगताप राजेंद्र गणपत

९६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९७.मा.जगताप नवनाथ दत्तु

९८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९९. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे

१००.मा.जम सोनाली पोपट

१०१. मा.प्रशांत शितोळे
१०२.मा.काटे रोहितअप्पा सुरदास
१०३.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०४.मा.शेंडगे आशा सुखदेव
१०५. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०६.मा.संजय केशवराव काटे
१०७. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०८.मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०९.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.टेकाळे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.दुधेकर, मा.इंगळे, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.बरशेट्टी - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.बोदडे - प्र.अधिकारी (जनसंपर्क), मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, डॉ.राजेंद्र गोडे – माजी मंत्री **†›.** अधिक शिरोडकर – ज्येष्ठ कायदेतज्ञ आणि माजी खासदार, सिंदूबाई चिंतामण भालेकर – तळवडे गावाचे माजी सरपंच चिंतामण भालेकर यांच्या पत्नी,सरस्वती हरिभाऊ सस्ते,ह.भ.प. एकनाथ नाणेकर यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना या सभेत श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, आजची सभा दिनांक ०९/०६/२०१४ रोजी दुपारी २.३० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी विनंती करते.

**मा.अरुण बो-हाडे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दिनांक ०९/०६/२०१४ रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २६**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०.२.२०१४, १८.०३.२०१४, २५.०४.२०१४ ची तहकूब सभा)**

दिनांक – ०९.०६.२०१४ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची दि.२५.०४.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.०९.०६.२०१४ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१६. मा.उल्हास शेट्टी
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१८. मा.पवार संगीता शाम
१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२१. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२२. मा.भारती फरांदे
२३. मा.आर.एस.कुमार
२४. मा.जावेद रमजान शेख
२५. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२६.मा.पांढरकर निलेश शंकरराव
२७. मा.नंदा विकास ताकवणे
२८.मा.नेटके सुमन राजेंद्र
२९.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३०.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३२.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३३.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३४.मा.लोंढे गणेश नारायण
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३७. मा.अपर्णा निलेश डोके
३८.मा.अनंत सुभाष को-हाळे
३९.मा.पवार मनीषा काळूराम
४०.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४१.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४२.मा.शेख अस्लम शौकत
४३.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४५. मा.मडिगेरी वर्षा विलास
४६.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४७. मा.सुपे आशा रविंद्र
४८.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४९.मा.गोफणे अनुराधा देविदास
५०.मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५१.मा.महेशदादा किसन लांडगे
५२.मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५३.मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५४. मा.लोंढे शुभांगी संतोष
५५. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५६.मा.सावळे सिमा रविंद्र
५७. मा.पालांडे सुजाता सुनिल
५८. मा.कदम सदगुरु महादेव
५९.मा.गिता सुशिल मंचरकर
६०.मा.कैलास महादेव कदम
६१. मा.छाया जगन्नाथ साबळे
६२.मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

६३. मा.आसवानी सविता धनराज

६४. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६५. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६७. मा.काळे विमल रमेश

६८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

६९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७०. मा.विमलताई सुरेश जगताप

७१. मा.बारणे निलेश हिरामण

७२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७३. मा.ओव्हाळ शेखर अशोक

७४. मा.यमुनाताई रमणनाना पवार

७५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

७६. मा.कलाटे स्वाती मयुर

७७. मा.नांदगुडे विलास एकनाथ

७८. मा.चौंधे आरती सुरेश

७९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८०. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८१. मा.जवळकर वैशाली राहुल

८२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८३. मा.जगताप राजेंद्र गणपत

८४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

८६. मा.प्रशांत शितोळे

८७. मा.गायकवाड संध्या सुरदास

८८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८९. मा.शेंडगे आशा सुखदेव

९०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९१. मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील - सहशहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय - प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.तांबे, मा.दांगट - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**मा.महापौर** -उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृहाला विनंती करते, मा.राम पटवर्धन - ज्येष्ठ संपादक, मा.अनिलकुमार - एअरबोर्न टू चेअरबोर्नचे लेखक व वैमानिक, मा.ताहेर शेख - ज्येष्ठ पत्रकार यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करते व सभा दिनांक ५/७/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शनिवार दिनांक ५/७/२०१४ रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २६</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दिनांक २०.०२.२०१४, १८.०३.२०१४, २५.०४.२०१४,०९.०६.२०१४ ची तहकूब सभा)**

<u>दिनांक – ०५.०७.२०१४</u>  <u>वेळ – दुपारी ३.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची दि.०९.०६.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.०५.०७.२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदिश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७.मा.भारती फरांदे
२८.मा.आर.एस.कुमार
२९.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०.मा.पांढरकर निलेश शंकरराव
३१.मा.नंदा विकास ताकवणे
३२.मा.नेटके सुमन राजेंद्र
३३.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६.मा.लोंढे गणेश नारायण
३७.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८.मा.अपर्णा निलेश डोके
३९.मा.अनंत सुभाष को-हाळे
४०.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१.मा.प्रसाद शेट्टी
४२.मा.अविनाश (दादा) टेकावडे
४३.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४४.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४५. मा.शेख अस्लम शैकत
४६.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.वाबळे संजय मल्हारराव
४८.मा.मडिगेरी वर्षा विलास
४९.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५०.मा.सुपे आशा रविंद्र
५१.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५२.मा.गोफणे अनुराधा देविदास
५३.मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५४. मा.महेशदादा किसन लांडगे
५५. मा.श्रद्धा बाजीराव लांडे
५६.मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५७. मा.लोंढे शुभांगी संतोष
५८.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५९.मा.ननवरे जितेंद्र बाबा
६०.मा.सावळे सिमा रविंद्र
६१.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६२.मा.भोसले राहूल हनुमंतराव

६३.मा.पालांडे सुजाता सुनिल
६४.मा.बहल योगेश मंगलसेन
६५.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६६. मा.कदम सदगुरु महादेव
६७.मा.गिता सुशिल मंचरकर
६८.मा.कैलास महादेव कदम
६९.मा.छाया जगन्नाथ साबळे
७०.मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७१.मा.आसवानी सविता धनराज
७२.मा.वाघेरे सुनिता राजेश
७३.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७६.मा.काळे विमल रमेश
७७. मा.पाडाळे निता विलास
७८.मा.विनोद जयवंत नढे
७९.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८०.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८१. मा.विमलताई सुरेश जगताप
८२.मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८३.मा.बारणे निलेश हिरामण
८४.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८५.मा.बारणे माया संतोष
८६.मा.ओव्हाळ शेखर अशोक
८७.मा.यमुनाताई रमणनाना पवार
८८.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८९.मा.कलाटे स्वाती मयुर
९०. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९१.मा.चौंधे आरती सुरेश
९२.मा.बापू उर्फ शत्रुध्न सिताराम काटे
९३.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९४.मा.बोकड रामदास गेणभाऊ
९५.मा.जवळकर वैशाली राहुल
९६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९७.मा.जगताप राजेंद्र गणपत
९८.मा.शितोळे शैलजा बाबुराव
९९. मा.जगताप नवनाथ दत्तु

१००.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०१. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०२.मा.जम सोनाली पोपट
१०३.मा.प्रशांत शितोळे
१०४.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०६.मा.गायकवाड संध्या सुरदास
१०७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०८.मा.शेंडगे आशा सुखदेव
१०९.मा.मोटे किरण बाळासाहेब
११०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१११.मा.संजय केशवराव काटे
११२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११४.मा.पाटील सुजित वसंत
११५.मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.खांडकेकर, मा.गायकवाड, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.टेकाळे, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय - प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख - वैद्यकिय अधिक्षक, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.निकम, मा.सवणे, मा.काची, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.चिंचवडे, मा.काची, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.भोसले - कार्य.अभियंता, मा.उबाळे - प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -**उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ३

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ–**१) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/९/कावि/०२/२०१४, दि.७/०१/२०१४
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६३० दि.१६/१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयातील जीर्ण व गहाळ पुस्तकांवर यापूर्वी मार्च १९९८ अखेर मा.महापालिका सभा ठराव क्र.४३३७ दि.१८/०९/२००० व शासन निर्णयानुसार निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार आदेश क्र.सावा/२/कावि/४५/०६ दि.१०/०३/२००६ अन्वये जीर्ण व गहाळ पुस्तके निर्लेखित करण्यात आली आहेत. प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ मधील एकूण १४ सार्वजनिक वाचनालयातील एकूण १,७९७ जीर्ण पुस्तके र.रू.७९,९४५=७०(अक्षरी र.रू.एकोणऐंशी हजार नऊशे पंचेचाळीस पैसे सत्तर) यावर निर्लेखित करण्याची कार्यवाही केली असून त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथे सार्वजनिक वाचनालयाची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक वाचनालयासाठी आवश्यक जागा आहे. तरी पालिकेची इमारत आहे त्याठिकाणी वाचनालयाची परवानगी द्यावी.

**मा.आशा सूर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४९८ | विषय क्रमांक - ३ |
| दिनांक - ०५/७/२०१४ | विभाग - मा.नगरसचिव |

**संदर्भ–**१) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/९/कावि/०२/२०१४ दि.७/०१/२०१४
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६३० दि.१६/१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयातील जीर्ण व गहाळ पुस्तकांवर यापूर्वी मार्च १९९८ अखेर मा.महापालिका सभा ठराव क्र.४३३७ दि.१८/०९/२००० व शासन निर्णयानुसार निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार आदेश क्र.सावा/२/कावि/४५/०६ दि.१०/०३/२००६ अन्वये जीर्ण व गहाळ पुस्तके निर्लेखित करण्यात आली आहेत. प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ मधील एकूण १४ सार्वजनिक वाचनालयातील एकूण १,७९७ जीर्ण पुस्तके र.रू.७९,९४५=७०(अक्षरी र.रू.एकोणऐंशी हजार नऊशे पंचेचाळीस पैसे सत्तर) यावर निर्लेखित करण्याची कार्यवाही केली असून त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथे सार्वजनिक वाचनालयाची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक वाचनालयासाठी आवश्यक जागा आहे, तरी पालिकेची इमारत आहे त्याठिकाणी वाचनालयाची परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब विषय क्रमांक ५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ई-गव्हर्नन्स/५/कावि/१३/२०१४ दि.१५/०१/२०१४.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६८१ दि.२८/०१/२०१४

पोलिस आयुक्त कार्यालय परिमंडळ-३ करीता बीट मार्शल व गुन्हे शोधपथक पेट्रोलींग ट्रॅकींग सिस्टीम या संगणक प्रणालीसाठी आवश्यक संगणक यंत्रणा खरेदी करणे बाबतचा खर्च र.रू.16,11,900/-(अधिक कर) सदर संगणक प्रणालीची वार्षिक देखभाल दुरूस्ती पहिले वर्ष पुर्ण झालेनंतर पुढील प्रत्येक वर्षासाठी र.रू.3,53,400/- (वार्षिक) निविदा प्रसिद्ध न करता परंतू करारनामा करून थेट पद्धतीने मे.इन्फोटेक सॉफ्टवेअर अँन्ड सिस्टीम प्रा. लि. यांचेकडून करून घेणे तसेच मा.पोलिस उपायुक्त कार्यालय कामकाजाबाबतचे खर्चास धोरणात्मक बाब असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ६६ मधील अ.क्र.४२ नुसार व कलम ७३ अनुसुची प्रकरण ५ नियम २ (२) परंतुकेनुसार मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण पोलिस आयुक्त कार्यालय परिमंडळ-३ यांना पैसे द्यायचे मग शासन यांना पैसे देत नाही का? आदरणीय मा.आबा पाटील यांना विचारले पाहीजे. मागे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी अडीच कोटी दिले होते. ते कुठे बसवलेत हे आम्हाला एकदा बघू देत. त्यांना एकदा लेटर देऊन कळू दे, सीसीटीव्ही कॅमेरे कुठे बसवणार आहेत. दररोज रस्त्यावर येतो जातो आहोत. त्यांनी मागणी करायची आपण करुन द्यायचे. त्यांनी आपल्याबरोबर, आयुक्त साहेबांबरोबर कधी मिटींग घेतली होती का. त्यांनी आपल्याला पत्र दिले आणि आपल्याकडे मंजूरीसाठी विषय आला. हा विषय सभागृहापुढे यावा. त्यांनी एकदा आयुक्त साहेबांकडे यावे, महापौर साहेब तुमच्याकडे यावे. हा विषय तहकूब ठेवावा. तुम्हाला आमदार साहेबांनी सांगितले असेल विधी मंडळात एलबीटीचे काय करणार आहेत ते आम्हाला सांगा. एलबीटीबाबत विधी मंडळात काय करणार ते आम्हाला कळू दे. हा एलबीटीचा विषय झाल्यानंतर हा विषय मंजूर करावा. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवण्यात यावा. तुम्ही पैसे मंजूर करा. ते लगेच उद्या दारात येऊन उभे राहतील. आपण आज विचारपूर्वक पैसे द्यावेत. आम्हाला तसे सांगा, आम्हाला भेटले हे आहेत त्यांनी आम्हाला पैसे द्यायला सांगितले आहे. स्पष्ट सांगा. एलबीटी रद्द झालीतर शासनाकडून पैसे घ्यायचे. मी तुम्हाला विनंती करते की हा विषय तहकूब करावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब याठिकाणी पठाणताईंनी पहिला प्रश्न विचारला आहे. पोलिस आयुक्त कार्यालय परिमंडळ-३ यांना सीसीटीव्ही बसविण्यासाठी जे पैसे दिले होते त्याचे काय झाले. त्यांची अशी मागणी असलीतरी हा विषय आयुक्तांकडून आलेला आहे. डायरेक्ट पोलिस विभागाकडून आलेला नाही. त्यामुळे याची काय आवश्यकता आहे व कितपत आवश्यकता आहे याची माहिती प्रशासनाने द्यावी व नंतर यावर निर्णय घ्यावा. प्रशासनाने सांगावे, सीसीटीव्ही याची कितपत आवश्यकता आहे.

**मा.राजीव जाधव (महापालिका आयुक्त)** - मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब,पोलिस विभागाकडून पत्र देण्यात आले होते त्यामुळे हा विषय मा.महापालिका सभेपुढे ठेवण्यात आला आहे. सन्मा.सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे हा विषय खात्री करायची असेलतर तहकूब करता येईल. पत्र दिले त्याप्रमाणे लगेच करा असा प्रशासनाचा आग्रह नाही. पोलिस खात्याला याची आवश्यकता आहे. त्यांचे पत्र आले होते. आपल्या शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून हे पत्र दिले गेले आहे. सीसीटीव्हीचे काय झाले असा प्रश्न मा.शमिम पठाण यांनी विचारला होता. २/३ बैठका झाल्या. मला माहित आहे त्यानुसार सांगू इच्छितो की, पिंपरी चिंचवड महापालिकेने चांगले सहकार्य केले आहे. आपण त्यांची एकही अंडरग्राऊंड केबल लेडाऊन करायची त्यांची एकही विनंती अमान्य केलेली नाही. त्यांनी झोन केलेले आहेत. आपल्या झोनचे काम सगळ्यात आधी पूर्ण झालेले आहे. तथापि जी एजन्सी आहे जिला डिपार्टमेंटने काम दिलेले आहे. त्यांनी कंट्रोल रुम,सॉफ्टवेअर, हार्डवेअर जे काही त्यासाठी लागते ते अद्याप घेतलेले नाही. परंतू सॉफ्टवेअर हार्डवेअर व कंट्रोल रुम व इतर सिस्टीम पूर्ण करणार आहेत. ते अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यासाठी ही संस्था बँकेकडून जाणे व इतर गोष्टी करते आहे. मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे याबाबतीत बैठक झाली होती आणि मा.उपमुख्यमंत्री यांनी व विधान परिषद सदस्य बापट साहेब यांनी सुद्धा नाराजी व्यक्त केली होती की, शासनाने मंजूर करुन सुद्धा आवश्यक त्या स्पीडमध्ये ही संस्था काम करत नाही. त्यामुळे दोन्ही शहरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहीला आहे. म्हणून त्यांनी फास्ट काम करायच्या सूचना समक्ष दिलेल्या आहेत.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, सदर सुचनेस अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४९९ | विषय क्रमांक - ५ |
| दिनांक - ०५/७/२०१४ | विभाग - मा.आयुक्त |

१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ई-गव्हर्नन्स/५/कावि/१३/२०१४ दि.१५/०१/२०१४.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६८१ दि.२८/०१/२०१४

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब विषय क्रमांक ६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.सुषमा तनपुरे मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७६० दि.२८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग कॅन्सर किडनी मेंदूचे आजार दुर्धर आजार गंभीर अपघातग्रस्त आदि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पीडीतांना मदत महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या रक्कम रु.२५,००,०००/- या अनुदानांतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय मुंबई–४०० ०३२ दिनांक १८/१२/२००७ नुसार या ट्रस्टला दरवर्षी र.रु.२५,००,०००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरिता र.रु.२५,००,०००/- इतके अनुदान ट्रस्टला मंजूर करणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी -** मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब आपण खरेतर २५ लाख रुपये असतील तरी पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या बघितली तर आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण तुमच्याकडे येतात. त्यावेळी रु.५००० सुद्धा दिले जातात. कधी कधी रुग्णाला दहा लाख देखील खर्च येतो त्यावेळी रु.५००० दिले जातात. लोकांना सुद्धा वाटते रु.५०००/- मिळणार आहेत. माझी उपसूचना आहे. आपण परवानगी घ्यायला पाहीजे की, दहा हजार खर्च असेल तर त्याप्रमाणे देतो. इतर महापालिकांमध्ये कशा पद्धतीने निधी दिला जातो याचीसुद्धा माहिती प्रशासनाकडून घेण्यात यावी. पुणे महापालिकेत सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने निधी देण्याची रचना आहे. तिथे कशा पद्धतीने निधी दिला जातो. नागरीकांसाठी महापौर निधी आहे तसा आम्हा नगरसेवकांसाठी सुद्धा निधी असला पाहीजे. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते व हा विषय मंजूर करण्यात यावा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरीकांसाठी वैद्यकीय अर्थसहाय्य म्हणून र.रु.५०००/- महापौर निधीतुन देण्यात येते. तथापि त्याऐवजी र.रु.१००००/- महापौर निधीतून वैद्यकीय सुविधेसाठी देण्यात यावे. तसेच मनपाच्या आजी व माजी नगरसदस्यांना व त्यांचे कुटूंबियांना (कुटूंब या संज्ञेत येणा-या) महानगरपालिकेमार्फत वैद्यकीय विमा उतरविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.श्रद्धा लांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५०० विषय क्रमांक - ६
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.सुषमा तनपुरे मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७६० दि.२८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग कॅन्सर किडनी मेंदूचे आजार दुर्धर आजार गंभीर अपघातग्रस्त आदि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पीडीतांना मदत महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या रक्कम रु.२५०००००/- या अनुदानांतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय मुंबई–४०० ०३२ दिनांक १८/१२/२००७ नुसार या ट्रस्टला दरवर्षी र.रु.२५०००००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरिता र.रु.२५०००००/- इतके अनुदान ट्रस्टला मंजूर करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरीकांसाठी वैद्यकीय अर्थसहाय्य म्हणून र.रु.५०००/- महापौर निधीतुन देण्यात येते. तथापि त्याऐवजी र.रु.१००००/- महापौर निधीतून वैद्यकीय सुविधेसाठी देण्यात यावे. तसेच मनपाच्या आजी व माजी नगरसदस्यांना व त्यांचे कुटूंबियांना (कुटूंब या संज्ञेत येणा-या) महानगरपालिकेमार्फत वैद्यकीय विमा उतरविण्यास मान्यता देणेत यावी.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५०१ विषय क्रमांक - ७
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.सुषमा तनपुरे मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७६२ दि.२८/०१/२०१४

टाळगांव चिखली प्रासादिक दिंडी ट्रस्ट तर्फे १८ मार्च २०१४ रोजी तुकाराम बीजेनिमित्त मिरवणूक व कार्यक्रम आयोजित केले असून त्यासाठी र.रु.१०००००/-(अक्षरी

र.रु. एक लाख) अनुदान टाळगांव चिखली प्रासादिक दिंडी ट्रस्ट नांवे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शुभांगी बो-हाडे** - मा.महापौर साहेब विषय क्रमांक ८वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/०७/कावि/१५/२०१४ दि.०८/०१/२०१४.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७७३ दि.०७/०२/२०१४

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडे आकारणी दर निश्चित करताना महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सबब जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करणेत आली असल्याने मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी मा.आयुक्त यांनी आकाशचिन्ह व परवाना विभागाकडील जाहिरातकर व जागाभाडे दरामध्ये सन २०१४-१५ चे दरनिश्चितीसाठी विषय सादर केलेला आहे. विषयपत्राप्रमाणे जाहिरातकरामध्ये कोणतीही वाढ न करता जागाभाडे रक्कमेमध्ये १०० टक्के वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, हा विषय तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेस अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५०२ विषय क्रमांक - ८

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/०७/कावि/१५/२०१ दि.०८/०१/२०१४.

**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७७३ दि.०७/०२/२०१४

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५०३ विषय क्रमांक - १०

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७ दि.०६/०९/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२२ दि.१८/०१/२०१४

डॉ.के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, आत्ता डॉ.रॉय यांच्या पदोन्नतीचा विषय सभागृहामध्ये आला आहे. हा विषय गेले वर्षभर या सभागृहात येतो आहे. हा विषय येत असताना बरेचसे पदाधिकारी असतील, सदस्य असतील यांना या विषयाची मोठी उत्सुकता लागली आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, डॉ.रॉय हे राजिनामा देऊन निवडणुकीला उभे राहीलेतर ते निश्चित आमदार होतील अशा पद्धतीने त्यांचा प्रचार झाला आहे. म्हणून हा विषय फेटाळण्यात यावा. कारण माझ्याकडे दोन/चार मुद्दे असे आहेत. आपण पाहिलेतर सभागृह व प्रशासन दोन्हीही अडचणीत येऊ शकतात म्हणून वाचून दाखवतो. १) आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाशी समकक्ष वेतनश्रेणीत असलेले अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी पदावर मा.महापालिका सभेने पदोन्नती दिलेले श्री.पवन साळवे यांची आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर नेमणूक न करता कनिष्ठ वर्ग २ वैद्यकीय अधिका-यास पदभरती देण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेकामी महासभेपुढे ठेवायचे कारण काय? २) या महासभेने ठराव क्र.४६०४ दि.४/१२/२००१ नुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर बढती देण्यासाठी डी.पी.एच. प्राप्त केल्यानंतर सदर पदावर ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे अशी अट ठेवलेली आहे. सदर अट पूर्ण करत नसल्यामुळे एका वैद्यकीय अधिका-याला आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदभरतीत अपात्र ठरवले होते. डॉ.रॉय ही अट पूर्ण करत नसताना त्यांना इथे पदोन्नती देण्याचा महासभेपुढे हा प्रस्ताव ठेवण्याचे कारण काय? ३) या नियमबाह्य पद भरतीत केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने कोणावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत याबाबत खुलासा करावा. सदर नियमबाह्य बेकायदेशीर पदभरती निर्णय प्रक्रियेमुळे राज्य शासन व राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने

महापालिकेवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. ही त्यांची जबाबदारी कोणाची आहे शासनाची का महासभेची. या पूर्वीच्या आयुक्त यांनी घेतलेल्या या बेकायदेशीर व नियमबाह्य निर्णयाचे खापर मा.महासभेपुढे ठेवण्याचे कारण काय? प्रशासन यासाठी का पाठिंबा देते आहे? नियमबाह्य पदभरती निर्णय प्रक्रिया विरोधात न्यायालयात हे आवाहन दिल्यामुळे महापालिकेची बदनामी देखील होईल व याची जबाबदारी प्रशासन घेणार आहे का? मा.महापौर साहेब, आपण हा प्रश्न फेटाळून लावावा. हा विषय सातत्याने सभागृहात येतो आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, सर्व सभासदांचे सगळे म्हणणे ऐकून घ्यावे व हा विषय फेटाळून लावावा अशी विनंती करतो.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयावर मला एक विचारायचे आहे की, डॉ.रॉय हे या पदासाठी पात्र आहेत का अपात्र आहेत याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेच हा विषय गेले ७/८ महिन्यांपासून मा.महापालिका सभागृहात गाजतो आहे. मागील २/४ महिन्यांपूर्वी ज्यावेळी परदेशी साहेब होते, त्यावेळी सुद्धा हा विषय सभागृहात गाजला होता. मला सभागृहाला विनंती करायची आहे, प्रशासनाला विनंती करायची आहे की, काळभोरताईंनी सांगितल्याप्रमाणे हा विषय पूर्वी सभागृहात येण्याअगोदर मंजूर केला नव्हता का. हे प्रशासन आमच्यापासून लपवते आहे का? परदेशी साहेबांनी मागील २/४ महिन्यांपूर्वी खुलासा केला होता. त्यासंदर्भात आपले म्हणणे काय आहे? आयुक्त साहेबांनी जो जो खुलासा केला होता, तो परत एकदा वाचून दाखवतो. (खुलासा वाचून दाखवला.) मागील सभेच्या मिनिटस् वाचून पहा, यात आयुक्तांनी खुलासा केला आहे. आयुक्त साहेबांनी जो खुलासा केला आहे तो चुकीचा आहे का किंवा प्रशासनाने ठेवलेला हा विषय चुकीचा आहे का? महाराष्ट्र शासनाच्या जी.आर.मध्ये हे सरळ सरळ म्हटले आहे. मला तुम्हाला उदाहरण द्यायचे आहे की, शिक्षण मंडळ प्राथमिक शाळेत शिक्षकांची भरती करताना डी.एड. शिक्षण असावे असा नियम लागू होतो. बी.एड. चा नियम लागू होत नाही. मग त्यावेळी बी.एड. शिक्षणाचा विचार करतो का. त्याचप्रमाणे या जी,आर मध्ये या पदासाठी डी.पी.एच. असावे हे क्लिअर कट म्हटले गेले आहे. एम.बी.बी.एस. व डी.पी.एच. डिग्री आणि वैद्यकीय अधिकारी पदावरील कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असे क्लिअर कट म्हटले असताना, प्रशासन प्रस्ताव ठेवत असताना आपण कोणत्या पद्धतीने दिशाभूल करतोय. प्रशासन दिशाभूल करतेय का? विषय चुकीचा आहे का? परदेशी साहेबांसारख्या आय.ए.एस अधिका-याने केलेला खुलासा चुकीचा आहे का? मग आम्हाला इलेक्शनला उभे रहायची काय गरज आहे? तो त्यांचा प्रश्न आहे. हे शासनाचे नियम महापालिकेला लाएबल आहेत. त्यांना प्रमोशन मिळाले आहे. कोण कोणाला काय देतोय यापेक्षा प्रशासन सभागृहाकडे काय आणतेय ते आणले आहे. जे काही करायचे तो निर्णय सभागृह घेणार आहे. व्यक्तिगत बोलण्यापेक्षा नियमांत काय आहे, प्रशासनाचा नियम काय किंवा शासनाने काय ठरवले याचा खुलासा करावा. टेकाळे साहेबांना इथे बोलवण्यात यावे आणि त्यांनी खुलासा करावा, खरे काय ते सांगावे. गेले ७/८ महिने हा प्रलंबित प्रश्न आहे. आमच्या आमच्यात वाद होतो आहे.

**मा.महापौर** – खुलासा करावा.

**मा.टेकाळे (सहा.आयुक्त, प्रशासन)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा सभागृह, प्रशासनाने हा जो प्रस्ताव ठेवला आहे, तो नियमाप्रमाणे ठेवलेला आहे. आणि त्याप्रमाणे मा.विधी समितीने शिफारस करुन महासभेपुढे आणला आहे. या पदाची जी अर्हता आहे, त्यामध्ये डि.पी.एच. आणि ५ वर्षांचा मेडिकल ऑफीसरचा अनुभव अशी आहे आणि त्याप्रमाणे हा विषय सभागृहापुढे येऊन शासनाकडे मंजुरीसाठी जाणार आहे. इथेच अंतिम होणार नाही. याचे अंतिम अधिकार शासनाचे आहेत. सेवाज्येष्ठता व क्वालिफिकेशननुसार हा विषय बरोबर आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला विचारायचे आहे, हा विषय नावासकट बरोबर आहे का?

**मा.टेकाळे (सहा.आयुक्त, प्रशासन)** – बरोबर आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी टेकाळे साहेबांचे अभिनंदन करतो. आपण अतिशय शॉर्टकटमध्ये उत्तर दिले आहे. आयुक्त साहेबांच्या हे निदर्शनास आणून देतो की, ज्यावेळी एखादा अधिकारी कोणत्याही परीक्षेसाठी किंवा सेवाज्येष्ठता मिळण्यासाठी किंवा त्याची पदोन्नती होण्यासाठी शासनाच्या इतर परीक्षा घेत असतो, तशी डॉ.रॉय यांनी डी.पी.एच. परीक्षा पास करत असताना किंवा त्यांचा कार्यकाल पूर्ण करत असताना, माझ्या मते ९ ते ५ दरम्यान काम केले आहे. त्याच वेळेत पिंपरी चिंचवड महापालिकेत सुद्धा काम केले आहे. हे योग्य आहे का अयोग्य आहे? असे असेलतर याच्यापुढे असा न्याय कोणाला दिलेला आहे. डीपीएच परीक्षा पास करताना ५ वर्षांच्या कालावधीत पिंपरी चिंचवड महापालिकेचा पगार घेऊन आपण त्यांना परीक्षा पास करायचा, मदत करायचा प्रयत्न केला आहे. अशी किती अधिका-यांना मदत केली आहे. असे करायचे अधिकार आपल्याला आहेत का? आत्ता जे.ई. यांना शिक्षणासाठी २ वर्षांच्या सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. म्हणजे एका माणसाला एक न्याय व दुस-या माणसाला दुसरा न्याय. वशिलेबाजी करायची. डि.पी.एच. करताना महापालिकेचा देखील पगार घ्यायचा, हा आपल्याकडे योग्य न्याय दिला जातो का? अनधिकृत बांधकाम केले असल्यास नगरसेवक पद रद्द करण्याबाबत ठराव इथे होतो. सभागृहापुढे अनेक विषय आहेत. एक डॉक्टर किंवा एक पदाधिकारी सभागृहाचे किंवा नियमाचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकाम करतो. त्याच्यावर एफ.आय.आर. दाखल आहे. असे असताना एकिकडे नगरसेवक पद रद्द करा म्हणून ठराव करतो. आमचा या विषयाला विरोध होतो. जो मनुष्य कायदेशीर दोषी आहे, त्याच्यावर एफ.आर.आय. दाखल आहे, गुन्हा दाखल झाला आहे. असे असताना पदोन्नती देणे योग्य नाही. आम्ही कोर्टात जाऊन, आपल्या विरोधात सुद्धा कोर्टात जाऊ. तुम्ही चुकीच्या पद्धतीने करताय. डी.पी.एच. करत असताना मेहेरबानी होते का? एखाद्या अधिका-याला आपण सक्तीच्या रजेवर पाठवतो. आणि यांना ५ वर्षे पगार देतो. आत्ताचा चालू विषय आहे. बलिते नावाच्या माणसाला सक्तीच्या रजेवर पाठवतो आणि यांच्यावर मात्र मेहेरबानी करतो. ९ ते ६ ड्युटी असेलतर डी.वाय.पाटील कॉलेजमध्ये कधी परीक्षा दिली, वाय.सी.एम. मध्ये कधी काम केले.

ड्युप्लिकेट रॉय होते का. परीक्षा पास करताना त्याला योग्य न्याय दिला का? कामावर असतील तर परीक्षा कधी दिली. तिथल्या ड्युटीचा प्रश्न व आपल्याकडील सुद्धा प्रेझेंटी बुक माझ्याकडे आहे. त्याचबरोबर तिथल्या रजिस्ट्रेशनमध्ये एन्ट्री आहे. आपल्याकडे सुद्धा काम केल्याची एन्ट्री आहे. असे असताना डॉक्टर काय आपला जावई आहे का. मला कोणाच्याच नावाचे देणे घेणे नाही. जे योग्य आहे ते करा. चुकीचे असेलतर त्याला आम्ही पाठिंबा देणार नाही. आम्ही सुद्धा कोर्टात जाऊ. डॉ.साळवी यांच्याशी आम्हाला काही देणे घेणे नाही. त्या विषयात डी.पी.एच. परीक्षा व त्याचा कार्यकाल आहे. टेकाळे साहेबांनी याचा खुलासा करावा. आपल्याकडे काम करत असताना त्यांनी दोन्ही जबाबदा-या एकत्रित कशा पार पाडल्या गेल्या. मग हे कशा पद्धतीने पास झाले? का वेगळ्या पद्धतीने सर्टीफीकेट प्राप्त केले. डी.पी.एच. केल्यानंतर ५ वर्षांचा मेडिकलचा अनुभव त्यांनी सांगितला आहे. मग त्यांनी मेडीकलचा अनुभव घेतला का, हे कोणत्या कायद्यात बसते आहे. डॉ.रॉय यांच्या नावाला विरोध नाही. चुकीच्या कामाला विरोध आहे. चुकीचे काम केलेतर जी सजा आमच्यासाठी आहे तीच त्यांच्यासाठी पण पाहीजे. इथे मा.विनया तापकीर यांचा विषय आला आहे. या विषयात कोणाचेतरी जुने बांधकाम आहे. त्यांच्या नावावर काही नाही, हे जगजाहीर करतो. मा.विनया तापकीर या सुद्धा या बदनामीला सामो-या जात आहेत. १९९७ पूर्वीची आमची घरे आहेत. हे सगळे असताना अनधिकृत बांधकामामुळे नगरसेवकांना डिसक्वॉलिफाय करण्यासाठी मंजूरी घेत असाल तर एका विषयाला हा न्याय, दुस-या विषयाला दुसरा न्याय. कोण माणूस याच्याशी आम्हाला देणे घेणे नाही. आम्ही कोणाची शिफारसही करणार नाही. कोणी आमचा पाहुणा नाही, कोणी आमचा नातेवाईक नाही. कोणाचा आमचा संबंध नाही. पण योग्य न्यायाने निर्णय करत असाल तर आम्ही मंजूरी देऊ. चुकीच्या कामाला मंजूरी देत असाल तर आम्ही विरोध करतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.रॉय यांचा विषय अनेक दिवसांपासून अजेंडावर आहे. खरेतर आत्ता मा.टेकाळे साहेबांनी सांगितले, हा विषय अधिकृत आहे व नियमानुसार आहे. मला एक उत्तर सांगा की, राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती समितीने याबद्दल काही पत्रव्यवहार केला आहे का?

**मा.टेकाळे** (सहा.आयुक्त) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.पवन साळवे यांनी या आयोगाकडे तक्रार अर्ज केला होता. त्याअनुषंगाने जी काही वस्तुस्थिती आहे ती आयोगाला कळवली आहे. त्या आयोगाने सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडेही पत्र पाठवले आहे. आम्ही त्यांच्याकडे सर्व माहिती दिलेली आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – याबाबतीत तुम्हाला आयोगाकडून काही आदेश आयुक्तांच्या नावाने आले आहेत का?

**मा.टेकाळे** (सहा.आयुक्त) – सचिव, नगरविकास यांच्याकडे पत्र दिले आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – महापालिकेकडे त्याची प्रत आली आहे का? त्यात काय आहे ते सांगा.

**मा.टेकाळे** (सहा.आयुक्त) – महापालिकेकडे त्याची प्रत आलेली आहे. ती मागवतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जसे आत्ता मा.दत्ता साने यांनी सांगितले कोणत्याही व्यक्तीबद्दल त्याचे प्रमोशन याबद्दल द्वेष व्यक्त करायचा नाही. महापालिका नियमानुसार काम करते काम नियमानुसारच झाले पाहीजे. डॉ.रॉय यांच्याशी वैयक्तिक द्वेष नाही. त्यांच्या विषयी जे आरोप आहेत. त्यांना नियुक्त करण्यासाठी जे नियम वापरले गेले आहेत ते मुळात चुकीचे आहेत. ते पाच वर्षांचा कोर्स करत असताना त्याचवेळी महापालिकेत नोकरी देखील करत होते. आपल्याला हा नियम माहित असेल एक सरकारी नोकरी करत असताना दुसरी सरकारी नोकरी मिळेल असा कोर्स करत असालतर एकतर तो त्या नोकरीवर रजेवर असला पाहीजे किंवा त्याला तो कोर्स करत येणार नाही. असे असताना त्यांनी कोर्स पूर्ण केला त्यांचा पगार काढला गेला. त्यांची हजेरी लावली गेली. ज्यांनी हजेरी लावली ज्यांनी पगार काढला त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहीजे. त्यांना नोकरी करत असताना ज्यांनी परमिशन दिली त्यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहीजे. एकटे डॉ.रॉय लाडाचे नाहीत. यासंबंधी जे जे अधिकारी आहेत ज्यांनी त्यांचा पगार काढला हजेरी लावली त्या संबंधित सर्व अधिका-यांवर कायदेशीर कारवाई झाली पाहीजे. दुसरी गोष्ट म्हणजे अनधिकृत बांधकाम असताना त्यांना पदावरुन निलंबीत करायला पाहीजे होते. तसे आपण केलेले नाही. मागील टर्ममध्ये ३०/३५ नगरसेवकांच्या बेकायदेशीर बांधकाम म्हणून अजेंडावर ४ वर्षे अजेंडावर विषय आला होता. या नगरसेवकांना बदनामी सहन करावी लागली. बेकायदेशीर बांधकाम म्हणून मा.मुख्यमंत्र्यांचे आदेश होते, पद रद्द होईल. यांचे बेकादेशीर बांधकाम असेलतर त्यांना मुळात त्या पदावर ठेवता कामा नये. पदावर ठेवलेच आहे, परत आपण त्यांना पदोन्नती देतोय, प्रमोशन देतोय. एकट्या डॉ.रॉय यांच्यामुळे महापालिका चालणार आहे का? सगळ्यांना सारखा न्याय देताना आपण बेकायदेशीररित्या जरी हा विषय मंजूर केला, त्यांना प्रमोशन दिले तर महापालिका सभा विरोधात, प्रशासक म्हणून आयुक्तांच्या विरोधात सुद्धा कोर्टात याचिका दाखल करावी लागेल, याची आपण कृपया नोंद घ्यावी. आणि सदर विषय मंजुर करणार असाल तर माझा विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर डॉ.रॉय किंवा डॉ.साळवी या कुठल्या एका व्यक्तीविषयी वाद नाही. हा त्यांच्या पात्रतेविषयी वाद आहे. माझी सभागृहाला महापौरांना विनंती करायची आहे, हा प्रस्ताव थोडासा संयम पाळून परत प्रशासनाकडे पाठवून या पदासाठी काय पात्रता पाहीजे याचा संयुक्त प्रस्ताव तुम्ही सादर करावा अशी विनंती करतो. हा प्रस्ताव फेरसादर करावा.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेत गेले ७/८ महिने हा विषय कशाना कशाप्रकारे फिरलेला आहे. किती चर्चा झाली आहे. तीच तीच चर्चा परत परत झाली आहे. यापूर्वी महासभेच्या आधीच्या सभेत डॉ.रॉय यांच्याकडून फेसबुकवरुन काही आरोप केले गेले. त्यामुळे हा विषय गाजला. त्यानंतर अनधिकृत बांधकामाचा विषय मा.दत्ता साने यांनी घेतला. पिंपरी चिंचवडमध्ये राहत असताना प्रत्येक नागरीकाला एकच कायदा, एकच

न्याय लागू पडतो. त्याप्रमाणे अनधिकृत बांधकामाचे हे झेंगाट चालू होण्याआधी सगळ्यांची बांधकाम झाले होती. नागरीकांना नोटीसा गेल्या, तशी डॉ.रॉय यांना सुद्धा नोटीस गेली. पत्राशेड अनधिकृत आहे. त्यावेळी त्यांनी या नोटीशीवर कारवाई म्हणून पत्र्याची शेड काढून घेतली. त्यानंतर जी सजा त्या नागरीकांना, ती डॉ.रॉय यांना नाही, हे बरोबर आहे का. डॉ.रॉय यांच्याबरोबर इतर कर्मचा-यांना सुद्धा अनधिकृत बांधकाम काढून घ्यावे अशा नोटीसा दिल्या होत्या. त्यावेळी परदेशी साहेब यांना वरिष्ठांनी सुद्धा समज दिली होती. परंतु ते त्याच गोष्टीवर ठाम राहीले होते. डिपीएचचा दुसरा विषय आहे. खरेतर सन्मा.नगरसेवकांना अशी माहिती मिळतेय ते माहिती संकलन निश्चितपणे विभागाच्या माध्यमातून होत असते. हा एक महत्वाचा विषय आहे. एवढे मोठे हॉस्पीटल, एम.ओ.एच हे पद कायम शापित आहे. यापूर्वी डॉ.नागकुमार कुणचगी नावाचे एक गृहस्थ एम.ओ.एच होते. त्यांनी तर हा किल्ला २/४ वर्षे लढला होता. डॉ.अय्यर यांचा आलेला प्रस्ताव ते थांबवायचे. आम्ही बहुमताने हा विषय फेटाळून लावायचो. ज्या पक्षाचे बहुमत असेल त्यांच्या मनात असेलतर मग तो विषय होणार आणि त्यांच्या मनात नसेलतर हा विषय होणार नाही. मग ती व्यक्ती पात्र असो किंवा नसो याला शून्य किंमत देतो. इथे १०वी नापास व्यक्ती सुद्धा असिस्टंट कमिश्नर झाली आहे, हा या महापालिकेचा इतिहास आहे. पदोन्नतीचा अधिकार फक्त महापालिकेला आहे. शासनाने ते मंजूर करायचे का नाही हा अधिकार शासनाला आहे. परंतू डिपीएचचा जो आरोप केला जातो, त्यात तथ्य आहे असे मलासुद्धा वाटते. सेम टाईमींगमध्ये ड्यूटीच आहेत, त्याचे क्लॅरीफीकेशन होणे गरजेचे आहे. त्याचा अर्थ काय निघतो? ते बेकायदेशीर आहे का. मग यातील मध्यम मार्ग सांगते. डॉ.नागकुमार कुणचगी, डॉ.अय्यर यांच्या भांडणाला आम्ही सगळे वैतागलो होतो. सगळ्या अधिका-यांना, पदाधिका-यांना वाईट वाटले होते. त्यासाठी ऍडीशनल पद निर्माण केले आहे. मा.नागकुमार कुणचगी या ऍडीशनल पदालासुद्धा मंजूरी देऊ देत नव्हते. म्हणून त्यातून मध्यम मार्ग काढला. पे स्केल सेम असेल. आत्ता डॉ.रॉय यांना दिले नाहीतरी त्यांच्याकडे पद आहेच. जोपर्यंत विषय करत नाही, तोपर्यंत त्यांच्याकडे चार्ज राहतो आहे. कोणाचा मान होतो आहे, कोणाचा अपमान होतो आहे. सभागृहाचा वेळ मात्र जातो आहे. नगरसेवकांना मनस्ताप होतो आहे. आपआपसांत भांडणे होतात. माझी सत्ताधारी पक्षाच्या पदाधिका-यांना विनंती आहे, अशा प्रकारचे विषयांवर चर्चा करुन त्या व्यक्तीची मानहानी होते. ते डॉक्टर पदावर काम करत आहेत. त्याचा परिणाम संपूर्ण व्यवस्थेवर होतो. यावर जास्त चर्चा न करता तुम्ही मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अशा प्रकारची २ पदे जी ऑलरेडी कार्यरत आहेत. तुमच्या कार्यालयात दोघांना समोर बसवा. तुमच्याकडे अधिकार आहेत. सन्मा.सदस्य जे सांगतात. मा.उल्हास शेट्टी असतील,मा.दत्ता साने असतील, मा.चंद्रकांता सोनकांबळे असतील, खरेतर पदोन्नती हा नगरसेवकांसमोर विषय नाही. परंतू असे का होते याचे आत्मपरिक्षण खरेतर अधिका-यांनी करायला हवे. मग आम्हाला झुलवत ठेवायचे. आणि प्रशासनाने आपला हेतू साध्य करायचा. यामुळे चुकीच्या पद्धतीने हा पायंडा पडतोय. यातून मध्यम मार्ग निघत असेल तर सर्वांना त्यात बसवून. आमच्या मागची ही पीडा घालवा. लवकर निर्णय घ्या. हा विषय तहकूब ठेवावा किंवा दप्तरी दाखल करा. यातून विषय सुटत नाही. यातून मार्ग काढणे गरजेचे आहे. यावर काहीतरी तोडगा काढा. ज्या गोष्टींची सन्मा.सदस्यांना शंका आहे, त्याचा खुलासा टेकाळे साहेबांनी करावा.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर बरेच महिने हा विषय अजेंडावर आहे. यातून बरेच वाद होत आहेत हे या सभागृहाने अनुभवले आहे. काल सुद्धा पक्षाच्या झालेल्या बैठकीत सांगितले होते व्यक्ती विरोध केलातर मतभेद होतात व नंतर सगळी कामे करायला अवघड जाते. हे खरे असले तरी कुठेतरी नियमांची पूर्तता होते का, सगळीकडे नियमांचे पालन केले जाते का याची सुद्धा अंमलबजावणी करणे प्रशासक म्हणून आयुक्त साहेबांचे कर्तव्य असते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे टेकाळे साहेबांनी ज्याप्रमाणे त्यांचा विषय सांगितला, आम्ही हा विषय जसा ठेवला तसा योग्य आहे. त्याची शैक्षणिक अर्हता पदवी नियमानुसार आहे. हे तसे असेलतर आमच्यात समज/गैरसमज होत आहेत. त्याचे कारण काय हे सुद्धा प्रशासनाने सभागृहासमोर स्पष्टपणे समजेल अशा भाषेत सांगणे अपेक्षित आहे. हा प्रशासनाचा वाद आहे. परंतू त्याचे पडसाद आमच्यात निघत आहेत. खरेतर ६ महिन्यांपूर्वीच डॉ.रॉय किंवा डॉ.साळवे यांचा नेमणुकीचा निर्णय झाला असता. मध्यंतरीच्या काळात घडलेले चित्र विचित्र प्रकार, यातून डॉ.रॉय यांनी जाहीर केलेला माफीनामा इथे सांगितला होता की, माझ्याकडून गैरसमजातून हा प्रकार घडला. त्याबद्दल मी माफी मागतो. परत १/२ महिने विषय तहकूब झाला. नंतर ब-याचशा घटना घडल्या. नंतर २/३ महिन्यांपूर्वी डॉ.श्रीकर परदेशी यांनी विषय सादर झाला होता, त्यावेळी खुलासा केला होता. त्यावेळी एक गोष्ट आठवते की, हा खुलासा होत असताना ते शंभर टक्के कोणाच्या बाजुने आहेत हे चित्र माझ्यासारख्याला जाणवले नाही. मा.उल्हास शेट्टी यांनी मिनिटस् वाचून दाखवले. त्यांना स्पष्ट मत विचारले होते. स्पष्ट सांगा. यात शैक्षणिक अर्हता व अनुभव यात कोण सरस आहेत. त्यात जो जिता वही सिकंदर याप्रमाणे कमी फरकाने ते अधिक दिसत असतील तर मात्र प्रशासक म्हणून, कमिश्नर म्हणून तुम्हाला ताबडतोब निर्णय घ्यावा लागणार आहे. टेकाळे साहेबांनी सांगितले, हा काही अंतिम निर्णय नाही. सभागृह जो निर्णय घेईल तो अंतिम राहणार नाही. राज्य शासन याचा निर्णय घेणार आहे. सोनकांबळे ताईंनी सांगितले, अनुसूचित जाती आयोगाने सुद्धा या पदाबाबत विचारणा केली, खुलासा मागितला. त्यांनी नगरविकास विभागाकडे, आयुक्तांकडे खुलासा मागवला. आयुक्तांनी त्यांचा खुलासा केला. हा खुलासा सभागृहापुढे अजून आलेला नाही. या सभागृहात या संपूर्ण विषयाबाबतीत संभ्रम झाल्याशिवाय राहणार नाही हे तेवढेच सत्य आहे. त्यामुळे त्याबाबतीत ब-याच शंका कुशंका निर्माण झाल्या. ५ वर्षांचा अनुभव घेत असताना डिपीएच कोर्स केला त्यावेळी त्यांचा पगार कसा केला गेला, हे नियमांत बसते का. हे नियम लागू होत असताना कायदेशीर पदोन्नती देत असताना जर कोणी कोर्टात गेलेतर त्याचे ताशेरे आपल्यावर ओढले जाणार याची सारवासारव करावी लागणार आहे. याची उकल करायचा आम्ही प्रयत्न केला. तुम्ही, प्रशासनाने याच्याबाबतीत स्पष्ट मत इथे मांडणे, याच्यातील गैरसमज न होण्यासाठी गरजेचे आहे. म्हणून हा विषय पुन्हा एकदा प्रशासनाकडे तपासण्यासाठी पाठवावा. तुमचे स्पष्ट मत ऐकल्यानंतर हा निर्णय घ्यावा असा आमचा निर्णय झाला आहे. ब-याचशा चर्चेतून अनधिकृत बांधकाम केले असेल, एफआयआर दाखल केला असेल, पात्रतेत बसत नसेल, या सगळ्या गोष्टींची चर्चा केलीतर आपण हा विषय सखोल घ्या. या विषयाचे गांभिर्य तसे आहे. डॉ.रॉय काय किंवा डॉ.साळवे काय एका व्यक्तीने हे शहर बंद पडणार नाही. उद्या कदाचित तुम्ही आम्ही सभागृहात नसू, पण हे विचित्र पद्धतीचे वातावरण

झाले आहे ते शंभर टक्के आयुक्त आपण व्यवस्थित करु शकता असे माझे स्पष्ट मत आहे. म्हणून याबाबतीत योग्य निर्णय घ्या. पुन्हा एकदा अभ्यास करुन निर्णय घ्यावा असे माझे मत आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.साळवे व डॉ.रॉय यांच्या भांडणात आमचे भरडणे हे ठरले आहे. कोणाची बाजु घेतलीतर कोणावर तरी अन्याय होतो. एकतर प्रमोशन देताना सेवाज्येष्ठता लावतो का. ही सेवाज्येष्ठता जर आपण मानली, जर एखाद्या पदासाठी कोर्स केला असेल, अशी अट असेल तर तो कोर्स करताना कमिश्नर यांना अधिकार आहेत का. डॉ. रॉय यांनी डीपीएच कोर्स केलेला आहे. कमिश्नर यांनी परवानगी दिलेली आहे. सगळ्यांत महत्वाचे म्हणजे मेडीकल कौन्सिल यांनी त्यांना ही डिग्री दिलेली आहे. डॉ.रॉय दोषी असतील तर मेडीकल कौन्सिल सुद्धा दोषी आहे. डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज सुद्धा तेवढेच दोषी आहे. ज्यावेळी त्यांनी डीपीएच केले त्यावेळी आशिष शर्मा आयुक्त होते. त्यांच्याकडून अशी चूक होईल असे मला वाटत नाही. एका वेळेला एक व्यक्ती कोर्स करतो व नोकरी पण करतो असे करु शकतो का. कमिश्नर यांनी परवानगी दिली असेल तर कॉलेज एखादी सूट देऊ शकते का. हा निश्चितपणे मेडीकल कौन्सिल यांचा विषय आहे. आपला नाही. त्यांना प्रमाणपत्र देताना, डिप्लोमाची पदवी देताना मेडीकल कौन्सिल यांचे सुद्धा मत लक्षात घेणे फार गरजेचे आहे. इथे आत्ता टेकाळे साहेबांनी सांगितले, आयोगाचा निकाल माझ्या हातात आहे. निकाल शंभर टक्के डॉ.साळवे यांच्या बाजूने दिलेला आहे. ज्या-ज्या वेळेला महापालिकेला राष्ट्रीय जाती आयोगाने प्रश्न विचारले, त्यावेळी त्यांच्या प्रश्नांच्या उत्तरांची पूर्तता केली का. त्यानंतर काय आहे. यात स्पष्ट सांगितले आहे, आपण त्यांच्यावर अन्याय केला आहे. कास्टमध्ये आहेत. डीपीएच केलं आहे तरीही सेवाज्येष्ठतेत डॉ.रॉय पहिले आहेत. पदोन्नती देताना सेवाज्येष्ठता धरतो. हे सांगितले का. त्यानंतर त्यांचे काय उत्तर आले ते सांगणे सुद्धा गरजेचे आहे. कालपासून सगळी कागदपत्रे आमच्याकडे फिरत आहेत. आमच्याकडे वशिला लावायचे प्रयत्न होत आहेत. आम्ही कोणाच्या बाजुने बोलायचे आम्हाला नेमके कळत नाही. डॉक्टरी पेशाचे आम्हाला ज्ञान पण नाही. परंतू मेडीकल कौन्सिल यांनी याठिकाणी डॉ.रॉय यांना डिप्लोमा दिला असेलतर तो चुकीच्या पद्धतीने दिला असेल तर त्यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहीजे मी मागणी करते. डॉ.डी.वाय.पाटील कॉलेजवर सुद्धा कारवाई झाली पाहीज. तसे नसेलतर मला वाटते, आपण पुन्हा एकदा अनुसूचित जाती आयोगाकडे आपले म्हणणे मांडावे. आणि जो काही योग्य निर्णय असेल त्याची अंमलबजावणी आपण करावी.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, याठिकाणी विविध प्रकारचे प्रश्न विचारण्यात आहे. वास्तविक पाहता, मा.प्रशांत शितोळे यांच्या मताशी मी सुद्धा सहमत आहे. खरेतर अधिका-यांच्या पदोन्नतीसंदर्भात सभागृहात असे वातावरण होणे चुकीचे आहे. यासाठी संबंधित अधिकारी सुद्धा जबाबदार आहे. डॉ.रॉय यांनी एकाला काहीतरी कटींग द्यायची. दुस-याला काहीतरी कटींग द्यायची का अशा पद्धतीने हा विषय चिघळला जातो. मा.दत्ता साने यांनी सांगितले, नगरसेवकांना एक कायदा व अधिका-यांना एक कायदा. वास्तविक पाहता महाराष्ट्र मनपा अधिनियमाच्या कलम १०५, †क्ट मध्ये दिले आहे, सन्मा. नगरसेवकांवर कारवाई करायची ती अधिका-याना लागू नाही. आपण भांडले पाहीजे, ठराव केला पाहीजे, मग

तो लागू केला पाहीजे तेव्हा ही कारवाई अधिका-यांना सुद्धा लागू पडेल. डीपीएच हा एक वर्षाचा कोर्स आहे, ५ वर्षांचा नाही. एक वर्षांत कोर्स करत असताना मागे सुद्धा यावर आक्षेप झाला नव्हता. सर्वीस करत असताना कसे केले अशा प्रकारे कोर्स करणे योग्य आहे का, यावरुन त्यावेळी परदेशी साहेबांसमोर चर्चा झाली होती. सभागृह हे विसरले असेलतर मी आठवण करुन देऊ इच्छितो, मा.आर.एस. कुमार यांना माहित असेल. डॉ.अय्यर यांनी महापालिकेत सर्वीस करत असताना त्यांनी डीपीएच केले होते. ते त्यावेळी भोसरी रुग्णालयात नाईट शिफ्ट करत होते. तेव्हा ते थर्ड शिफ्ट करायचे, नाईट शिफ्ट करायचे, मग ते डीपीएच कसे उत्तीर्ण झाले, कॉपी करुन पास झाले का, असा पण विषय त्यावेळी झाला होता. ते डीपीएच उत्तीर्ण झाले. नंतर त्यांना ॲडीशनल एमओएच पद मंजूर करुन आणले. त्यांनी त्या पदावर समाधान व्यक्त केले. डॉ.नागकुमार कुणचगी यांना एमओएच पदावर राज्य शासनाने मंजूरी दिली. शासनाचे मत सांगत असताना, आत्ता टेकाळे साहेबांनी स्पष्टपणे सांगितले आहे, प्रशासनाचे मत आहे डॉ.रॉय मोस्ट सिनिअर आहेत. इलिजिबल आहेत. ते क्वालिफाय आहेत. प्रशासनाने धोरण स्पष्ट केले, डॉ.रॉय हे इलिजिबल आहेत. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाला अंतिम रुप देण्याचे काम शासनाचे आहे. या सभागृहात आम्ही काय करतो यापेक्षा शासनाला अधिकार जास्त आहेत. शासनाची ताकद जास्त आहे. शासन आयोगाचे सुद्धा म्हणणे टाळू शकत नाही. तिथे आयोगाने मांडले असेल ते पण योग्य आहे. तिथे शासन निर्णय घेईल. हा वादविवाद करण्यापेक्षा आपण निर्णय घेऊन मोकळे झालेले बरे. हा विषय मंजूर करावा व भांडण मिटवून टाकावे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आजपर्यंत गेले ७/८ महिने मला डॉ.नागकुमार कुणचगी, डॉ.अय्यरच डोळ्यासमोर दिसतात. आमच्याकडे निवडणुकीत ज्या सगळ्या गोष्टी चालतात, ही परिस्थिती अधिका-यांबाबतीत सुद्धा आहे. खरेतर पुढील अधिका-यांच्या असलेल्या विषयातसुद्धा आम्ही नेहमी म्हणत असतो असे विषय आमच्यासमोर आणायचे, ही फार अवघड गोष्ट आहे. सभागृहात अधिका-यांचे एक वर्ष मुदतवाढीचे विषय आणतो. हे काही अधिका-यांचे पटते, काही अधिका-यांचे पटत नाही. मग असे विषय आमच्यासमोर आल्यानंतर काही सदस्यांना वाटते या अधिका-यांना मुदतवाढ द्यायची नाही. हे अधिकारी परत दुसरीकडे जात असतात. यांची तिसरीकडे कामे असतात. मग कुणी कोणाशी वाईटपणा घ्यायचा हा प्रश्न असतो. आयुक्त साहेब, आपण काहीतरी नियम करा, शासनाकडे आलेले लोक किती दिवस ठेवायचे. त्यांनी किती दिवस काम करायचे. आमच्यासारख्यांची अशी परिस्थिती असते की, गेले 25 वर्षे काम करत असताना आमच्या मनाला माहित असते. कोणताही अधिकारी असू दे, त्यांच्याकडून काम करुन घेण्याची पद्धत, ज्याची त्याची स्टाईल असते. आम्ही कोणताही अधिकारी असला तरी काम करुन घेत असतो. परंतू असे विषय आले की आम्हाला किती अवघड परिस्थिती होते. आयुक्त साहेब, जे दोन चार प्रश्न मघाशी मा.चंद्रकांता सोनकांबळे ताईंनी सांगितले आहेत, त्यांचा खुलासा व्हायला पाहीजे. तुम्ही आम्हाला सांगा. हा विषय खरेतर आमच्याकडे आणलाच नाही पाहीजे. आम्ही म्हणतो, मुदतवाढीसाठी एक काहीतरी ठरवा, की दोन वर्षे झाली, तीन वर्षे झाली की या अधिका-यांना परत शासनाकडे पाठवावे. दरवर्षी मुदतवाढीचा विषय आली की तो विधी समितीत मंजूरीसाठी जाणार. विधी समितीतले आमचे नगरसेवक म्हणणार, आम्ही एखादे काम सांगितले तर ते

आमचे काम करतात का. आम्हाला फोन करावा लागतो. हे खरेतर फार अवघड परिस्थितीतले दुखणे आहे. परत एकदा टेकाळे साहेबांनी सांगावे, हा विषय बरोबर आहे. विषय बरोबर असेलतर हा विषय मंजूर करायला काहीच हरकत नाही. कारण कुठेतरी हे भांडण संपले पाहीजे. त्यांच्यासाठी आम्ही आमच्या आमच्यात का भांडायेच. आमचे नगरसेवकांनी म्हणायचे. यांनी असे केले, त्यांनी असे केले. जरी अनधिकृत बांधकामाचा विषय असू दे, अर्हतेचा विषय असू दे, प्रशासनाने एक मिनिटांत खुलासा करावा. टेकाळे साहेब म्हणत असतील, त्यांचे म्हणणे यात शासनाकडे चौकशी केल्यानंतर हा विषय बरोबर आहे. तर मला वाटते, हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मंजूर करायचा असेल तर आमचा या विषयाला विरोध नाही. पण पुढे होणा-या परिणामांना जे काही होईल ते परिणाम या सभागृहाला भोगावे लागतील. डीपीएचचा विषय रितसर असेलतर टेकाळे साहेबांनी तसे सांगावे. विषय मंजूर करायचा असेलतर आम्ही कोर्टात जाणार आहोत हे सभागृहाला सांगतो.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कोर्टात जायचा अधिकार सर्वांचा आहे. ज्यांना कोर्टात जायचे आहे, त्यांनी कोर्टात जावे. खरेतर त्यांना न्याय मिळाला पाहीजे. आपण हा विषय मंजूर करावा अशी विनंती आहे.

**मा.महापौर** – मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – १

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब विषय क्रमांक ११वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावासोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे त्यास तसेच मनपा मिळकत वाटप नियमावली २०१३ मधील भाग-५ मध्ये मिळकत विनियोगाचा प्राधान्यक्रम ठरविणेत आला आहे. तथापि सदर नमुद १ ते ७ प्राधान्य वर्गासाठी जाहिर निविदेद्वारे काही वर्गासाठी निविदा प्राप्त न झालेस किंवा कमी संख्येत प्राप्त झाल्यास इतर आरक्षीत वर्गासाठी त्या मिळकती वाटप करणेचे अधिकार मा.महापालिका सभेला असतील. यामध्ये ज्या आरक्षीत

वर्गासाठी शासन निर्णय/आदेश असतील त्याला बाधा न येता मा.महापालिका सभेस निर्णय घेता येतील यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, यात ब-याचशा मिळकतींमध्ये नंबरींग झालेल्या मिळकती किती आहेत, न झालेल्या किती आहेत? मी साहेबांशी चर्चा केली होती. याचे डिटेल्स आम्हाला मिळाले पाहीजेत. पिंपरी चिंचवडमध्ये कशा-कशा गोष्टी त्यांच्याकडे आहेत. लिहिलेल्या असतील, न लिहिलेल्या असतील. प्रॉपर्टी किती आहेत याचा खुलासा प्रशासनाने पहिल्यांदा करावा. नंतर आम्हाला या विषयावर चर्चा करायची आहे.

**मा.प्रशांत खांडकेकर (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सदस्य, हा विषय आपल्यासमोर आलेला आहे. हा विषय पूर्वी महासभेपुढे आला होता. हा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अंतर्गत मिळकत वाटप नियमावली तयार करणे हा आहे. याचे कारण पीएमसी विरुद्ध पीआयएल असे रिट पिटीशन फाईल होते. त्यातील निर्णयाच्या अनुषंगाने पीएसीने नियमावली तयार केली होती. कायदा विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार आपण नियमावली तयार करतोय. प्रोसिजर लेआऊट करणे हा भाग आहे. नियम प्रक्रिया विहीत करणे आवश्यक आहे. आपण ज्या गोष्टी करत आहोत, त्या समाविष्ट करतोय. निविदा प्रक्रिया यात विहीत करतोय. त्यात भाडे मूल्य निर्वाहण कसे करावे, कसे योग्य वितरण होईल, आरक्षण कसे राहील. ८९ कलमामध्ये मिळकत हस्तांतरीत करायची झालीतरी त्यात मिळकत धारकाला, भाडेपट्टी धारकाला लिज ट्रान्सफर करायची असेल तर त्यावेळी दुस-या मिळकत धारकाला ती प्रोव्हिजन नव्हती. त्यामुळे ईलिगल ट्रान्सफर होत होती. ही प्रोव्हिजन नसल्यामुळे यात ती अंतर्भूत करण्यात आले आहे. महापालिकेचे देखील आर्थिक नुकसान होणार नाही. यामुळे आपल्याला ट्रान्सफर लीज मिळतील. यात अशी प्रोव्हीजन केलेली आहे. या यातील ठळक बाबी आहेत.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्याकडे ज्या मिळकती आहेत. मिळकत वाटपानंतर महापालिकेच्या मालकीची इमारती म्हणजे आपल्या त्या प्रॉपर्टी आहेत. यात इमारती, हॉस असेल, क्रिडांगण असेल, स्विमिंग टँक असेल, जे काही आहे ते सगळे. ज्या इमारती आत्ता आहेत त्या सगळ्या इमारती. स्थापत्य विभागाकडून ज्या इमारती बांधल्या जातात. त्या इमारती भूमि आणि जिंदगी विभागाकडे हस्तांतरीत केल्या जात असाव्यात किंवा करायला पाहीजेत. भूमि आणि जिंदगी विभागाकडे अशा हस्तांतरीत केलेल्या म्हणजेच महापालिका मालक असलेल्या मालमत्तांची यादी आहे का? आपण काही लिस्ट केलेली आहे का? अशा आपल्या किती मालमत्ता आहेत? कोणती इमारत कोणाला दिलेली आहे? हेच तिथे आहेत का पोटभाडेकरु ठेवले आहेत. काही कळत नाही. मला ही माहिती इथे पाहीजे. आपल्याकडे ज्या मिळकती आहेत, त्या भाड्याच्या जागेत बसलो आहोत का? मालकीच्या ज्या इमारती आहेत, त्यात आपले सभागृह आहे, हे आम्हाला माहिती असू दे. आपल्याला आपल्या मिळकतींचीच माहीती नाही. मग त्याची नियमावली का बनवतोय, याची यादी द्या. यात कोणते

दवाखाने आहेत का? कोणत्या भाड्याने घेतलेल्या इमारती आहेत, त्यांचे भाडे येते का नाही, याबाबतीन निदान भाड्यासाठी तरी आपण फार स्ट्रीक्ट व्हायला पाहीजे. आपल्या इमारतींचे भाडे दुसराच घेतोय. रुबाब तिसराच करतोय. ताबडतोब या विभागाला ज्या काही इमारती, प्लॉटस् आहेत, ते आपले आहेत का? आपल्या मालकीचे आहेत का? आपला बोर्ड आहे का हे पहायची वेळ आलेली आहे. आपण हॉल बांधतो, त्याचे भाडे सुद्धा मोठ्या प्रमाणावर येणार आहे. या सर्व बाबींची यादी द्या अशी तुम्हाला विनंती करतो. विषय मंजूर करायला माझा विरोध नाही. पण ही माहिती आपल्याला त्वरित मिळावी.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला आपल्याला विनंती करायची आहे की, आत्ता भूमि आणि जिंदगी विभागामार्फत जी काही माहिती दिली. मी पठाणताईंच्या मताशी सहमत आहे. ज्या प्रॉपर्टी विभागाला वर्ग केलेल्या आहेत, त्या किती आहेत? भूमि आणि जिंदगी विभागाने क्रिडा विभागाला किती प्रॉपर्टी दिल्या, इतर विभागांना किती प्रॉपर्टी दिल्या. मला या सभागृहात येऊन २ वर्षे झाली. अजून आम्हाला त्यातला काहीही काडीमात्र तपशील आमच्याकडे नाही. असे विषय सभागृहात आमच्याकडे आले नाहीत. हा काय प्रचार घेऊन काळाबाजार चालला आहे का अशी शंका निर्माण होते म्हणून बोलायची वेळ आली आहे. उदाहरण सांगतो. ज्या ठिकाणी मा.समिर मासुळकर व मा.मंदा ठाकरे निवडून आलेत, त्याठिकाणी एक क्रिडांगण आहे. वॉचमनसाठी असलेली खोली भाड्याने दिलेली आहे. ज्या वॉचमनची किंवा रखवालदाराची नियुक्ती केलेली आहे, त्याठिकाणी तो रहात नाही. त्या क्रिडांगणाची देखभाल करणारा वॉचमन तिथे राहतो का याची तुम्ही आत्ता त्याठिकाणी चौकशी केलीतर सत्य बाहेर येईल. प्रभागात सर्वीस करणार वॉचमन तिथे राहतो. दुसरे म्हणजे तो तिथे रहात असेल तर आमच्या प्रॉपर्टीचे काय? इथे चुकीची माहिती दिली आहे. मी तिथे जाऊन पाहणी केलेली आहे. काही मिळकती अशा आहेत, ज्या क्रिडा विभागात नाहीत व भूमि आणि जिंदगी विभागात सुद्धा नाहीत. अधिकृत का अनधिकृत याचा तपशील आलातर ७५% मिळकती अनधिकृत आहेत. आपण डोळ्याने पाहीले आहे. माझ्या प्रभागात जी व्यायामशाळा आहे ती अनधिकृत आहे हे मी आत्ता सांगू शकतो. भूमि आणि जिंदगी विभागाने त्याचा उल्लेख करावा. वैदूवस्ती प्र,क्र.५६ मध्ये व्यायामशाळा आहे, ती रितसर भूमी आणि जिंदगी विभागाकडून क्रिडा विभागाकडे गेली का? उलट क्रिडा विभागाकडील व्यायामशाळा ठेकेदारी पद्धतीने गेलेल्या आहेत. त्याठिकाणी दुस-याकडून पैसे घेऊन बालवाडीचे क्लासेस होतात. प्रायव्हेट बालवाडी घेतली जाते. त्यांच्याकडून महिन्यावर भाडे घेतले जाते अशा प्रकारची शोकांतिका आहे. असे असेल तर आम्हाला या विषयाच्या अनुषंगाने आयुक्त साहेब व महापौर साहेबांना विनंती करतो की, प्रथमतः या सगळ्याची माहिती सर्व सभासदांना द्या व हा विषय माहिती दिल्यानंतर पुढील मा.महापालिका सभेत आणा. त्याशिवाय याचा काही उपयोग होणार नाही हे नमूद करतो.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय महापालिकेच्या मिळकतीसंबंधी आलेला आहे. लघु उद्योजकांचे रहिवास क्षेत्रात पुनर्वसन करण्यासाठी एमआयडीसीने दिलेल्या प्लॉटवरील पुनर्वसन प्रकल्पावर काम चालू आहे. माझ्या भागात ८० टक्के भाग पूर्ण झाले आहे. ३०८ गाळे बांधतोय. या गाळे ताब्यात येण्यासाठी सेलडिडने द्यायचे आहे का डीडने द्यायचे

आहे. रु.१२००/- चौरस फूटाचा रेट रु.४२००-४८०० पर्यंत रेट गेलातरी निर्णय होत नाही. यावर आजपर्यंत कोट्यावधी रुपये खर्च केले. विषयांच्या अनुषंगाने याबाबतीत त्वरित निर्णय घ्यावा म्हणजे महापालिकेकडील पैसे मोकळे होतील.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा ठराव मिळकतीसंदर्भात आहे. आपल्या शेकडो मिळकती भाड्याने दिलेल्या आहेत. अशा पद्धतीने भाड्याने दिलेल्या मिळकतींचे भाडे पाच/पाच वर्षे आपल्याकडे वसूल होत नाही. हा विषय मी वेळोवेळी आयुक्तांसमोर आणला आहे. कोणीही यावर ॲक्शन घेत नाही. महापालिकेच्या मिळकती भाड्याने देऊन सुद्धा १०/१५ वर्षे भाडे येत नाही. पार्टी सोडून जाते पण त्यावर लिगल ॲक्शन घेत नाहीत. एखादी प्रायव्हेट प्रॉपर्टी भाड्याने दिली आणि त्याचे भाडे दिले नाहीतर ती प्रॉपर्टी जप्त केली जाते. काही पुढारी १० ते १५ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यकर्त्यांच्या नावाने भाड्याने घेतात. भाडे देत नाहीत. मिळकत सोडून जातात. अधिकारी गप्प बसतो. अप्पूघर व वॉटर पार्क याची २ वर्षांची थकबाकी रु.५२ लाख होती. जर एखाद्या मिळकतीचे भाडे ३ महिन्यांमध्ये आले नाहीतर चवथ्या महिन्यात ती मिळकत खाली करायला का सांगत नाहीत? कशाला १५/२० महिने थांबलात? नंतर ती पार्टी कोर्टात गेली. आर्बीट्रेटर हे २ वर्षे झाली तरी निर्णय देत नाहीत. आता ५२ लाखाची रक्कम एक कोटी झाली आहे. असेच प्रत्येक प्रभागात झाले आहे. ५ कोटी ही रक्कम काय कमी आहे का? भाडे वसूली करत नाहीत मग अधिका-यावर काय ॲक्शन घेतली? ज्या अधिका-याकडे हे काम होते, त्याने ३ महिन्यांत ती मिळकत खाली करायला पाहीजे होती. ५३ लाख होईपर्यंत का गप्प बसले अकाऊंटॅबिलीटी नावाची काही चीज आहे का नाही? चुकीचा कारभार चालला आहे. तुमची स्वतःची मिळकत असेल तर तुम्ही असे सोडणार आहात का? किती भाडे थकबाकी आहे तुम्ही विचारा. करोडो रुपये आहे. मला कधी-कधी शंका येते. अधिकारी सुद्धा यात इनव्हॉल्वड आहेत का? या अधिका-यावर कारवाई करा. या वॉटर पार्कमध्ये ५२ लाख थकबाकी असेल तर एवढी थकबाकी होईपर्यंत का गप्प बसलात? या अधिका-यावर काय कारवाई होणार? स्पेशल एन्क्वायरी करायला लावा. ही भाडे वसुली का होत नाही. लिगलला पत्र पाठवा. Legal Dept. should take action, go to Court. & attach our property and collect money.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेच्या मिळकतींबद्दल माहिती पाहीजे होती. ऑलरेडी मिटींगमध्ये साहेबांना डिटेल्स विचारले होते. चारी प्रभागांतील माहिती आली नव्हती. आम्ही कल्पना दिली होती, सगळ्या डिटेल्स घ्या. काल सगळ्यांनी टी.व्ही. बघितला असेल. झी २४ तासवर महापालिकेच्या मिळकतींसंदर्भात किती थकबाकी आहे याचे क्लिपींग दाखवत होते. आपली कुठे-कुठे करोडो रुपयांची थकबाकी आहे. आज जकात बंद झाली असली तरी आपल्याला उत्पन्नाचे सोर्सेस चालू करावे लागतील. त्यावरचा करोडो रुपये व त्यावरिल व्याज. आज कोणी टॅक्स भरला नाहीतर किती टक्के टॅक्स महापालिकेकडून वसूल करतो. या लोकांनी भाडे दिले नाहीतर किती टक्के रेट लावून भाडे वसूल केले गेले पाहीजे. किती सवलती दिल्या गेल्या पाहीजेत. पीएमपीएल डबघाईला आलीय. दरवर्षी ती तोट्यातच असते. जकात बंद झाली. एलबीटीचा सावळा गोंधळ चालू आहे. सभागृहात माझी सगळी सहकारी मंडळी जागरुक आहोत. आम्ही नुसते सभागृहात बोलून उपयोग नाही. प्रशासनातील

जे जे विभाग आहेत. याबाबतीत अधिका-यांनी सुद्धा किती करोडो रुपये येणे बाकी आहेत. आज किती प्रॉपर्टीज् आहेत. काही काही प्रॉपर्टीज अशा आहेत, कर्मचारी भाडे देतात. तेथे त्यांना घरात दरवाजा नाही, प्लॅस्टर पडले आहे. परंतू त्यांना कामाला जावे लागते म्हणून ते तिथे राहतात. कर्मचा-यांच्या पगारातून रु.३,५००/- भाडे डायरेक्ट कटींग होते. ट्रिटमेंट प्लाण्टमधील त्या घरांची अवस्था पहा. आजूबाजुला कचरा कुंडीतला कचरा पडलेला असतो. आपले कर्मचारी या परिस्थितीत तिथे राहतात. इतकी दुरावस्था आहे. साध्या झोपडपट्यांमध्ये सुद्धा लोक त्यांचे घर देखणे ठेवतात. पण मनपाच्या प्रॉपर्टीच्या आजूबाजुचा परिसर बघितला तर अतिशय गलिच्छ परिसरात राहून हे लोक रु.३,५००/- भाडे देतात. आपल्या प्रॉपर्टी भाड्याने घेतात, ते वेळेवर भाडे भरत नाहीत. प्रॉपर्टी भाड्याने घेणारे काही महाभाग एक दोन माणसांना भाड्याने देतात. अशा कितीतरी प्रॉपर्टी आहेत त्याच्या साईड मार्जिनमध्ये वेगवेगळ्या प्रकारची दुकाने काढली आहेत. तुम्ही या प्रॉपर्टीज् चेक करा. आम्हाला कळते, मी सांगते कुठे दुकाने चालू केलेली आहेत. माझे एक सहकारी आहेत. अजंठा नगरमध्ये तुमच्या ज्या प्रॉपर्टीज् आहेत, तिथे दुकानदारांना दुकाने देऊ शकत नाही. लोकांनी अनधिकृतपणे घरात दुकाने चालू केलेली आहेत. एकिकडे टप-यांसारखे बनवले आहे, ते असेच पडून आहे. म्हणजे लोकांवर अन्याय करतो. खूप ठिकाणी तयार केलेल्या भाजी मंडई अशाच पडून आहेत. अधिकारी नवीन आहेत. त्यांची इथे काम करायची इच्छा, जिद्द आहे. त्यांच्याकडे डिटेल्समध्ये अहवाल दिला आहे. त्यानुसार इतक्या प्रॉपर्टीज् आहेत. रस्त्यावर भाजी मंडई भरते व आपल्या भाजी मंडई तशाच पडून आहेत. दिघी पासून सांगवी किवळे सगळी ठिकाणे घ्या. हरकत नाही, वेळ घ्या, दोन अडीच महिन्यांनी सांगा. एवढ्या मिळकती आहेत. एवढी अनधिकृत बांधकामे आहेत. एवढी वसूली होणे बाकी आहे. ज्या मिळकती भाड्याने घेतल्या आहेत, त्यांच्यावर कारवाई केली गेली पाहीजे. त्यासाठी हा विषय तहकूब ठेवावा. जोपर्यंत डिटेल्समध्ये माहिती आपल्याकडे येत नाही, तोपर्यंत हे लक्षात ठेवावे की, आम्ही वेळ दिलेला आहे. कोणावरही अन्याय होता कामा नये. सगळी माहिती आली पाहीजे. चांगल्या पद्धतीने पैसे घेत असालतर आपल्या कर्मचा-यांना तशी घरे मिळाली पाहीजेत. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५०४ विषय क्रमांक - ११
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नगररचना/१७/२७९/२०१३ दि.०८/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३५ दि.१२/११/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२५ दि.१८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामाच्या रक्कम रुपये २.५५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड मनपाचा जूना व नविन मंजूर विकास आराखडयातील सर्व आरक्षणे तसेच सर्व रस्ते सर्व नद्यांबाजूची निळी व लाल पुर रेषा सर्वेक्षण करणे व अनुषंगीक कामे करणेच्या कामास र.रु.४००००००००/- (अक्षरी र.रु.चार कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, याठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामाच्या रक्कम रुपये २.५५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड मनपाचा जूना व नविन मंजूर विकास आराखडयातील सर्व आरक्षणे तसेच सर्व रस्ते सर्व नद्यांबाजूची निळी व लाल पुर रेषा सर्वेक्षण करणे व अनुषंगीक कामे करणेच्या कामास र.रु.४००००००००/- (अक्षरी र.रु.चार कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेचा विषय असे म्हटले आहे. अडीच कोटींचा विषय डायरेक्ट चार कोटींवर कसा गेला याची माहिती पाहीजे आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, या विषयाचा संपूर्ण खुलासा करण्यात यावा.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य, सदरचा विषय हा डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये महापालिकेची जी रिझर्वेशन्स आहेत, ती जागेवर डिमार्केट करायची आहेत. काही डि.पी. रोडचे डिमार्केशन राहिलेले आहे. ते करायचे आहे. या शहरातून ज्या तीन नद्या जातात. या नद्यांची रुंदी मोजणे, तसेच पवना नदीचे २ काठ, मुळा नदीचा १ काठ, इंद्रायणी नदीचा १ काठ, या नद्यांच्या ब्ल्यू लाईन जागेवर डिमार्केट करायचे आहे. त्याचबरोबर एसीएम शहरातून जाते, ते पण डिमार्केट करायचे आहे. हा विषय मा.विधी

समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे आला आहे. मा.विधी समितीमध्ये रु.२ कोटी ५५ लाखांचा विषय ठेवला होता. मा.विधी समितीने या विषयात उपसूचना देऊन त्याद्वारे हा विषय मांडला आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, सदर ठराव तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५०५ विषय क्रमांक - १२
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नगररचना/१७/२७९/२०१३ दि.०८/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३५ दि.१२/११/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२५ दि.१८/०१/२०१४

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५०६ विषय क्रमांक - १३
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक १९६, दिनांक ०७/०२/२०१४

श्री.सतिश कुलकर्णी, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/०७/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५०७ विषय क्रमांक - १४
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३ दि.१६/०७/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक १९७, दिनांक ०७/०२/२०१४

श्री.ज्ञानेश्वर ढेरे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०९/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५०८ विषय क्रमांक - १५
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३ दि.०३/०८/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक १९८, दिनांक ०७/०२/२०१४

श्री.गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५०९ विषय क्रमांक - १६
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३ दि.२१/०६/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक १९९ दिनांक ०७/०२/२०१४

श्री.प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुख्यलेखापाल पदावरील नियुक्तीसंदर्भात मे.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन स्टॅम्प क्र. २३३१७/२०१२ पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन व पिं.चिं.मनपा या दाव्यामध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधीन राहून २३/०७/२०१३ पासून पुढे ०१ वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या पदाची आवश्यकता आहे का? परदेशी साहेब असताना त्यांनी नवीन पद निर्माण केले होते. कारण त्यांना खास नांदेड वरुन बोलवले होते.

**मा.राजीव जाधव (महापालिका आयुक्त)** - मुख्यलेखापाल हे पद आवश्यक आहे. मुख्य लेखापरिक्षक व मुख्य लेखापाल अशी दोन पदे असतात. मला व्यक्तीबद्दल काही बोलायचे नाही. हे पद आवश्यक आहे एवढेच सांगतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५१० विषय क्रमांक - १७
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५०/२०१३ दि.१३/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०० दिनांक ०७/०२/२०१४

जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर खाली नमुद केलेप्रमाणे -

| अ. क्र. | नांव | पदोन्नतीचे पदनाम | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | डॉ.पाटणेकर राजीव विष्णूपंत | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |
| २ | डॉ.पोटे संजय लक्ष्मण | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला (इ.मा.व) |
| ३ | डॉ.जॉन सुनिल | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |

अधिका-यांना पे बँड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये जेष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५११ विषय क्रमांक - १८
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५७/२०१३ दि.१७/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०१ दिनांक ०७/०२/२०१४

श्री.खांडकेकर प्रशांत शरद, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५१२ विषय क्रमांक - १९
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/६/कावि/१/२०१४ दि.२/०१/२०१४
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०४ दिनांक ०७/०२/२०१४

जैवविविधता कायद्यान्वये "जैवविविधता" समिती स्थापन करणेसाठी मनपाचे विद्यमान नगरसेवकांमधून ६ सदस्य व १ मनपा प्रशासकीय अधिकारी असे एकूण ७ सदस्यांची समिती स्थापन करावयाची आवश्यकता आहे. सदर ६ नगरसदस्यांपैकी २ जागा महिलांसाठी व २ जागा एस.सी./ एस.टी. साठी आरक्षित असून मनपाच्या कायम अस्थापनेवरील १ सदस्य नेमणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत पिं.चिं.म.न.पा. मध्ये वृक्ष प्राधिकरण समिती कार्यान्वित आहे व त्या समितीमध्ये मा.मुख्य उद्यान अधिक्षक हे सदस्य आहेत. जैवविविधता समितीमध्ये मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांची महात्वाची भूमिका असल्याने म.न.पा.तर्फे मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांचा समितीमध्ये समावेश करणे गरजेचे आहे. ही ७ सदस्यांची समिती स्थापन झाल्यानंतर शहरातील विविध विषयांतील ७ तज्ञ सदस्यांची (उदा.वनस्पती तज्ञ, पक्षी तज्ञ, प्राणी तज्ञ, जलचर तज्ञ, शेती तज्ञ, माती तज्ञ, जैवविविधता तज्ञ इ.) निवड करणे आवश्यक आहे. तदनंतर एकूण १४ सदस्यांची "जैवविविधता" व्यवस्थापन समिती स्थापन करणे शक्य होईल. यामध्ये शहरातील आमदार व खासदार विशेष निमंत्रित असतील. ही समिती पाच वर्षे कालावधीकरीता असते व निवडणूकीनंतर नविन ६ नगरसदस्यांची व १ मनपाचा अधिकारी (मुख्य उद्यान अधिक्षक) यांची समिती स्थापन करण्याची तरतूद असल्याने म.न.पा. क्षेत्रासाठी विद्यमान सदस्यांपैकी ६ सदस्य व १ मनपा प्रशासकीय अधिकारी (मुख्य उद्यान अधिक्षक यांची) जैवविविधता समिती व त्यामध्ये शहरातील विविध विषयांतील ७ तज्ञ सदस्यांची निमंत्रीत तसेच शहरातील ३ आमदार व २ खासदारांची विशेष निमंत्रीत म्हणून निवड करुन पिंपरी चिंचवड शहरासाठी जैवविविधता व्यवस्थापन समिती गठीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २०वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २०
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/०७/कावि/१४/२०१४ दि.०८/०१/२०१४
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०७ दिनांक १०/०२/२०१४

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह परवाना फी दर निश्चितीबाबत व महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दरातील तफावत विचारात घेऊन परवाना फी मध्ये प्रस्तावासोबतचे परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, सदर ठराव दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणे ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५१३ विषय क्रमांक - २०
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/०७/कावि/१४/२०१४ दि.०८/०१/२०१४
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०७ दिनांक १०/०२/२०१४

विषय क्रमांक २० दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २१

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/भुगयो/१०३/२०१३
दि.३१/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०८ दिनांक १०/०२/२०१४

मनपाचे भुगयो विभागाचे भाटनगर मै.शु.केंद्र येथे नव्याने होणा-या पंपहाऊसमध्ये पंपींग मशिनरी बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामीचे प्रस्तुत एकूण र.रु.८२,३५,०००/- (अक्षरी र.रु.ब्याऐंशी लाख पस्तीस हजार फक्त) चे पुर्वगणन पत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.विनया तापकीर** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी स.नं.७८ येथे उभारावयाच्या संत नामदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या भेटीवर आधारीत समुहशिल्पासाठी शिल्पांच्या संख्येतील वाढ, म्युरल्स बसविणे, स्वागत कमान बांधणे, रिटेनिंग वॉल बांधणे, सिमाभिंतीची उंची वाढविणे, जागेचे समतलीकरण करणे इ. कामासाठी प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रुपये २० कोटी फक्त या रक्कमेस सुधारीत मान्यता देणेत यावी.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५१४ विषय क्रमांक - २१

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/भुगयो/१०३/२०१३
दि.३१/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०८ दिनांक १०/०२/२०१४

मनपाचे भुगयो विभागाचे भाटनगर मै.शु.केंद्र येथे नव्याने होणा-या पंपहाऊसमध्ये पंपींग मशिनरी बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामीचे प्रस्तुत एकूण र.रु.८२३५०००/- (अक्षरी र.रु.ब्याऐंशी लाख पस्तीस हजार फक्त) चे पुर्वगणन पत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी स.नं.७८ येथे उभारावयाच्या संत नामदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या

भेटीवर आधारीत समुहशिल्पासाठी शिल्पांच्या संख्येतील वाढ, म्युरल्स बसविणे, स्वागत कमान बांधणे, रिटेनिंग वॉल बांधणे, सिमाभिंतीची उंची वाढविणे, जागेचे समतलीकरण करणे इ. कामासाठी प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रुपये २० कोटी फक्त या रक्कमेस सुधारीत मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २२

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.आप/७/कावि/३१/२०१४ दि.१५/०१/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०९ दिनांक १०/०२/२०१४

औद्योगिक क्षेत्रात असलेली मंदी विचारात घेता तसेच सन २०१३-१४ चे उद्योगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-१४ चे दर कायम ठेवण्यात यावेत असे सुचविणेत आले आहे. त्यानुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता प्रस्तावासोबतचे उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र - अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र - ब, व साठा परवाना फी साठी प्रपत्र - क सादर केलेले असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.वनिता थोरात** - मा.महापौर साहेब, सदर ठराव दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.विनया तापकीर** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५१५ विषय क्रमांक - २२

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.आप/७/कावि/३१/२०१४ दि.१५/०१/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २०९ दिनांक १०/०२/२०१४

विषय क्रमांक २२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५१६ विषय क्रमांक - २३

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/ड/मु/१/३६८/२०१४ दि.०३/०२/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २११ दिनांक १०/०२/२०१४

मनपाचे ड स्थापत्य मुख्यालयाचे थेरगांव गावठाण ते पदमजी पेपर मिल २४ मी. डी.पी.रस्त्याचे उर्वरित कामे करणेकामी येणाऱ्या र.रु.१,८७,५०,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी सत्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २४

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.भाऊसाहेब भोईर मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २१४ दिनांक १०/०२/२०१४

श्री.अनिल एम.मेंगशेट्टी हे महाराष्ट्र शासनाच्या भूकंप पुनर्वसन प्रकल्पामध्ये दि.४ डिसेंबर १९९५ रोजी रुजू झाले. भूकंप पुनर्वसन प्रकल्पामध्ये त्यांनी ४ डिसें. १९९५ ते ३० एप्रिल १९९८ या दरम्यान काम केले असून त्यांना उत्कृष्ठ अभियंता म्हणून विशेष गुणवत्ता प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने गौरविले आहे. प्रकल्प संपल्यानंतर दि.१८ एप्रिल २००२ मध्ये शासनाकडून पिं.चिं.मनपामध्ये कनिष्ठ अभियंता पदावर रुजू झाले. सन १९९५ ते

२००२ म्हणजे एकूण ७ वर्षे सेवा जेष्टता कालावधीचे त्यांचे नुकसान झाले आहे. तसेच ७ वर्षाचे वेतनवाढीचे (Increment) नुकसान झाल्यामुळे त्यांचे सेवाजेष्टता व आर्थिक असे दोन प्रकारे नुकसान झाले आहे. श्री.अनिल मेंगशेट्टी यांचे पिं.चिं.मनपातील कामकाज चांगल्या प्रकारचे असल्यामुळे त्यांची सेवा जेष्टता न डावलता त्यांना ४ डिसेंबर १९९५ ची मानिव दिनांक देऊन त्यांना आर्थिक लाभ देणेत यावा. तसेच सेवा निवृत्तीसाठी ४ डिसेंबर १९९५ ही तारीख ग्राहय धरावी अशी शिफारस महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.वनिता थोरात** - मा.महापौर साहेब,सदर ठराव तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.विनया तापकीर** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५१७ | विषय क्रमांक - २४

दिनांक - ०५/७/२०१४ | विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.भाऊसाहेब भोईर मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २१४ दिनांक १०/०२/२०१४

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ | प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५१८ | विषय क्रमांक - २५

दिनांक - ०५/७/२०१४ | विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रशांत शितोळे मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २१६ दिनांक १०/०२/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या विविध तक्रारींचे निवारण होण्यासाठी "सारथी" योजना प्रभावीपणे राबविणेत येत आहे. महानगरपालिकेतील सर्व प्रभाग, वॉर्डशी संबंधित तक्रारी येत असतात व सर्व विभागांशी संबंधीत असतात. या योजनेची माहिती तक्रार किंवा सुचना ज्या प्रभागाशी/वॉर्डशी संबंधित आहे त्या नगरसदस्यास विश्वस्त म्हणून मनपा अधिका-यांप्रमाणेच मोबाईलवर माहिती मिळावी. त्यामध्ये Text SMS व Voice SMS

सह माहिती व्हावी. जेणेकरुन संबंधित वॉर्ड/प्रभागाचे नगरसदस्य देखील अशा सर्व तक्रारींमध्ये लक्ष घालून तक्रार निवारण करु शकतील. यासाठी मान्यता देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २६

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.वनिता थोरात** - मा.महापौर साहेब,सदर ठराव तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.विनया तापकीर** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५१९ विषय क्रमांक - २६
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

विषय क्रमांक २६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २७वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २७
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दी समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी चिंबळी कुरुळी मोई निघोजे देहू विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी जांबे माण मारुंजी नेरे गहुंजे सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी ,नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,सदर ठराव तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.
यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५२० विषय क्रमांक - २७
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

विषय क्रमांक २७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २८वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २८
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/२/कावि/४५८/१३ दि.३०/१२/१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५५ दि.२२/०१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजना घटक योजना क्र.१ सुधारीत शिष्यवृत्ती वाटप योजनेत (सुधारीत) शिष्यवृत्ती म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१,५००/- ऐवजी र.रु.२,०००/- व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांसाठी र.रु.२,५००/- ऐवजी र.रु.३,०००/- देणेस तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत घटक योजना क्र.७ मागासवर्गीय युवकांना विविध व्यावसाय प्रशिक्षण देणे या योजनेच्या नावात मागासवर्गीय युवकांना शासनाकडील मान्यताप्राप्त प्रपत्र अ नुसार अर्हताधारक (V.T.P.) (Vocational Training Provoider) संस्थांमार्फत शासनमान्य अभ्यासक्रमाचे शासनमान्य दराने प्रशिक्षण देणे याप्रमाणे पूर्वीच्या योजने ऐवजी सुधारणा

करण्यास २) पूर्वीच्या योजनेच्या अटी शर्तीमध्ये सुधारणा करुन पुढील प्रमाणे अटी व शर्ती निश्चित करणेत याव्यात. **अ) लाभार्थी बाबत अटी शर्ती** – मागासवर्गीय कल्याणकारी योजना क्र.७ मधील लाभार्थींच्या अटी शर्ती मधील अ.क्र.५ अर्जदारास एकूण फी च्या १०% सहभाग शुल्क संबंधित प्रशिक्षण संस्थेकडे जमा करावे लागेल ही अट, अटी शर्तीमधून वगळण्यात यावी. **ब) V.T.P.बाबत अटी शर्ती** – १. V.T.P. संस्था यांना ३ वर्षापेक्षा जास्त वर्षाचा शासकीय योजनेतील प्रशिक्षणाचा अनुभव असावा. २. V.T.P. संस्था ही P.C.M.C. च्या हद्दीतील असावी. ३. संस्थेस समाजकल्याण विभागात मनपा, जिल्हापरिषद किंवा नगरपरिषद येथील योजनेत प्रशिक्षणाचा अनुभव असावा. ४. संस्थेची वार्षिक उलाढाल ही ४० लाखापेक्षा जास्त असावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या योजनेनुसार मनपा कार्यक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणा-या विद्यार्थीनींना अनुदान रक्कम देणेत येत असते त्याच धर्तीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देखील अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ९० टक्केचे पुढे मार्कस् असतील, परंतू ते नगरपालिकेच्या शाळेत नसतील तरी त्यांना रु.२५,०००/- अनुदान देणेत यावे. तसेच वरील योजनेअंतर्गत सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फोर व्हिलर ड्रायव्हिंग कोर्स देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याच सभागृहामध्ये सहा.आयुक्त मा.सतिश कुलकर्णी यांना आपण डायसवर बोलवले होते. त्यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले होते की, कोणतीही योजना बंद केलेली नाही. महिला बालकल्याण या विभागामार्फत चालविण्यात येणारी कोणतीही योजना बंद केलेली नाही. मग त्यांनी शिवण क्लासचे वर्ग का बंद केले आहेत? मशीन्स द्या असा आमचा आग्रह नाही. फक्त महिलांना प्रशिक्षण द्यावे. हे एकच असे प्रशिक्षण आहे. चार/पाच ओळी वाचल्या तरी महिलांना कोर्स करता येतो. विविध पक्वान्न तयार करायचा कोर्स आहे. त्या ते लहानपणापासून जातीने शिकतात. शिवण काम प्रत्यक्ष दाखवावे लागते. झोपडपट्टीतील महिला हे काम करु लागल्यातर गरीब महिलांना चार पैसे मिळतील. श्रीमंत महिलांनाही शिवण यंत्रे द्या. एका घरात चार/चार शिवण यंत्रे. त्या आपले जुने कपडे तरी शिवतील. म्हणजे तेवढीच काटकसर. आयुक्त साहेब, मा.महापौर कक्षामध्ये त्या दिवशी आम्ही सहाय्यक आयुक्त मा.कुलकर्णी साहेबांना बोलवले होते. त्यांनी सांगितले, फरांदे ताईंनी ठराव केला होता. फरांदे ताई म्हणाल्या, माझ्या काळात ठराव केला नाही. लोंढे मॅडम यांना बोलवले. त्यांना विचारले, त्या म्हणाल्या आम्ही ठराव केला नाही. शेवटी त्यांनी सांगितले, मा.आयुक्तांनी सांगितले आहे. म्हणजे डॉ.परदेशी साहेब कुठे आहेत, तिथे जावे असे म्हणते. इथे सभागृहात त्याचे मिनिटस् तुम्ही पाहिलेतर कळेल की, कोणताही कोर्स बंद केलेला नाही. मला शब्द द्यायचा आहे, शिलाई कामासारखे अत्यावश्यक असणारे कोर्सेस परत सुरु

करावेत, बंद का केलेला आहे. बंद करायचे नव्हते. ते त्वरित सुरु करायचे त्यांना आदेश द्या. तुम्ही राहू का नाही, आम्ही  राहू का नाही. मशीन्स मिळेल का नाही. हा नंतरचा प्रश्न आहे. कशासाठी योजना बंद केलेली आहे. १७/१८ कोर्सेस आहेत. या कोर्सेसला कोणाचा विरोध आहे, हे जाहीरपणे सांगावे. त्यामुळे काय होते. आमच्यासारखे घेणारे आहेत. आम्ही घरी जातो. नुसत्याच याद्या करतो. कोर्स चालू होतो आणि घरपोच मशिनरी जाते, सगळ्या गोष्टी येतात. हा आमचा दोष नाही. यात अंमलबजावणी करणा-यांचा दोष आहे. म्हणून प्रशिक्षण का बंद करावे. आत्ता तिथे २/३ जण चांगले आलेले आहेत. देवकर, पुराणिक आले आहेत. तिथले काम आता व्यवस्थित चालले आहे. मला काही अनुभव आलेला नाही. कोर्सेस का बंद केले आहेत याचा खुलासा करावा.

**मा.विनया तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता ज्या मशिन वाटप होत आहेत, त्या २००९-१० सालच्या मशिन्सचे वाटप करतोय. २०१०-११ साली ज्या महिलांनी कोर्सेस केले, अशा ब-याचशा महिलांच्या एका एका बचत गटामध्ये २५ महिला आहेत. अर्ध्या महिलांची नावे यादीत आहेत, अर्ध्यांची नाहीत. या महिला रोज येऊन आमचे डोके खातात की, आम्हाला मशीन का मिळाली नाही. आम्ही त्याच वर्षी कोर्स केला होता. हा जो कारभार चालू आहे, महिला बालकल्याण विभागाचा अतिशय भोंगळ कारभार चाललेला आहे. सीएफसी सेंटर मधून अर्ज भरून घेतले जातात. त्यांना त्याच्या पोचपावत्या दिल्या जातात. त्याची नोंद कम्प्यूटरवर नाही. आपण या महिलांवर सरळ सरळ अन्याय करतोय. माझी विनंती आहे, महिलांनी शिक्षण घेतले आहे. कोर्स केलेला आहे. त्यांना शिवण मशीन्स मिळाव्यात. मशीन्स येतील अगर न येतील, पण क्लास सुरु राहीला पाहीजे. शिलाई कामामुळे महिलांना उत्पन्न मिळते. माझी विनंती राहील की, शिलाई मशीन कोर्स हा बंद करु नये.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपल्या नागरवस्ती विभागातील महिला बालकल्याण योजनेचे नाव महिला बालकल्याण असे आहे. परंतू ते तसे नसून  अधिका-यांचे कल्याण असे या योजनेचे नाव ठेवावे असे मला वाटते. सगळ्या योजना अधिका-यांच्या फायद्याच्या असतात. आपण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला हे काम देतो. पण अधिका-यांचे त्या कामावर लक्ष असते का? अजिबात नसते. मागील वर्षी सुद्धा विषय मांडला होता. ज्या महिलांना प्रशिक्षण देतो, त्या महिला प्रशिक्षण घेतात का? काही होत नाही. त्यांचा पूर्ण संस्थेचा कारभार चुकीच्या पद्धतीने चाललेला असतो. सुरुवातीला या महिला उपस्थित नसतात. नंतर सर्टीफीकेट दिले जातात. त्यांच्यासाठी आपण एवढे कोर्सेस सुरु करतो. परंतू त्यांना त्याची काहीच माहिती नसते.  त्या म्हणतात, नगरसेवक आमच्यासाठी काय करतात? कोर्स फुकट आहे याचे त्यांना थोडेसुद्धा काही वाटत नाही. पैसे देऊन कोर्स करायचा असेलतर या महिला कोर्सला रेग्युलर जातात. आपण त्यांना सर्टिफिकेट देतो, मशिन देणार आहोत. पण त्यांना कोर्स यायला पाहीजे. ब्युटीपार्लरचा कोर्स घेतो,यात पालिकेचा कोणता अधिकारी जाऊन पाहतो? अधिका-याने कधी विचारले होते का त्यांनी काय शिकले. समुह संघटक नेमतो, ते काय काम करतात? बचत गटांच्या फाईल येतात. महिलांना सांगितले, तुमच्या फाईल गहाळ झाल्या. दुस-या फाईलची तयारी करा. समुह संघटक व अहिवले साहेबांचे हे उत्तर आहे. आपले

अधिकारी महिलांशी नीट बोलत नाहीत. नगरसेवकांशीच नीट बोलत नाहीत तर महिलांशी कधी नीट बोलणार. आयुक्त साहेब तुम्ही स्ट्रीक्ट ऑर्डर द्या. असे होता कामा नये. नगरसेवकांची व येणा-या महिलांची कामे व्यवस्थित झाली पाहीजेत. ज्या महिलांनी मशीनसाठी फॉर्म भरले आहेत. त्यांच्याकडे रिसीट आहे. त्यांची नावे आली नाहीत. काही महिला अशा आहेत त्यांनी फॉर्म भरला होता. कम्प्यूटरमध्ये नाव आहे. समुह संघटक म्हणतात, रिसीट दाखवा. कम्प्यूटरमध्ये नाव टाका. मात्र अधिकारी येत नाही. प्रत्येक वेळी महिलेला शंभर ते दीडशे रुपये खर्च करुन यावे लागते. चार चार वेळा आलेल्या आहेत. तुम्ही १८ ते २० हजार अनुदान देता. तिला यायला जायला पाचशे रुपये जातात. फाईल तयार करायला एक हजार रुपये जातात. त्या महिलांना काय अनुदान मिळते. त्या महिलांमध्ये पैसे खर्च करण्यावरुन भांडण लागते. मी करणार का तू करणार. फाईल चेक करा. हा गोंधळ करण्यापेक्षा आपली चार माणसे या कामासाठी लावा. टेक्निकली फाईल चेक करा. नागरी सुविधा केंद्रातून फॉर्म मागवल्यानंतर जरी मशिनचा फॉर्म आला आला तुमचा एक माणूस तिथेच पात्र अपात्र लिहू शकतो. महिला चार वर्षे ओरडल्या नसत्या. तुम्ही यात लक्ष घाला. या या योजना आहेत, असे मला परवा सांगण्यात येते. पूर्वी हा विभाग खूप सुरळीत होता, चांगले डिपार्टमेंट होते. आत्ता जो गोंधळ चालला आहे, त्याला प्रमाणच नाही. यात आयुक्त साहेब, व्यवस्थित लक्ष घाला. मागासवर्गीयांसाठी खूप चांगल्या योजना आहेत. एमबीबीएस, बीएचएमएस या उच्च शिक्षणासाठी जे रु.१५,०००/- देतो. मला वाटते, अनुसूचित जाती जमाती यांच्यासाठी ही मदत देतो. समाजातील जे गोरगरीब लोक आहेत, त्यांच्या मुलांना सुद्धा उच्च शिक्षणासाठी पैसे जातात. त्यांना खूप प्रॉब्लेम असतात. त्यांची परिस्थिती खरोखरच वाईट आहे. अधिका-यांनी छाननी करुन त्या लोकांसाठी सुद्धा हे पंधरा हजार ऐवजी पंचवीस हजार देणे चालू करावेत, अशी विनंती करते. निश्चितच महिला बाल कल्याण विभागात जो गोंधळ चालला आहे त्यात लक्ष घालून महिला बाल कल्याणचे काम सुरळित करावे अशी विनंती करते.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महिला बालकल्याणतर्फे अखिल भारतीय संस्था विविध कोर्सेस घेतेय. १५ ते २० कोर्सेस चालू केले. ॲडव्हान्स कोर्सपासून विविध खाद्य बनवणारे विविध कोर्सेस असतात. साधारणतः ३ महिन्यांपूर्वी २५ ते ३० फाईल्स आल्या होत्या. ही संस्था प्रशिक्षक आहे. त्यांना जे काही अनुदान मिळते. ते सांगतात, महिलांना गोळा करा व फाईल सबमिट करा. पुढील विभागाच्या या कोर्सला अजिबात डिमांड नाही. विशेषतः शिवण मशीनचे क्लास असतात. ते होणे गरजेचे आहे. आपण महिलांच्या कल्याणाकरिता एक मशीन दिली म्हणून काय झाले. यात विशेष काय? २०१०-११ नंतर मशीन देणे बंद केले आहे. ५ ते ६ हजार महिला कोर्स पूर्ण करुन त्यांच्याकडे सर्टिफिकेट आहे. त्यांना मशीन्स मिळाल्या पाहीजेत. याबाबतीत विचार होणे गरजेचे आहे. मशीन देण्याबद्दल अडचण असेलतर दहा टक्के किंवा पंचवीस टक्के रक्कम घ्यावी. सभागृहाने याबाबत निर्णय घ्यावा. जेणेकरुन महिला रोजगाराला लागावी. यातून २५% रोजगार निर्मिती झाली आहे. यात नियमावली आहे. म्हणून शिलाई मशीन कोर्स करणे खरोखरच गरजेचे आहे. नव्याने पुनःश्च कोर्स चालू करण्याबद्दल, राहीलेल्या महिलांना कोर्स देण्याबद्दल आपण जरुर विचार करावा अशी विनंती करतो.

**मा.आरती चौंधे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महिला बालकल्याण तर्फे, पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे महिलांना विविध कोर्सेस देतो. त्याचा महिलांना फायदा होतो. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था हे कोर्सेस चांगल्या पद्धतीने घेते का? त्याचा खरा फायदा महिलांना होतो का? मशिन यंत्रांच्या फाईलची ज्या महिलांची नोंद नाही, पण रिसीट आहे, त्या महिलांना काय उत्तर देणार आहोत. ज्या महिलांकडे रिसीट आहेत, कोर्स केलेले आहेत, त्या सर्व महिलांना मशीन्स मिळाव्यात. ११-१२ व १२-१३ मध्ये ज्या महिलांनी कोर्सेस केले आहेत. त्यांच्यासाठी नवीन फॉर्मस् ची मागणी करावी. शिलाई मशीनचा कोर्स बंद केला आहे, तो चालू करावा अशी विनंती करते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर ज्यांनी अर्ज सबमिट केले आहेत, त्या महिलांना पोचपावत्या दिलेल्या नाहीत. ब प्रभागातील नागरी सुविधा केंद्रातल्या कच-याच्या बकेटमध्ये पावत्या आणून पडलेल्या आहेत. त्यांच्या हजारो स्लिपा आज इथे आणल्या नाहीत, नाहीतर मी आज त्याचा पाऊस पाडणार होते. आयुक्त साहेब, मी या स्लिपा आपल्या ऑफीसमध्ये आणून देते. खाली नागरी सुविधा केंद्रात स्लिप आणा म्हणून तुम्ही मागणी करता. आयुक्त साहेब, नागरी सुविधा केंद्रात या पावत्या तशाच पडून राहील्या आहेत. लोकांना स्लिपा गेलेल्या नाहीत. मी त्या तुमच्याकडे आणून देते. म्हणजे तुम्हाला खरे वाटेल.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महिलांच्या सक्षमीकरणासाठी पिंपरी चिंचवड महापालिका अतिशय धाडसाचे पाऊल उचलते. तुम्ही शिवण यंत्रांचे वाटप करता. वेगवेगळे कोर्सेस शिकवता. एक कोर्स तुमच्या अधिका-यांना सुद्धा द्या. सक्षम अधिकारी बसवा समाजविकास अधिकारी. तुमच्या समाजविकास अधिका-याला काहीही शंका विचारा, हूं हूं करत असतात. त्यांना काहीच माहित नाही. इतका संताप होतो. राजकीय पुढारी सुद्धा भाषण देतात असे भाषण देतात. नगरसेवक त्यांच्याकडे गेल्यावर लवकर बसा असे सुद्धा म्हणणार नाहीत. त्यांचे गुरु कुलकर्णी साहेब, ते सुद्धा असेच करतात. आम्ही तुमच्याकडे रोज येत नाही. तुमच्याकडे चहा प्यायला येत नाही की तुमच्याकडे खायलाही येत नाही. जरी आलोतर आम्हाला फर्स्ट प्रायोरीटी द्या. तुम्ही या विभागाचे सक्षमीकरण करा. अहिवले तिथे अधिकारी बसले आहेत. कुलकर्णी साहेब सक्षम असले तरी मला हे खटकते. तसे ब-याच नगरसेवकांना खटकते म्हणून बोलते. कालपासून बरेच जण मला म्हणाले तुमच्याबद्दल बोला म्हणून खरेच मी बोलते. ॲटीट्यूड आहे, तुम्ही चांगले अधिकारी आहात. तुम्ही सक्षम असाल तर तुमच्या हाताखालचे सुद्धा सक्षम असले पाहीजेत. ज्यांच्याकडे सर्टिफीकेट आहे, त्यांच्याकडे पावत्या नाहीत. ज्यांच्याकडे पावत्या आहेत, त्यांच्याकडे सर्टीफीकेट नाही. रोज दिवस निघाला की महिलांची हीच तक्रार असते, शिवण यंत्र देत नाहीत. काही ठिकाणी तर पाचशे रुपये घेतल्याशिवाय समूह संघटक सर्टीफीकेट देत नाहीत. याला काही अर्थ नाही. चूक आपली आहे. आपण नागरीकांना, महिलांना सांगता, त्यांनी का म्हणून द्यायचे? आत्ता आमच्या फाईल पात्र झाल्या. पात्र झालेल्यांनी प्रशिक्षणाला या. आणि पावत्या घेऊन घरी जा. आम्ही इथे एन्ट्री करतो. किती गरीब महिला कितीवेळ हिरवळीवर बसलेल्या असतात. त्यांच्याकडे पाहून खूप वाईट वाटते. इतकी त्यांची वाईट अवस्था. महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. इतकी तुमची हिंमत, तुम्ही त्यांना भिका-यासारखे हकलून देता. वर बघायची सुद्धा तसदी घेत नाहीत. तुम्ही

या विभागात जातीने लक्ष घालणे अत्यंत महत्वाचे आहे. संस्थेच्याबाबतीत म्हणाल तर गेले ५/७ वर्षे झाली, आम्ही नॉनस्टॉप त्यांच्या विरोधात बोलतोय. मा.आशाताई शेंडगे यांनी सव्वा लाख भरुन पेपर मागवून माहिती नेलेली आहे. ५/६ महिने शोधायला लागतील. वाचायचे म्हटले तर दीड वर्ष जाईल. तळवडे, हिंजवडी आय.टी. पार्क इथे रात्री १० पर्यंत शिफ्ट करणा-या सुद्धा महिला, मुली आहेत. महिलांना ड्रायव्हिंग कोर्स द्यावा. महापालिकेने त्यासाठी कर्ज द्यावे. ही कॅब महिलांच्या नावावर असावी. तिला ड्रायव्हिंग आले पाहीजे. महापालिका म्हणून तुम्ही स्वतः जामीन झालातर कोणी म्हणणार नाही का दिले म्हणून. त्यांना उत्पन्नाचे चांगले साधन मिळेल. डीटीपी, टॅली याविषयी ज्यांनी प्रशिक्षण घेतले नाही, त्यांना सुद्धा सर्टिफिकेट दिले गेले आहे. कम्प्यूटर इन्स्टिटट्युटमधून मराठी झाल्याचे दाखवले गेले. यावर मागे प्रचंड वादावादी झाली. निर्णय काही होत नाही. दुःख आहे. चूकलात तर चूक तात्काळ दुरुस्त करा. स्वतः महापालिकेने वेगवेगळ्या ठिकाणी सेंटर्स चालू केले आहेत. १० ते १५ हजारांच्या खाली मराठी टाईपिंगसाठी कोणी कामाला येत नाही. महिलांना उत्पन्नाचे साधन मिळेल. भ्रष्टाचार केला, बीले घेतली, मशीन घेऊन गेलेत, आज सगळे घेऊन गेलेले आहे. खोट्या याद्या दिल्या. इथे मूळ उद्देश्य राबविला गेलेला नाही. वेगळ्या उद्देश्याने केलेतर निश्चितपणे महिला भगिनींना फायदा होणार आहे. महिलांना संपूर्ण शहरात गॅरेज चालवायचे काम फक्त पुरुषांनी करायचे. आमच्याकडे हे क्षेत्र नाही. राजकारण हा एकदम अस्पृश्य समजला जाणारा भाग होता. त्या भागात सुद्धा ५० टक्के आरक्षण का होईना आम्ही शिरकाव केलेला आहे. सगळ्या महिला भगिनींना ताकदीने अभ्यास करुन बोलतो. या क्षेत्रात सुद्धा आपल्याकडे मोठ मोठ्या कंपन्यांच्या डिलरशिप आहेत. त्यांचे सर्वीस सेंटर्स आहेत. तिथे प्रशिक्षण दिले तर वॉशिंग, ऑटोमॅटीग मशीनरीसाठी पैसे दिलेतर त्यांना उत्पन्नाचे साधन मिळवून दिलेतर एका चांगल्या क्षेत्रात त्यांची प्रगती होईल. ज्यांच्याकडे पावती आहे, सर्टिफिकेट नाही. ज्यांच्याकडे पावती नाही तर सर्टिफिकेट आहे. ब-याचशा ठिकाणी नजरचुकीने फाईलींच्या फाईली गहाळ झाल्या आहेत. २०१० पासून महिला थांबल्या आहेत. त्यांचे काय करणार. माझ्याकडे ज्या महिला आहेत. त्यांना चायना मेड शिवण यंत्रे दिलेली होती. त्या म्हणतात, आम्हाला इंडियन मेड मशीन्स पाहीजेत. त्यांना नवीन फॉर्म भरु द्या. तिथे सुद्धा २४ क्यू चे पत्र दिले. नवीन फॉर्मस् भरुन दिले. प्रशासनाचा नाकर्तेपणा, निष्काळजीपणा आणि त्याचा भूर्दंड मात्र महिलांना बसतो आहे. कुलकर्णी साहेब ज्या दिवशी त्या महिलांना बोलवतात. या महिला छोटी मुले घेऊन बसतात. पाणी प्यायला, उद्यानांत पाणी देण्यासाठी किंवा गाड्या धुवायला असलेल्या पाईपमधून ओंजळीने मुलांना पाणी पाजतात. त्यांना बघून वाईट वाटते. त्यांच्या बसण्याची सुद्धा व्यवस्था करा. हा विषय अत्यंत संवेदनशीलतेने हाताळा.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी आत्ताच मा.निता पाडाळे ताईंनी सांगितल्याप्रमाणे मला प्रश्न निर्माण झाला आहे की,यावर्षी राज्यात महिलांना ३४ टक्के आरक्षण दिले आहे. पण महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभाग इथे ३४ टक्के आरक्षण आहे का नाही? कारण तिथे महिलांना प्राधान्य दिले गेले पाहीजे ते दिले जात नाही. उलटसुलट उत्तरे दिली जातात. इथे काही समूह संघटकांनी प्रत्येक सन्मा.सदस्याच्या वॉर्डातल्या मशीन साठी जे अर्ज घेतले आहेत. ते अर्ज त्यांनी त्यांच्या नागरी सुविधा केंद्रावर टाकले नाहीत. मात्र

त्यांनी मशीन दिलेली नाही. मग उत्तर काय द्यायचे पावती आहे का. अर्ज केल्याची पावती आहे का. समूह संघटकांनी हे अर्ज स्विकारले असतील तर पोचपावती दिली असेलतर तुम्ही नाकारता का. मग अर्ज कुठे गेला, सगळे कशासाठी चालले आहे. अशा ब-याचशा योजना आहेत. अनुदानाच्या फाईल द्या. एक महिन्यापूर्वी अहिवले यांनी पत्र पाठवले, तुमच्या अनुदान फाईलमध्ये त्रुटी आहेत. तुम्ही त्या दुरुस्त करा. आणि नागरवस्ती विभागाला फाईल पाठवा. अक्षरशः त्या महिलांनी सर्व कागदपत्रे जोडून बँक स्टेटमेंट, आधार कार्ड असेल, त्यांच्या मासिक मिटींगचा अहवाल असेल ते सगळे पुन्हा नवीन तयार करुन प्रभागात नागरी सुविधा केंद्रात फाईल दिलेली असताना सुद्धा इथे आल्यावर उत्तर येते, या फाईल प्राप्त झाल्या नाहीत. मग ड प्रभागातून महापालिकेत फाईल चालत गेली का. मग नागरीकांनी किंवा महिला बचत गटातील महिलांनी काय करायचे? चाललेला हा घोळ सन २००७-०८, २०११-१२ व २०१३ असा प्रकारे चालला आहे. तरीसुद्धा महिलांनी संयम ठेवलेला आहे. सिमाताईंच्या वॉर्डातले सांगायचे झालेतर या महिलांनी आंदोलनच करावे. मनपाच्या गेटवर येऊन हजार दोन हजार महिलांनी आंदोलन करावे. नागरवस्ती विभागाकडून आमची दखल घेतली जात नाही म्हणून निषेध सुद्धा करावा. त्यांना न्याय मिळत नाही यासारखे दूर्दैव कुठले. आयुक्त साहेब, आपण इथे नव्याने आला आहात. या विभागाची आपण माहिती घ्या. मी याठिकाणी जाहीर सांगतो. या विभागाला फक्त पवनाथडीमध्ये इंटरेस्ट आहे. बाकी ठिकाणी काम करण्यात इंटरेस्ट नाही. महिलांना स्टॉल दिले जातात. बचत गटांच्या नावे एका स्टॉलचे दोन स्टॉल केले गेले. हे काम आपल्या महापालिकेच्या नागरवस्ती विभागातील अधिकारी करतात. गेल्या वर्षी सांगवी पी.डब्ल्यू.डी. मैदानावर मी पवनाथडी घेतली. अर्ज भरणा-या ज्या महिलांनी रितसर स्टॉल घेतला होता, त्यांना मिळाला नाही. एका स्टॉलचे दोन स्टॉल केले गेले. अशा प्रकारे नागरवस्ती विभागाची अवस्था आहे. ही सुधारणा कधी होईल. आपण यात लक्ष घालाल व लवकर सुधारणा होईल अशा आशा व्यक्त करतो.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेत सगळ्यात वाईट अवस्था महिला व बालकल्याण विभागाची आहे. मशीन वाटपात किती गोंधळ चालला आहे. काही महिलांची नावे यादीत आहेत, काहींची नाहीत. जे नियम सांगितलेले आहेत, ते खूप किचकट आहेत. रेशनकार्ड, उत्पन्न. समूह संघटक महिलांची नोंदणी करण्यासाठी आले होते. तेव्हा कम्प्यूटर बंद पडला. कम्प्यूटरवर नाव नोंदणी करतो असे त्यांनी सांगितले होते. त्या महिलांची नाव नोंदणी करण्यात आलेली नाही. आम्ही काय करावे. पूर्ण कोर्स करुन आम्हाला मशीन्स मिळत नाहीत. या विभागातील अधिका-यांची उद्दाम उत्तरे ऐकायला मिळतात. सरळ उत्तर कोणी देत नाही. मशीनचे कोर्सेस परत सुरु करावेत. सन २०१०-११ करिताचे वाटप परत सुरु करावे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महिलांचा विकास करण्यासाठी आपण योजना आखतो. महापालिकेकडून जास्तीत जास्त महिलांना कसे सक्षम करता येईल त्या दृष्टीने सगळ्या योजना असतात. तसे असताना शिलाई मशीन, फोर व्हिलर ड्रायव्हींग याबद्दल मी महिला बालकल्याण समितीची सभापती असताना आयुक्त, डॉ.परदेशी साहेब यांच्याकडे वारंवार जाऊन भेटले होते. त्यांना सांगितले की, महिलांना फोर व्हिलर ड्रायव्हींगचा कोर्स सुरु

करा. तेव्हा मला सांगितले गेले की, हा कोर्स फक्त उच्चभ्रू महिला वर्गासाठी आहे. आत्ता तसे राहीलेले नाही. याचा विचार परत एकदा करावा. फोर व्हिलर ड्रायव्हींग कसे सुरु करता येईल ते पहावे. त्याचप्रमाणे सन २०१०-२०११ पर्यंतच्या शिलाई मशीन्स आलेल्या आहेत. त्यांचे वाटप चालू आहे. काही महिलांनी कोर्स केला आहे. सर्टिफिकेटस् सुद्धा मिळाले होते. अशा महिलांची नोंद घेतली गेलेली नाही. ज्यांच्याकडे सर्टिफिकेटस् आहेत अशा महिलांसाठी पेपरमधून जाहीर करा. शिलाई मशीनच्या योजनेत महिलांना बोलवून शिलाई मशीन त्यांच्या नावाने करुन त्यांना शिलाई मशीन कशा देता येतील याची नोंद करा. छोटी-छोटी कारणे देतात, उत्पन्नाचा दाखला नाही. जेव्हा महिला फॉर्म सबमिट करायला येतात, एखादी व्यक्ती ठेवा. तेव्हा फॉर्मबरोबर सगळे पेपर व्यवस्थित आले आहेत का नाही हे पाहूनच ते फॉर्मस् सबमिट करुन घ्या. रेशनकार्ड नाही म्हणून त्या महिलेला अपात्र झाल्याचे नंतर कळवता. त्यापेक्षा फॉर्म सबमिट करुन घेतानाच त्यांना सगळ्या त्रुटी सांगा. विधवा महिलांना चेक देता. आम्ही फोन करुन विचारतो, अमुक अमुक चेक आला का. तुम्ही त्यांना कोणते कारण सांगता. जेव्हा अधिकारी चेक काढून देतात, तोपर्यंत तो चेक इनव्हॅलिड झालेला असतो. परत त्या महिलांना सांगायचे, चार दिवसांनी या. मी स्वतः आलेतर लगेच चेक तयार असतो. नाहीतर चेक द्यायला पंधरा पंधरा दिवस घालवतात. आवाज वाढवला तर लगेच चेक तयार होतो, असे झाले नाही पाहीजे. महिला बालकल्याणचे बजेट जास्तीत जास्त चांगल्या दृष्टीने कसे वापरले जावे या दृष्टीने यात लक्ष घालावे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महिला बालकल्याणकडून महिलांना शिलाई मशीन त्यांना देतो, ज्यांना प्रशिक्षण दिले जाते. कित्येक वर्षे झालीत प्रशिक्षण देणारी एकच संस्था आहे. या संस्थेचे दोन मालक आहेत. कोल्हे व चंद्रकांत पाटील हेच लोक वेगवेगळी प्रशिक्षणे, पाककला असेल, शिवण क्लास असेल, ब्युटीपार्लरचा क्लास असेल, एकच ठेकेदार. ठेकेदाराकडे फाईल तयार आहेत. त्यांना ऑर्डर नाही. त्या फाईलवर झेरॉक्सवर फोटो लावायचा. नगरसेवकांनी शिक्का द्यायचा. एकाच पानावर डबल सील/शिक्का असा अंदाधुंद कारभार किती वर्षांपासून चालला आहे. महिला सक्षम झाल्या पाहीजेत. त्यांनी त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी आपण सहकार्य केले पाहीजे. मी शंभर टक्के सहमत आहे. यात लक्ष देणे गरजेचे आहे. शहरात बेरोजगारांमध्ये प्रचंड वाढ होत चालली आहे. ५१ टक्के स्त्रिया व ४९ टक्के पुरुष अशी वाढ झाली आहे. सुशिक्षित बेरोजगार मुले यांच्या हाताला रोजगार नाही. शिलाई मशिन, सायकली देतो. नोकरीत ब-याचशा ठिकाणी अडचणी आहेत. पोलिस भरती झाली. त्यात रनिंग करताना बरेचसे लोक खलास झालेले आहेत. आपण इथे काहीही सुविधा देत नाहीत. माझी आयुक्त साहेबांना, सभागृहाला हात जोडून विनंती आहे की, पुरषांच्या संदर्भात सुद्धा काहीतरी धोरण अवलंबवले पाहीजे. योजना काढली पाहीजे. त्यांना स्वतःच्या पायावर उभे करायचे धोरण काढले पाहीजे. नाहीतर एखादी संस्था अशी करा, पुरुषांनाही कुठेतरी स्वयंपाकाचे प्रशिक्षण देण्यात यावे अशी वेळ काही दिवसांनी येईल.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्तापर्यंत सर्वांनी नागरवस्ती विभागासंदर्भात अनेक तक्रारी केल्या आहेत. माझ्या भागातसुद्धा २००७ पासून २०१४ पर्यंत कमीत कमी २५० ते पाऊण तिनशे बचत गट आहेत. महिला बालकल्याणमध्ये काही काम

करायची जी पद्धत आहे. कालच कुलकर्णी साहेबांशी माझा वाद झाला. किंवा त्यांचे अहिवले साहेब यांना बक्षीस दिले पाहीजे. त्यांच्या सत्कार केला पाहीजे. आठवड्याचा मानकरी हा पुरस्कार महापालिकेने सुरु केला आहे. त्यांना रोजचा मानकरी हा पुरस्कार दिला पाहीजे. त्यांना नगरसेवकांशी बोलायची अक्कल नाही. त्यांना ऐकायला वेळ नाही तरी त्यांना अशा पदावर बसवले असेलतर यापेक्षा वाईट गोष्ट दुसरी नाही. ते प्रत्येक माणसाला आरे कारे बोलतात. आपण आयुक्त असून देखील नगरसेवकांशी सन्मानाने बोलता. दोनच दिवसांपूर्वीचा विषय आहे. (मा.शमिम पठाण यांनी कच-याच्या डब्यामध्ये टाकून दिलेल्या शिलाई मशीन, बचतगट, सायकल वाटपाच्या पावत्या सभागृहामध्ये आणून मा.आयुक्त यांच्याकडे दिल्या.) खरेतर ही निंदनीय बाब आहे. आज नागरवस्ती विभागाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण व्हावे. काही महिलांना बोलवले जाते. काही महिलांचे फॉर्मस् भरुन घेतले जातात. कालचीच हाईट सांगतो, मी नागरवस्ती विभागा गेलो होते. तिथे महिलांची रांग लागली होती. कुलकर्णी साहेब गेले १० दिवस रजेवर होते. आपण आदेश दिलात का नाही आम्हाला माहीत नाही. आम्हाला एसएमएससुद्धा आला होता. मशीन दिल्या जाणार आहेत. तुम्ही फॉर्म भरायला या. फॉर्म भरायला महिलांना प्रभागामध्ये बोलवले. महिला प्रभागात गेल्या. तिथून तुमच्या गोडाऊनमध्ये बोलवले. तिथे फोन आला की या महिलांना हेडऑफीसला बोलवा. त्या महिलांना हेडऑफीसला बोलवण्यात आले. आपण खूप मोठा उपकार करतोय किंवा देणेकरी नाही. ३/४ हजारच्या मशीनसाठी त्यांना फिरवत असतील, यापेक्षा वाईट गोष्ट नाही. कशासाठी निधी देतोय. महिलांचे सक्षमीकरण व्हावे. त्या कुठेतरी उभ्या रहाव्यात. आपली अवस्था जास्त वाईट आहे. त्यांची अवस्था पहिली बदला. २००८-०९, २०१०-११ मध्ये इतका बेकार कारभार त्या भागात चालला आहे. यांनी काल सुद्धा हेच केले. काल सुद्धा काही फॉर्म घेतले. फॉर्म घेतल्यानंतर फॉर्म हरवले म्हणून त्यांना परत बोलवतोय. काल हिच पद्धत. काल असेच फॉर्म घेतले व त्यांना पोच दिलेली नाही. त्यांना काय माहीत. अहिवले यांना लोकांच्या संबंधी विषयामध्ये खरेच घेऊ नका. महिला या पावत्यांवर भांडायला कमी करणार नाही. आपण चांगले कारभार करताय. पण एका विषयामुळे चांगल्या कामाचे वाईट व्हायला वेळ लागत नाही. महिला बालकल्याणचे बजेट किती असते. आणि सन २०१२-१३ करिता ३२ कोटी बजेट असेल तर ते कशासाठी दिले आहे? शहरात काहीतरी पायंडा पडावा. महिला बालकल्याणसाठी इतके बजेट देणारी हि महापालिका राज्यात वेगळी आहे. आपली राज्यात सगळ्यात वेगळी ओळख आहे. अधिकारी चुकीचे काम करतात. आमची नेते मंडळी हे सुद्धा साथ देतात. त्यांची सत्ता आहे. त्यांनी हे केले, यांनी हे केले हे कशासाठी. अखिल भारतीय संस्थेच्या माध्यमातून काही क्लासेस घेतले जातात. त्यात खूप अटी-शर्ती आहेत. माझे मत आहे, आपण त्या अटी-शर्ती काढून टाकाव्यात. ३२ कोटी म्हणजे भरपूर बजेट आहे. अखिल भारतीय संस्थेकडून ज्यांनी ज्यांनी प्रशिक्षण घेतले आहे असे किती असणार आहेत? माझ्याकडे कमीत कमी चार/पाचशे महिलांचा गठ्ठा आहे. ज्या महिलांनी कोर्स केला आहे, त्या महिला रोज माझ्याकडे येतात, आम्हाला मशीन वाटप झाले नाही म्हणून. मग आम्हाला क्लास घ्यायला कशाला लावला आहे? साहेबांना आमच्या वॉर्डात फिरवले आहे. त्यांनी सगळे पाहीले आहे. त्यांना सांगितले आहे. आणि आत्ता सांगतात त्यांना मशीन देणार नाही. किती मोठे नुकसान होणार आहे. त्यांना स्पष्ट सांगा, मशीन मिळणार नाही. ज्यांना आश्वासन दिलेले आहे, त्यांच्या

आशा-अपेक्षा पु-या कराव्यात अशी विनंती करतो. महापौर साहेब, आपण आदेश द्यावा, बजेट किती खर्च केले आहे. अखिल भारतीय संस्थेने ठेकेदाराला आत्तापर्यंत किती क्लास दिले आहेत, त्यांचा डाटा मागवा. आत्तापर्यंत पिंपरी चिंचवड शहरामध्ये महिलांना कोणकोणते क्लासेस दिले, कोणकोणच्या महिलांना सर्टिफिकेट दिले, हा डाटा ऑनलाईन घ्यायला लावा. म्हणजे यात चांगला व्यवहार का काळाबाजार जो काही झाला हे कळेल. हे सभागृहाला सांगा. शंभर महिलांनी ऑलरेडी काम केले आहे का यांनी वेगळे धंदे केलेले आहेत असे अद्याप घडलेले नाही. आयुक्त साहेब, आपण नवीन आहात. आयुक्त साहेब, तुम्हाला इथे गोलमाल करायची शक्यता आहे. ऑनलाईन करा. त्यांनी काय काय केले त्यांची नावे तिथे असणार आहेत. जे चित्र आहे तेही स्पष्ट दिसेल. खर्च किती केला ते सांगावे. सन २०१२-१३ पर्यंत ज्या महिलांनी क्लास केलेले आहेत, त्या महिलांना सुद्धा मशीन द्यावीत. त्यांना सुद्धा योग्य तो न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे. ज्यांच्याकडे अखिल भारतीय संस्थेचे सर्टिफीकेट आहे, त्यांनाच शिलाई मशीन द्यावी, अशी उपसूचना देतो.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मी उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मी प्रत्येक वर्षी सांगतो, महिला व बालकल्याण या विभागाला जे बजेट दिलेले आहे, यात कुठल्याही वर्षात ७५ टक्के खर्च झाला असे नाही. काही वर्षी असे आहेत तिथे ५० टक्के सुद्धा खर्च झाला नाही. आपण महिला बालकल्याण विभागाकडून अनेक प्रकारच्या योजना राबवितो. आपण शहरात लोकांना काय सुविधा देतो हे सुद्धा लोकांना माहित नाही. एक पॅम्पलेट करा. त्यात सगळ्या योजनेची माहिती द्या. प्रत्येक भागात हे पॅम्पलेट वाटा. वर्तमानपत्रामध्ये जाहीरात द्यायला पाहीजे. पैसे खर्च होत नाही म्हणजे काय. इफिसियंशी नाही. या विभागाला महिलांसाठी काय करायचे तो खर्च देऊ शकत नाही. म्हणजे ही सुविधा पोहोचू शकत नाही. महिला म्हणतात पावती आहे तरीसुद्धा मशीन देत नाहीत. ही पद्धत आहे का. ते म्हणाले १०/- भरले नाहीत असे सांगतात. आम्ही लोकांना सांगतो, आत्ता पैसे भरुन घ्या आणि मशीन द्या. ते म्हणाले या प्रोजेक्टची जाहीरात येणार आहे. मशीनसाठी बजेट कमी असेलतर इंटर्नल तरतूद वर्ग करुन ठेवा. आपण सिव्हील कामासाठी लाखो,करोडो रुपये इंटर्नली ट्रान्सफर करतो. महापालिका सभेत ठराव केला होता. मग २०१०-११ मध्ये मशीन द्यायला पाहीजे होती. २०१० मध्येच द्यायला पाहीजे होती. ३ वर्षानंतर मशीन देतोय, असे का करतोय. सायकलीचे सुद्धा असेच आहे. विधवा महिलांचे सुद्धा असेच आहे. अनेक बचत गट नाराज झाले. मॅनपॉवर कमी आहे का? ३/३ वर्षे पैसे असून सुद्धा देत नाहीत. हे शेमफुल आहे. ऍडमिनिस्ट्रेशनमध्ये इफिसियंशी पाहीजे. या योजना महिलांपर्यंत पोहोचल्या पाहीजेत. डिसेंबरनंतर कोर्स सुरु केला. मग पैसे कसे खर्च होणार. प्रत्येक आयटममध्ये असेच आहे. मार्चमध्ये केले. मग एप्रिलमध्ये का सुरु करत नाही. कुठेतरी सुधारणा झाली पाहीजे. या विषय़ावर खूप बोलू शकतो पण उपयोग काय? प्रायव्हेट कंपनी असती तर टोटल पैसे खर्च केले असते व दर्जेदार सुविधा शेवटपर्यंत पोचली असती. फॉर्म सबमिट करायचे तर ते सेंट्रलाईज केले पाहीजेत. सेंट्रली फॉर्म सबमिट करायची योजना करु नका. आयुक्त साहेब, या विभागाकडे थोडे लक्ष द्या. यासाठी लोकांपर्यंत पोचले पाहीजे. बजेट

झाल्यानंतर ताबडतोब यात जाहीरात देणे, इ. असे एक लेटर पाठवता, हे हे सुरु केले. ऍट्रॅक्टीव्ह असे डायरेक्टीव्हज् देणारे लिफलेट केले पाहीजे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज जसा विषय आणला आहे. तसा महिला बालकल्याणचा विषय आणला होता. हा आत्ता जो गोंधळ चालला आहे, त्यावेळी सुद्धा सगळ्या नगरसेवकांनी हेच विचारले होते. याच्या ऐवजी असे, ह्याच्याऐवजी असे शिष्यवृत्तीबाबतचा आजचा विषय आहे. त्यावेळी सुद्धा सगळ्यांनी हेच विचारले होते. महिला बाल कल्याणचा विषय असाच आणला होता. त्यावेळी विचारले होते, यातील काही योजना बंद करणार आहात का. तुम्ही म्हणाला होता, कोणतीही योजना बंद करणार नाही. तुम्ही शिवण क्लास का बंद केलेत का आणि केला असेलतर याचे कारण सांगा. आख्ख्या महाराष्ट्रात पिंपरी चिंचवड महापालिकेचे महिला बालकल्याणमध्ये उत्कृष्ट पद्धताने काम झाले आहे. आपले बजेट सर्वात जास्त आहे. कोर्सचे टेंडर कोणत्या संस्थेला द्यायचे. मी मागील बजेटच्या मिटींगच्या वेळी प्रस्ताव मांडला होता, प्रत्येक वॉर्डमध्ये दोन सेंटर्स बनवा. तिथे महिलांना कोर्स दिला पाहीजे. कोणत्याही माणसाला, कोणत्याही ठेकेदाराला काम द्यायचे, पण प्रामाणिकपणे काम झाले पाहीजे, ही पहायची जबाबदारी कोणाची आहे? प्रत्येक वॉर्डात महापालिकेच्या इमारती आहेत. आपले सेंटर्स तिथे चालले पाहीजेत. प्रत्येक वॉर्डात कार्यशाळा असल्या पाहीजेत. आज आपल्याकडे ४०/४० कोटी वर्षाला खर्च करणार असू तर आपल्याकडे का नाही. प्रत्येक वॉर्डात समाज मंदीर आहे. प्रत्येक वॉर्डात इमारती आहेत. त्याठिकाणी तिथे कोर्ससाठी महिला गेल्या पाहीजेत. अधिका-यांनी त्याचे संपूर्ण नियोजन केले पाहीजे. मा.दत्ता साने म्हणाले, साहेब कुठेतरी गेले होते. कुलकर्णी साहेब चायनाला प्रशिक्षणासाठी गेले होते. साहेब, तुम्ही चायनाला गेलात त्यावेळी तिथे बघितले असेल, तुम्हाला तिथे मार्केटमध्ये कुठे पुरुष दिसलेत का. कुठेही पुरुष दिसत नाहीत. चायनाचे आख्खे मार्केटींग महिलांकडे आहे. जिथे-जिथे प्रॉडक्शन होते, तिथे पुरुष काम करत असतील. प्रत्येक ठिकाणी महिला दिसतील. काल सुद्धा मी सभागृहामध्ये हेच बोलले होते. आम्ही तुम्हाला आज मुदतवाढ दिली. तुम्ही अजून कुठेही दौरा करा. तिथे गेल्यानंतर महिला बालकल्याण विभाग तुमच्याकडे आहे. तुम्ही विभागात कशी दुरुस्ती केली गेली पाहीजे. आज चायनात मोठ मोठ्या मार्केटमध्ये महिला डिल करत असतात. जिकडे तिकडे महिलांना मानसन्मान आहे. तिथून तुम्ही काय आणले. येणा-या आगामी वर्षांत पिंपरी चिंचवडला तुम्ही किती वर्षे थांबणार आहात. त्याप्रमाणे कसले आपल्या हातात, कोणाला दुखवायचे, या विषयात मला जायचे नाही. हे सुद्धा तुम्ही इम्प्लिमेंटेशन केले पाहीजे. जे काम चालले आहे. हा विभाग दुरुस्त केला नाहीतर, मी तुमच्याकडून काम करायची क्षमता ठेवत असेल तर मी खालच्या माणसाकडे बोट का दाखवायचे. मुदतवाढ नसताना सुद्धा तुम्ही चायनाला का गेलात, हे आम्ही तुम्हाला विचारले नाही. तुम्हाला आयुक्तांनी परवानगी का दिली. तुमच्यावर एवढा खर्च का केला आम्ही विचारले नाही. तुम्ही सुद्धा त्याच क्षमतेने काम केले पाहीजे. आम्हाला कुलकर्णी साहेब पाहीजे आहेत. तुमच्या खालच्यांना कसे हाकायचे हे तुमचे काम आहे. तुमचे एखादे काम कमी करा, चालेल. साहेब आम्ही बघितले, श्रीनिवास पाटील असताना एकदा महिला बालकल्याणचे बजेट केले

होते. त्यांनी फिक्स डिपॉझिट केले. त्याच्या व्याजावर हा विभाग चालत होता. कशासाठी, या योजना केल्या, त्यांचे काय करणार आहोत. ३ वर्षे झालेल्या बचतगटांना १ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तुम्ही फाईल घेतल्यानंतर दुस-या वर्षी पैसे देत होतो. आत्ता तिसरे वर्षी फाईल घेणार, चौथ्या वर्षी तपासणार आणि पाचव्या वर्षी अनुदान देणार. या नगरसेवकांची कारकीर्द ५ वर्षांची संपून जाते. म्हणजे बचतगटांना अनुदानच नाही. तुम्ही येऊन भले केले का. वाईटच केले. मी सांगते, तुम्ही कोणाचेच चांगले केले नाही. वाईटच केले. कोणाला टेंडर द्यायचे हे आम्हाला विचारले का. पण त्या माणसाकडून काम करुन घेण्याची जबाबदारी तुमची आहे. कशासाठी बोगस फाईल होतात. कशासाठी बोगस फाईल झाल्या पाहीजेत. जसे आपण म्हणतो बजेट मांडता. महिलांना चार वर्षांत अनुदान दिले नाही. त्यातील २ वर्षे आपण इथेच आहात, काय उपयोग आहे. महिलांना अनुदान नाही. शिलाई मशीन वाटपची अवस्था अवघड आहे. कोणत्याच योजनेत ताळतंत्र नसणार आहे तर डिपार्टमेंट हेड म्हणून पीएमपीएलच्या अष्टेकर साहेबांना इथे बसवले होते. आत्ता तुम्ही आहात. कमिशनर म्हणून तुमचा सुद्धा कमीपणा आहे. अधिका-यांनी कितपत कडक असेल पाहीजे. कामे करुन घेतली पाहीजेत. जो हेड आहे, त्यांनी कडकच असायलाच पाहीजे. मी परदेशी साहेबांना कधीही नावे ठेवली नाहीत. कडक पद्धतीनेच काम झाले पाहीजे. अन्यथा अशी परिस्थिती होणार आहे. इथे योजना आहे, पैसा आहे. महिला बालकल्याण यातील बाल हा शब्द यात काही नाही. ज्या योजना आहेत, त्यात बालकांना काय दिले जाते ते सांगा. जी अनुदाने, शिष्यवृत्त्या शहरातील मुलांना शाळांतूनच काहीतरी देतो. त्यात पुण्यामध्ये १० वी पास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना अनुदान देतात. प्रत्येक नगरसेवकाचा प्रश्न आहे, आमच्या विद्यार्थ्यांना ९० टक्के मार्कस् पडलेतर परंतू शाळांमधून आम्ही त्यांना दोन रुपये तरी देणार होतो, ते त्यांना द्या. ५० विद्यार्थ्यांना तरी दहा हजार जाऊ द्या. पुणे महापालिका रु.२५,०००/- देणार असेलतर आपण रु.१०,०००/- तरी द्या. आपले बजेट त्यांच्यापेक्षा जास्त आहे. परंतू या सभागृहात ज्या-ज्या वेळी विषय केले गेलेत, त्या त्या वेळी योजना होत नव्हती का. कुलकर्णी साहेब आल्यापासून या विषयाला फार फाटे फुटले आहेत. आम्ही बोलत होतो तेच काम चालत होते. आम्ही बोलल्यानंतर तुमच्याकडून फाईलवर सगळे बदल होतात. तसे करु नका. माझ्या माहितीप्रमाणे फरांदे ताई या महिला बालकल्याण समितीच्या अध्यक्षा होत्या. त्यावेळी त्यांनी विषय केला होता. इतर शाळांतील ९० टक्क्यांपुढील मुलांना लॅपटॉप द्यावे, हा सुद्धा एक ठराव घ्या. अशी किती मुले आहेत. त्यांना कौतुकाची थाप द्या. सूजाण नागरीक तयार करण्य़ासाठी रु.१०,०००/- दिलेतर काय फरक पडणार आहे? महिला यांच्यासाठी दोन कोर्सेस कमी केलीतरी चालतील. तीनच विषयांच्या फाईल का तुमच्याकडे आल्या आहेत. तपासून बघितले पाहीजे. आम्ही इथे ओरडून सांगितले होते, शिक्षणाची अट ठेवू नका. पण तुम्ही तुमच्या मतांवर ठाम राहीलात. जो माणूस ठेकेदार आहे, तो त्यांचे हित बघणारच आहे. शिक्षणाच्या अटीची पूर्तता होत नसेलतर मग बाकी कोर्स कसा होणार. शिक्षणाची अट आलीतर बाईचे नाव पहिले, नव-याचे वेगळे, रेशनकार्डवरचे वेगळे ते तुम्ही कशासाठी केले. त्यामुळे शिक्षणाची अट असल्यामुळे एकाही फाईलवर सही झाली नाही. याला आपणच कारण आहोत. इथे आम्ही सांगितले होते, कोणत्याही अटी लावू नका. जितक्या अटी लावणार. त्याचा उपयोग होत नाही. आपले सगळे पैसे पाण्यात गेले आहेत. म्हणून सोप्पे सुटसुटीत करा. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी कायदा कडक करा. बोगस

नोंदणी केलीतर फौजदारी गुन्हा दाखल होईल. कायदे कडक करा त्यात. शिकले पाहीजेत. कोर्स झाले पाहीजेत. आपले अधिकारी कोर्स घेतात, ते चेक करा. हे चेक करायची जबाबदारी कोणाची, ते चेक केले गेले पाहीजेत. ५ कोटी देतो. हे कुणी चेक केले पाहीजे. आम्ही सांगतोय, सेंटर बनवले पाहीजेत. आपल्याकडे सेंटर नाहीत मग कोणाच्या तरी घरात, प्रभागामध्ये. कोणी शंका घ्यायची. आज तुम्हाला मुदतवाढ दिलेली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये एवढे चांगले वातावरण आहे. सगळे नागरीक चांगले आहेत. तुम्ही सुद्धा त्याच पद्धतीने दिले पाहीजे. कोणती अनुदाने, शिष्यवृत्त्या योग्य पद्धतीने दिल्या जात नाहीत. काल मी टेकाळे साहेबांशी बोलले आहे. कुलकर्णी साहेबांच्या खालचा माणूस नीट वागत नाही. मी म्हटले, मा.उल्हास जगताप यांना तिथे ॲडीशनल चार्ज देता आलातर द्या. त्यांची पोस्ट मोठी आहे. कारण काम करायची पद्धत आहे. समोर माणूस गेल्यानंतर आज या सगळ्या बायकांनी सांगितले, कसे बोलले पाहीजे. कोण बोलतो. मला कोणत्याही माणसाचे नाव घ्यायचे नाही. एकाचे नाव घ्यायचे आणि एकाचे झाकायचे. काही उपयोग नाही. हाच विभाग नाहीतर क्रिडा विभागातही असेच आहे. एका एका विभागाच्या मिटींग घेताय पीएमपीएमएलची वाट, महिला बालकल्याणची वाट, क्रिडाची वाट, उद्यान विभागाची वाट. काय शिल्लक राहीले. आम्ही सकाळपासून कशासाठी बसलो आहोत. आत्ता ७ वाजलेत. आयुक्त साहेब, तुमचे स्वप्न, तुम्ही स्ट्राँगच रहा. त्यापद्धतीने काम करुन घ्या. अधिकारी व खालचा स्टाफ तसे वागत नसेलतर त्या पद्धतीने काम करुन घेतले पाहीजे. कोणत्याही शाळेतील ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले अशा १०वीतल्या मुलांना रु.१०,०००/- ला मंजूरी द्या अशी विनंती करते. विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी क्रिडा विभागात सुद्धा अशी क्रिडांगणे केली गेली पाहीजेत. आपली मुले मिलिटरीसाठी, पोलिस भरतीसाठी, पीएसआयच्या परिक्षा घेतल्या जातात. ग्राऊंड चांगले पाहीजेत. त्यांना अभ्यासिका मिळाल्या पाहीजेत. मुलांसाठी कोर्सेस घ्या. पोलिस भरतीसाठी रु.५,०००/- फी आहे. आपल्याकडे मुलांसाठी १० टक्के रक्कम भरुन हा कोर्स ॲड करा. अशी सुद्धा याप्रसंगी सूचना देते. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील महापालिकेतील इ.१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ९० टक्केच्या पुढे गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांना महापालिकेमार्फत र.रु.१०,०००/- आर्थिक सहाय्य देणेत येते. त्याचप्रमाणे शहरातील खाजगी शाळेतील ९० टक्केच्या पुढे गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१०,०००/- देण्यात यावे तसेच महापालिकेच्या क्रिडांगणावर युवकांना सैन्य भरती, पोलिस भरतीसाठी व्यायाम करणेसाठी महिला बालकल्याण समितीमार्फत खास प्रशिक्षण वर्ग चालू करुन त्यांना क्रिडांगणावर क्रिडाविषयक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५२१ विषय क्रमांक - २८
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नाविया/२/कावि/४५८/१३ दि.३०/१२/१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५५ दि.२२/०१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजना घटक योजना क्र.१ सुधारीत शिष्यवृत्ती वाटप योजनेत (सुधारीत) शिष्यवृत्ती म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१,५००/- ऐवजी र.रु.२,०००/- व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांसाठी र.रु.२,५००/- ऐवजी र.रु.३,०००/- देणेस तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत घटक योजना क्र.७ मागासवर्गीय युवकांना विविध व्यावसाय प्रशिक्षण देणे या योजनेच्या नावात मागासवर्गीय युवकांना शासनाकडील मान्यताप्राप्त प्रपत्र अ नुसार अर्हताधारक (V.T.P.) (Vocational Training Provoider) संस्थांमार्फत शासनमान्य अभ्यासक्रमाचे शासनमान्य दराने प्रशिक्षण देणे याप्रमाणे पूर्वीच्या योजने ऐवजी सुधारणा करण्यास २) पूर्वीच्या योजनेच्या अटी शर्तीमध्ये सुधारणा करुन पुढील प्रमाणे अटी व शर्ती निश्चित करणेत याव्यात. **अ) लाभार्थी बाबत अटी शर्ती** – मागासवर्गीय कल्याणकारी योजना क्र.७ मधील लाभार्थीच्या अटी शर्ती मधील अ.क्र.५ अर्जदारास एकूण फी च्या १०% सहभाग शुल्क संबंधित प्रशिक्षण संस्थेकडे जमा करावे लागेल ही अट, अटी शर्तीमधून वगळण्यात यावी. **ब) V.T.P.बाबत अटी शर्ती** – १. V.T.P. संस्था यांना ३ वर्षापेक्षा जास्त वर्षाचा शासकीय योजनेतील प्रशिक्षणाचा अनुभव असावा. २. V.T.P. संस्था ही P.C.M.C. च्या हद्यीतील असावी. ३. संस्थेस समाजकल्याण विभागात मनपा, जिल्हापरिषद किंवा नगरपरिषद येथील योजनेत प्रशिक्षणाचा अनुभव असावा. ४. संस्थेची वार्षिक उलाढाल ही ४० लाखापेक्षा जास्त असावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या योजनेनुसार मनपा कार्यक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणा-या विद्यार्थीनींना अनुदान रक्कम देणेत येत असते त्याच धर्तीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देखील अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ९० टक्केचे पुढे मार्कस् असतील, परंतू ते नगरपालिकेच्या शाळेत नसतील तरी त्यांना रु.२५,०००/- अनुदान देणेत यावे. तसेच वरील योजनेअंतर्गत सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फोर व्हिलर ड्रायव्हिंग कोर्स देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच आत्तापर्यंत Corporation कडून शिवणाचे ज्यांचे क्लासेस झालेले आहेत व ज्यांना शिवण-यंत्र मिळालेले नाही, अशा सर्व महिलांना शिवण-यंत्र देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील महापालिकेतील इ.१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ९० टक्केच्या पुढे गुण मिळवणा-या

विद्यार्थ्यांना महापालिकेमार्फत र.रु.१०,०००/- आर्थिक सहाय्य देणेत येते. त्याचप्रमाणे शहरातील खाजगी शाळेतील ९० टक्केच्या पुढे गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१०,०००/- देण्यास तसेच महापालिकेच्या क्रिडांगणावर युवकांना सैन्य भरती, पोलिस भरतीसाठी व्यायाम करणेसाठी महिला बालकल्याण समितीमार्फत खास प्रशिक्षण वर्ग चालू करुन त्यांना क्रिडांगणावर क्रिडाविषयक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २९वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २९

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.जयश्री गावडे मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५६ दि.२२/०१/२०१४

सांगवी मधुबन कॉलनी येथील गणपती चौक ते गल्ली नं.१० कडे जाणारा मुख्य रस्ता म.न.पा.विकास आराखडयामध्ये १२.०० मी.नियोजित आहे. तरी सदर रस्त्यावरील वाहतुकीचा विचार करता व भविष्यात होणारे इतर पर्यायी रस्ते यांचा विचार करता गणपती चौकात गल्ली नं.१० कडे जाणारा १२.०० मी. रस्त्याची रुंदी कमी करुन ९.०० मी. पर्यंत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - आकुर्डी येथील फोर्स मोटर्स ते शितलादेवी मंदीराकडे जाणारा रस्ता महानगरपालिकेच्या सदर रस्त्यास समांतर असणारा समांतर रस्ता हा खंडोबा चौकापर्यंत जात असल्याने व तसेच सदर रस्ता मुंबई पुणे महामार्गास जिथे मिळतो तेथे ग्रेड सेपरेटर असल्याने या मार्गावर असणारी कमी वाहतूक व रस्त्याचा होणारा अतिशय कमी वापर याचा विचार करता फोर्स मोटर्स पासून शितलादेवी मंदीराकडे जाणारा १२.० मी. रस्त्याची रुंदी कमी करुन ९.० मी. पर्यंत करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५२२ विषय क्रमांक - २९
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.जयश्री गावडे मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५६ दि.२२/०१/२०१४

सांगवी मधुबन कॉलनी येथील गणपती चौक ते गल्ली नं.१० कडे जाणारा मुख्य रस्ता म.न.पा.विकास आराखडयामध्ये १२.०० मी.नियोजित आहे. तरी सदर रस्त्यावरील वाहतुकीचा विचार करता व भविष्यात होणारे इतर पर्यायी रस्ते यांचा विचार करता गणपती चौकात गल्ली नं.१० कडे जाणारा १२.०० मी. रस्त्याची रुंदी कमी करुन ९.०० मी. पर्यंत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच आकुर्डी येथील फोर्स मोटर्स ते शितलादेवी मंदीराकडे जाणारा रस्ता महानगरपालिकेच्या सदर रस्त्यास समांतर असणारा समांतर रस्ता हा खंडोबा चौकापर्यंत जात असल्याने व तसेच सदर रस्ता मुंबई पुणे महामार्गास जिथे मिळतो तेथे ग्रेड सेपरेटर असल्याने या मार्गावर असणारी कमी वाहतूक व रस्त्याचा होणारा अतिशय कमी वापर याचा विचार करता फोर्स मोटर्स पासून शितलादेवी मंदीराकडे जाणारा १२.० मी. रस्त्याची रुंदी कमी करुन ९.० मी. पर्यंत करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३०वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५२३ विषय क्रमांक - ३०
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१०/६२९/२०१४, दि.१८/०१/२०१४
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५९ दि.०५/०२/२०१४

पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने समाविष्ट करावयाच्या तरतूदींचा नियम क्र.१२.१ “ए”, परिशिष्ट “आर” मध्ये ४ (ए) व आर ४ (बी) समावेश करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करणे, नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेणे व तदनंतर त्यावर निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर करणेकरीता आयुक्तांना अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने समाविष्ट करावयाच्या तरतूदींचा नियम क्र. १२.१ "ए", परिशिष्ट "आर" मध्ये ४ (ए) व आर ४ (बी) समावेश करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करणे, नागरीकांच्या हरकती / सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेणे व तदनंतर त्यावर निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर करणेकरीता आयुक्तांना अधिकार देणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव महापालिका सभेपुढे मांडण्यात आला आहे. मा.महापौर साहेब, विषयपत्रिकेत उल्लेखित असलेले प्रपत्र, जोडण्या, प्रस्तावीत फेरबदल हे विषयपत्रिकेचाच भाग असून ते सदस्यांना देण्यात येणा-या विषयपत्रिकेसोबत जोडणे नियमानुसार बंधनकारक असताना ते जोडण्यात येत नसल्याबाबतच्या तक्रारी मी दि.३०.०३.२०११, १८.०६.२०१२, ०९.०७.२०१२ व १७.०६.२०१३ च्या लेखी पत्रान्वये यापूर्वी केलेल्या आहेत. परंतू प्रशासन इतके निगरगट्ट झाले आहे की वारंवार लक्षात आणून देऊन सुद्धा विषयासोबतच्या प्रपत्रके, जोडण्या या सदस्यांना दिल्या जात नाहीत. महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने नियम क्र. १२.१ "ए", परिशिष्ट "आर" मध्ये ४ (ए) व आर ४ (बी) या तरतूदींचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मात्र नियम क्र. १२.१ "ए" च्या नेमक्या कोणत्या तरतुदी आहेत, परिशिष्ट "आर" मध्ये समाविष्ट करावयाच्या ४ (ए) व आर ४ (बी) या तरतुदी काय आहेत, याची माहिती सभागृहातील सदस्यांना देण्यात आलेल्या नाहीत. तसेच सदर प्रस्ताव शहर सुधारणा समितीचे दि. ०५/०२/२०१४ रोजीच्या ठराव क्र.५९ अनुषंगाने प्रस्तावित आहे. मात्र शहर सुधारणा समितीने विकास नियंत्रण नियमावलीत नेमके कोणते फेरबदल करण्यासाठी मंजुरी दिली आहे याचा साधा उल्लेख सुद्धा शहर सुधारणा समितीच्या ठरावात नाही. वारंवार विनंती करुन सुद्धा अर्धवट विषयपत्रिका का दिली जाते, नगरसचिव विभाग माहिती देत नाही कि संबंधित विभाग अर्धवट विषयपत्र नगरसचिवांकडे पाठवतात याची चौकशी झाली पाहिजे. गावखाती कारभार आता बंद करावे. मा.महापौर साहेब, सदर प्रस्ताव संपूर्ण तपशील निहाय शहर सुधारणा समिती मार्फत दाखल करण्याचे आदेश द्यावेत. अशाप्रकारे अर्धवट व आंधणेपणाने केलेले ठराव सभागृहासमोर मांडण्यात येतात व अशा प्रस्तावांना मंजुरी मागितली जाते हे अत्यंत चुकीचे आहे. अशा बेकादेशीर प्रस्तावांना संख्याबळाच्या आधारे मंजुरी दिल्यास मला नाईलाजाने न्यायालयात दाद मागावी लागेल.

**मा.राजीव जाधव** (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, मा.सभागृह, सन्मा.सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे, तो रास्त आहे, यात दुमत नाही. सभागृहासमोर विषय मांडताना दोन पाने जास्त लागली तरी चालतील, विषय स्पष्ट असला पाहिजे. सर्व एच.ओ.डींनी त्यांचा विषय व्यवस्थित मांडला आहे का नाही याबद्दल मी खात्री करणार आहे. आपल्याकडे बीएसयुपी, डब्ल्यूबीएस आणि पत्राशेड मधील स्लम सदृश्य जे काही लोकांची नवी घरे बांधणार आहोत. त्यासाठी २.५ एफ.एस.आय. घेतोय. तो ऑलरेडी डी.सी. रुलमध्ये आहे. तो आपल्या डी.सी रुलमध्ये इनक्लूड करण्याचा प्रस्ताव आहे. आम्ही हे मान्य करतो, सविस्तर टिप्पण दिलेले नाही. यापुढे सविस्तर टिपण देऊ. सभागृहाला विनंती आहे, विषयाचे महत्व लक्षात घेता हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.अनुराधा गोफणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३१वर पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ३१

दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयामध्ये कासारवाडी याठिकाणी महापालिकेकडून एक ट्रिटमेंट प्लाण्ट बनवला होता. यात पाणी शुद्ध करुन नदीत सोडतात. त्याचा पुर्नवापर व्हावा या गोष्टीशी मी सहमत आहे. चांगली गोष्ट आहे. त्यातील काही पाणी पिण्यासाठी वापरतात. बाकी पाणी नदीत सोडतात. सीएमईकडे हे पाणी वळवण्याचा विषय

आहे. आपल्याला काही खर्च येत नाही. खरेतर त्यांची लाईन आपण करणार नाही. ते, पाण्याचे पैसे सुद्धा काही प्रमाणात देणार आहेत. ही चांगली गोष्ट आहे. परंतू ज्या संस्थेसाठी हा विषय आणला आहे, त्यांच्या हद्दीतून बोपखेल इथे जाणा-या रस्त्याचे डांबरीकरण गेले ३ वर्षांत हे लोक करत नाहीत. मी वारंवार त्यांच्याकडे पाठपुरावा करतोय. ते करायला तयार नाहीत. याउलट त्यांच्या हद्दीतील इतर सर्व रस्त्यांचे डांबरीकरण,सुशोभिकरण व्यवस्थित होते आहे. जाणूनबुजून इथे असे केले जाते आहे. हा दुजाभाव त्यांच्याकडून केला जातो आहे ही वस्तुस्थिती आहे. आयुक्त साहेब, आपण सुद्धा मागील महिन्यात आला होता. मी ज्या-ज्या वेळी गेलो, ते सरळ दम  देतात. तुमचा जायचा यायचा रस्ता बंद करु. दर ३ वर्षांनी नवीन अधिकारी येतो. त्यांना काही माहीत नाही. आपण त्यांच्या हद्दीतून जातो. आज आपल्यावर अशी वेळ का आली. १९४१ साली सीएमईने ३६०० एकर भूसंपादन केले. त्याचप्रमाणे पुणे-नाशिक रस्ता पूर्वी दापोडी ते भोसरी असा रस्ता सीएमईच्या आतून होता. १९६० साली हा रस्ता बायपास केला. आजचा नाशिक फाटा ते भोसरी या रस्त्याचे रितसर भूसंपादन झाले आहे. हा रस्ता या रस्त्याला येऊन कनेक्ट होत होता. हा रस्ता संपादन झालेला नाही. हा रस्ता सीएमईने अतिक्रमण करुन तोडला आहे. आणि हे आम्ही सुद्ध केले आहे. याबाबतीत विभागीय आयुक्त यांच्यासमोर म्हणणे मांडल्यानंतर त्यांच्या हे लक्षात आले. त्यांनी कलेक्टर यांना जागेची स्थळ पाहणी करण्यास सांगितले. आज १० महिने झाले. मी आपल्या महापालिकेतील सगळ्या अधिका-यंना ना सांगितले. मी एकटा पाठपुरावा करतोय. कोणी लक्ष देत नाही. त्या गावातील १५,००० लोक अडकले आहेत. त्यांच्यासाठी आपण काही करायला तयार नाही. आपले नागरीकांसाठी काही कर्तव्य आहे का नाही. सीएमईकडून दोन पैसे मिळतात म्हणून करतोय. पाण्याचे पैसे मिळणार हे मान्य आहे. पाणी दिले नाहीतर आर्थिक नुकसान होईल. हे मान्य आहे. यातील एक विषय पाहीलातर दुसरीकडे आपण रु. ५ कोटी देतोय. हे नुकसान नाही का. याला जबाबदार कोण? प्रशासन याला जबाबदार आहे. यापूर्वीच ट्रिटमेंट करुन पाणी सोडले असते तर पैसे द्यायला लागले नसते. हे नुकसान तुम्हाला दिसत नाही. तुम्ही म्हणात महिन्याला १२ लाख मिळणार. हे महापालिकेचे नुकसान होते आहे. मी म्हणतो, अजून सहा महिने हा विषय तहकूब ठेवा. रु.४०,०००/- प्रति दिवस याप्रमाणे मी द्यायला तयार आहे. महापौर साहेब, परंतू हा विषय तहकूब ठेवावा, जोपर्यंत बोपखेलचा विषय मार्गी लागत नाही. आयुक्त साहेब मी आपल्याला विनंती करतो, आपण स्वतः यात लक्ष घाला, तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५२४      विषय क्रमांक - ३१
दिनांक - ०५/७/२०१४      विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३
दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४

विषय क्रमांक ३१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३२वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५२५ विषय क्रमांक - ३२
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ **:-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/७१/२०१३, दि.१८/११/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४१, दि.१८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांचे सांडपाण्यामुळे मुळा-मुठा व भिमा नदीचे पाणी दुषित झाल्यामुळे बाधित गावांमध्ये आर.ओ. यंत्रणा बसविणेबाबत मा.विधानसभा अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली दि.९/७/२०१३ रोजी विधानभवन येथे झालेल्या बैठकीत त्यांनी बाधित गावांसाठी आर.ओ. यंत्रणा बसविणेकरिता येणारा खर्च एकूण र.रु.१०.१३ कोटी दोन्ही महानगरपालिकेने समसमान सोसावा असे सुचित केले. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एकूण रक्कमेच्या ५०% रक्कम र.रु. ५.०६५ कोटी पुणे जिल्हा परिषद यांना दि. ३१/७/२०१३ चे धनादेशान्वये अदा करणेत आली आहे. तदनंतर दि.४/९/२०१३ रोजी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली व संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वरील दिलेल्या रक्कमेमध्ये फक्त ८२ गावांसाठी आर.ओ. यंत्रणा बसविणे शक्य होत आहे. त्या व्यतिरिक्त जादा ३४ गावांमध्ये आर.ओ. सयंत्र बसविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. या गावांकरिता एकूण ३.७७ कोटी इतक्या अधिक निधीची आवश्यकता असल्याने दोन्ही महानगपालिकेने सदरचा निधी समप्रमाणात पुणे जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत ठरले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम रु.१८८.५० लक्ष पुणे जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत विभागीय आयुक्त यांनी दि.३०/१०/२०१३ चे पत्रान्वये कळविले आहे. बैठकीत झालेल्या निर्णयानुसार बाधित जादा ३४ गावांसाठी आर.ओ. सयंत्र बसविणेकामी म.न.पा.चे हिश्याची ५०% र.रु.१८८.५० लक्ष पुणे जिल्हा परिषद यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाम** - मा.महापौर साहेब, या विषयानुसार आपल्या शेजारी जी गावे आहेत, ग्रामीण भाग आहे तिथे खरोखर दुषित पाणी जाते. हे मान्य आहे. पण ते का जाते. इतके सुवेज ट्रिटमेंट प्लाण्ट आपण नदीजवळ उभे केले आहेत. अधिका-यांकडून मला माहिती मिळाली की, सुवेज ट्रिटमेंट प्लाण्टमधून ८० टक्के पाणी प्रक्रिया करतो. मग २० टक्के कुठे अडकतात. काही लिकेजेस आहेत किंवा कारखान्यातून रसायन मिश्रित पाणी जाते त्यामुळे आहे का याची माहिती घेतली. ५ कोटी द्यायचे काही नाही. जिल्हापरिषद ही मशीनरी बसवणार का. बसवले का नाही, याचा पाठपुरावा केला का नाही. यापूर्वी किती दिले होते? आत्ता ५ कोटींचा आपला वाटा आहे.

**मा.राजीव जाधव (महापालिका आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, यापूर्वी आपण रु.५ कोटी दिलेले आहेत. आत्ता रु.३ कोटी दिले. त्यापैकी रु.१ कोटी ८८ लाख द्यायचे आहेत.

**मा.शमिम पठाम** - मा.महापौर साहेब,एवढे २० टक्के जे दूषित पाणी नदीत सोडतो, ते पूर्ण प्रक्रिया करुन सोडले पाहीजे. त्या दृष्टीने लक्ष द्यावे. इकडे आळंदीकर ओरडतात. सगळे ओरडत आहेत. पूर्ण ट्रिटमेंट करुन सोडलेतर त्यातून आपला पैसा वाचेल. त्यात आपले सुवेज प्लाण्ट उभे राहतील. मोठ-मोठ्या स्किम आहेत, त्यांना एसटीपी कंम्पल्सरी केले आहे. तुम्हाला थोडे काम करावे लागणार आहे. ते काम पूर्ण करावे. नदीमध्ये सुवेज ट्रिटमेंट केलेले पूर्णपणे शुद्ध पाणीच सोडावे, अशी विनंती करते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५२६ विषय क्रमांक - ३३
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) दिनांक २३/१२/२०१३ व ०३/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक ०३/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५२७ विषय क्रमांक - ३४
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

**अ)** दिनांक ०८/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५२८ विषय क्रमांक - ३५
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

**अ)** दिनांक १८/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ब)** दिनांक ०१/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**क)** दिनांक १५/०१/१४ व २२/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५२९ विषय क्रमांक - ३६
दिनांक - ०५/७/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

अ) दिनांक १८/१२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/८४२/१४
दिनांक – १७/१०/२०१४



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

e drive\Nagersachiv1\GB-12-13 new\ Feb. 14 G.B.doc